सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सदाफुलीसह
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर
बुधवार, ८ जानेवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ६३ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### घसरणीला 'ब्रेक', शेअर बाजार सावरला

**मुंबई :** व्यापार सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी शेअर बाजारमधील पडझड थांबली. दोन दिवसांच्या



घसरणीनंतर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक २३४ अंकांनी वाढून ७८,१९९ वर, निफ्टी ९१ अंकांनी वाढून २३,७०७ या स्तरावर बंद झाला. सोमवारी जोरदार विक्रीनंतर आज शेअर बाजारात व्यवहार सुरू होताच काही मिनिटांतच ४०० हून अधिक अंकांची उसळी घेत निर्देशांकाने ७८ हजारांचा टप्पा ओलांडला. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स ४२२.६२ अंकांनी उसळी घेत ७८,३८७.६१ वर पोहोचला. त्याच वेळी निफ्टी १६०.२ अंकांनी वाढत २३,७७६.२५ या पातळीवर व्यवहार करताना दिसला. ग्राहकोपयोगी वस्तू आणि तेल आणि वायूच्या समभागात वाढ दिसून आली. सोमवारी शेअर बाजारात जवळपास १२५८ अंकांची घसरण झाली होती.

# फास्टॅग अनिवार्य

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय

### १ एप्रिलपासून राज्यभरात होणार अंमलबजावणी

◆ **मुंबई, ७ जानेवारी**

राज्यातील पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिलपासून सर्व वाहनांचा पथकर फास्टॅगद्वारेच भरावा लागणार आहे. या निर्णयानुसार सद्याच्या सार्वजनिक-खाजगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.



फास्टॅगच्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास वसुलीत अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्टॅग सुरू नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे.

राज्यात सद्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरू आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसूल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### महाराष्ट्रात राबविले जाणार 'ई-कॅबिनेट'

◆ **मुंबई, ७ जानेवारी**

राज्यात 'ई-कॅबिनेट' आणि या बैठकीत होणारे निर्णय पोर्टलच्या माध्यमातून राज्यातील जनतेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कारभार गतिमान आणि पारदर्शी करण्यावर भर दिला असून, मंत्रिमंडळातील निर्णय लोकांपर्यंत तातडीने पोहोचणे, त्यातून शासकीय कामकाजाला गती देणे आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला आहे.



राज्य शासनाच्या कारभारात जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यावर मुख्यमंत्र्यांचा भर असून, त्याचाच एक भाग म्हणून 'ई-कॅबीनेटचा निर्णय घेण्यात आला. 'ई-कॅबिनेट' हा राज्य शासनाचा पर्यावरणपूरक उपक्रम आहे. मंत्रिमंडळ बैठकांसाठी कागदांचा मोठ्या प्रमाणावर होणारा वापर कमी करण्यासाठी हे संपूर्ण आयसीटी सोल्यूशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या हरित उपक्रमांतर्गत स्मार्ट टॅब्लेट्सद्वारे कागदविरहित मंत्रिमंडळ बैठक सहज पार पडू शकेल. या प्रणालीमुळे मंत्र्यांसाठी अत्यंत सुलभ डॅशबोर्ड उपलब्ध होईल तसेच आवश्यक संदर्भ शोधणे, कृती बिंदू पाहणे आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत पुनरावलोकन करणे सोपे होईल. ई-कॅबिनेटमुळे मंत्रिमंडळ बैठकांचे, निर्णयांचे व त्यासंबंधीच्या दस्तऐवजांचे जतन होईल. (तभा वृत्तसेवा)

### गतिमान प्रशासनासाठी सुधारित नियमावली

◆ **मुंबई, ७ जानेवारी**

प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ आणि गतिमान करणारी सुधारित कार्यनियमावली प्रसिद्ध करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सुधारित कार्यनियमावली राज्यपालांच्या मान्यतेनंतर राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

या सुधारणांमध्ये मंत्रिमंडळापुढे आणावयाची प्रकरणे, मुख्यमंत्री तसेच राज्यपालांच्या मान्यतेसाठी सादर करावयाची प्रकरणे, मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाची कार्यपद्धती आदी तरतुदींचा समावेश आहे. अशी पहिली कार्यनियमावली १९७५ मध्ये तयार करण्यात आली होती.

या कार्यनियमावलीत काळानुरूप सुधारणा करण्यासाठी मंत्रालयीन विभागांच्या सचिवांचा अभ्यास गट गठित करण्यात आला होता. या गटाने केंद्र सरकार व इतर राज्यांच्या नियमावलींचा तुलनात्मक अभ्यास करून नियमावलीत सुधारणा करण्याची शिफारस केली आहे. (तभा वृत्तसेवा)

## दिल्ली विधानसभा निवडणूक

# ५ फेब्रुवारीला मतदान; ८ ला निकाल

◆ **नवी दिल्ली, ७ जानेवारी**

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीची निवडणूक आयोगाने आज घोषणा केली. ७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारीला एका टप्प्यात मतदान होणार असून, शनिवार ८ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी विज्ञान भवनात आयोजित पत्रपरिषदेत विधानसभा निवडणुकीची घोषणा केली. यावेळी निवडणूक आयुक्तद्वय ज्ञानेशकुमार आणि सुखबीरसिंग संधू उपस्थित होते.

निवडणुकीची अधिसूचना १० जानेवारीला जारी केली जाणार असून, १७ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील. १८ जानेवारीला अर्जांची छाननी केली जाणार असून, २० जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ५ फेब्रुवारीला मतदान व ८ फेब्रुवारीला मतमोजणी केली जाईल, असे राजीवकुमार यांनी सांगितले.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत १ कोटी ५५ लाख २४ हजार ८५८ मतदार १३०३३ मतदान केंद्रातून मतदान करणार आहे, असे स्पष्ट करत राजीवकुमार म्हणाले की, ८३ लख ४९ हजार पुरुष मतदार असून महिला मतदारांची संख्या ७१ लाख ७३ हजार आहे. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या २ लाखावर आहे.

**मिल्कीपूरमध्ये पोटनिवडणूक**

अयोध्येतील मिल्कीपूर विधानसभा मतदारसंघात ५ फेब्रुवारीला मतदान घेण्याची घोषणाही आयोगाने केली. आमदार समाजवादी पक्षाचे अवधेशप्रसाद लोकसभेवर निवडून आल्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागत आहे. मतमोजणी ८ फेब्रुवारीला होणार आहे. (तभा वृत्तसेवा)




### शेवटची निवडणूक आणि शेवटची पत्रपरिषद

राजीवकुमार यांची दिल्ली विधानसभा निवडणूक जाहीर करण्याची मंगळवारची पत्रपरिषद ही मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून शेवटची पत्रपरिषद होती. येत्या काही महिन्यांत ते निवृत्त होणार आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून राजीवकुमार यांना जवळपास पाच वर्षांचा कार्यकाळ मिळाला. २०२० मधील बिहार विधानसभा निवडणुकीपासून त्यांनी कारकीर्दीला प्रारंभ केला. या दरम्यान त्यांनी राष्ट्रपती निवडणूक, उपराष्ट्रपती निवडणूक, २०२४ ची लोकसभा निवडणूक तसेच अनेक राज्यांतील विधानसभा निवडणुका पार पाडल्या.

### एन. नवीन सोना एकनाथ शिंदेंचे प्रधान सचिव

**मुंबई :** राज्यातील वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, एन. नवीन सोना आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रधान सचिव असतील. तर, माणिक गुरसाल हे नाशिक महानगर



प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त असतील. राज्यातील एकूण आठ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश राज्य सरकारने दिला आहे. राज्यात नवीन सरकार आल्यापासून आतापर्यंत अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. गेल्या आठवड्यात १२ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले होते. आता ज्या आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत, त्यात अतुल पाटणे, ऋचा बागला, अंशु सिन्हा, डॉ. रामास्वामी एन. वीरेंद्रसिंह, प्रदीप पी. आणि माणिक गुरसाल यांचा समावेश आहे.

### सुकमात १० किलोचा आयईडी निष्क्रिय

◆ **सुकमा , ७ जानेवारी**

बिजापूरमध्ये झालेल्या मोठ्या नक्षलवादी हल्ल्याची पुनरावृत्ती मंगळवारी सुकमा जिल्ह्यात टाळण्यात आली. माओवाद्यांनी येथे पेरलेला १० किलो वजनाचा आयईडी सुरक्षा दलाने हुडकून लगेच निष्क्रिय केला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

कोंटा-गोलापल्ली मार्गावर बेलापोच्चा येथे केंद्रीय राखीव पोलिस दल आणि जिल्हा पोलिसांच्या संयुक्त पथकाने हा आयईडी शोधून काढला. भूसुरुंग शोध घेण्याची मोहीम राबवली जात असताना सुरक्षा दलाच्या जवानांना रस्त्याखाली हा आयईडी पेरलेला आढळला. त्यांनी सतर्कता बाळगल्याने मोठा अनर्थ टळला. हा आयईडी निष्क्रिय करण्यात आला.

# आता 'भारतपोल' पकडणार आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांना

### अमित शाह यांच्या हस्ते पोर्टलचे उद्घाटन

◆ **नवी दिल्ली, ७ जानेवारी**

देशविघातक कृत्ये करणाऱ्या, भ्रष्टाचार करून विदेशात पळ काढणाऱ्या आणि मोस्ट वाँटेड गुन्हेगारांना पकडण्यासाठी आजवर इंटरपोलची मदत घेतली जात होती. इंटरपोल जगभरातील देशांमध्ये एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करते. भारत सरकारने याच धर्तीवर स्वतःची 'भारतपोल' नावाची तपास संस्था स्थापन केली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीबीआयच्या या पोर्टलचे मंगळवारी उद्घाटन केले. सायबर गुन्हे, आर्थिक, संघटित गुन्हे, मानवी तस्करी, आंतरराष्ट्रीय गुन्हे आदी गुन्ह्यातील गुन्हेगारांना पकडण्यासाठी या पोर्टलचा वापर होणार आहे. भारतपोल पोर्टलद्वारे वेगवेगळ्या राज्यातील पोलिस गुन्हेगारांची अद्ययावत माहिती मिळवू शकणार आहेत. हे पोर्टल सीबीआयच्या अधिपत्यात असणार आहे. असे असले तरी, राज्यांचे पोलिस या पोर्टलच्या माध्यमातून थेट इंटरपोलची मदत घेऊ शकणार आहेत. सोबतच, विदेशी तपास यंत्रणादेखील भारतपोलच्या माध्यमातून भारतीय तपास यंत्रणांची मदत घेऊ शकणार आहे.

एक प्रकारे, आतापर्यंत इंटरपोलसोबत काम करण्यासाठी एकच संस्था होती. मात्र, भारतपोल सुरू झाल्यानंतर भारतातील प्रत्येक तपास संस्था, प्रत्येक राज्याचे पोलिस स्वतःला भारतपोलशी सहज जोडू शकतील आणि तपासाला गती देऊ शकतील, असे शाह म्हणाले. (वृत्तसंस्था)

### प्रणव मुखर्जी यांच्या स्मारकाला केंद्राची मंजुरी

◆ **नवी दिल्ली, ७ जानेवारी**

भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे स्मारक दिल्लीत उभारण्यासाठी केंद्र सरकारने मंजुरी दिली. या संदर्भातील माहिती स्वतः दिवंगत प्रणव मुखर्जी यांच्या कन्या शर्मिष्ठा मुखर्जी यांनी दिली.

शर्मिष्ठा मुखर्जी यांनी मंगळवारी 'एक्स'वर पोस्ट करीत प्रवण मुखर्जी यांच्या स्मारकाला केंद्राने मंजुरी दिल्याचे म्हटले आहे. सरकारने राष्ट्रीय स्मृती संकुलात (राजघाट परिसराचा एक भाग) एक जागा मुखर्जी यांच्या समाधीसाठी राखून ठेवण्याचे मान्य केल्याचे शर्मिष्ठा यांनी स्पष्ट केले.

स्मारक बांधण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाबद्दल मनापासून आभार आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटले. आम्ही जे मागितले नव्हते, हे दिल्याने हे अधिक कौतुकास्पद आहे, असे त्या म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

### धाडमध्ये २० ब्रास अवैध वाळू साठा जप्त

◆ **धाड, ७ जानेवारी**

बुलढाणा-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील करडी मोबाईल टॉवर परिसरात बुलढाण्याचे तहसीलदार कुमरे यांनी सोमवारी सायंकाळी छापा टाकून २० ब्रास अवैध बाळू साठा जप्त केला. हा वाळू साठा कोणाचा हे मात्र समजू शकले नाही.

अवैध वाळू वाहतुकीत मराठवाड्यातील ३०-३२ टिप्पर धाड व रायपूर पोलिस स्टेशन हद्दीतून धावत असल्याची चर्चा आहे. सोमवारी दुपारी जालन्यातील जाफ्राबाद येथील वाळू माफियांनी टिप्परमधून अवैध आणलेल्या ३०-३५ ब्रास वाळूचा साठा करडी फाट्याजवळील मोबाईल टॉवर परिसरात केल्याची माहिती कुमरे यांना मिळाली होती. माहितीच्या आधारे त्यांनी सहकारी कर्मचाऱ्यांसह उपरोक्त ठिकाणी छापा मारला. कुमरे यांच्या उपस्थितीत तलाठी सुरडकर यांनी उपरोक्त वाळू साठ्याचा पंचनामा केला. (तभा वृत्तसेवा)

### भाजपाचे १० जानेवारी रोजी 'घर चलो अभियान'

मुंबई : भाजपाच्या सुरू असलेल्या संघटन पर्वा अंतर्गत १० जानेवारी रोजी प्राथमिक सदस्य नोंदणीसाठी 'घर चलो अभियान'चे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात पक्षाचे सर्व मंत्री, पंचायतीपासून पार्लमेंट पर्यंतचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी या अभियानात सहभागी होणार आहेत, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रपरिषदेत बावनकुळे बोलत होते. पक्षाचे दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट निश्चितच पूर्ण होईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. बावनकुळे म्हणाले की, पक्षाच्या संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी अभियानाला राज्यात प्रारंभ झाला आहे. ५ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व प्रमुख नेत्यांनी, लोकप्रतिनिधींनी, पदाधिकाऱ्यांनी बूथ पातळीवर जाऊन या अभियानात सहभाग घेतला. १० जानेवारी रोजी पक्षाचे सर्व नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी प्रत्येक बुथवर किमान ४०-५० घरी जाऊन प्राथमिक सदस्य नोंदणी करणार आहेत. पक्षाने राज्यात दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले आहे. प्राथमिक सदस्य नोंदणीनंतर सक्रिय सदस्य नोंदणी अभियान सुरू होईल. एका बुथवर ५ सक्रिय सदस्य नोंदवून राज्यात ५ लाख सदस्य नोंदविले जातील.

# तिबेटमध्ये भूकंपामुळे हाहाकार, १२६ ठार

### नेपाळपासून बिहार, सिक्कीम, बंगालपर्यंत हादरे

◆ **बीजिंग, ७ जानेवारी**

नेपाळच्या सीमेजवळ असलेल्या तिबेटचा पर्वताळ भाग शिजांग येथे एका तासात भूकंपाचे सहा मोठे झटके बसले. रिश्टर स्केलवर याची तीव्रता ७.१ नोंदवण्यात आली. या भूकंपामुळे हाहाकार उडाला. यात तिबेटमध्ये १२६ जण ठार तर १८८ जण जखमी झाले. भूकंपामुळे तिबेटमधील शिगात्से शहर उद्ध्वस्त झाले. कित्येक इमारतींसह पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे वृत्त आहे.



भूकंपामुळे ठिकठिकाणी हजारो इमारती अशा उद्ध्वस्त झाल्या होत्या

शियांग स्वायत्त क्षेत्रातील डिंगरी काऊंटीत आलेल्या ७.१ तीव्रतेच्या भूकंपात १३० पेक्षा जास्त जण जखमी झाले, असे वृत्त चीनची सरकारी वृत्तसंस्था सिन्हुआने दिले. भारत, नेपाळ, बांगलादेश आणि भूतानसह कित्येक भागांत भूकंपाचे झटक जाणवले. सिक्कीमसह ईशान्येतील राज्ये आणि बिहार आणि पश्चिम बंगालसह उत्तर भारताच्या विविध भागांत मंगळवारी सकाळी भूकंपाचे मोठे झटके जाणवले.

नेपाळची राजधानी काठमांडू येथे मोठे झटके जाणवल्यानंतर लोकांनी घराबाहेर पडत रस्ते आणि मैदानांकडे धाव घेतली. भूकंपाचे केंद्र असलेल्या ठिकाणी कित्येक इमारती कोसळल्या. डिंगरी काऊंटी आणि आसपासच्या भागात जोरदार झटके बसले, असे वृत्तात म्हटले आहे. प्रचंड हादरे जाणवल्यानंतर चीन भूकंप प्रशासनाने दुसऱ्या पातळीची आपत्ती जाहीर करीत आपत्कालीन पथकांना शोध व बचाव कार्यासाठी पाठवले. शियांग हा चीनचा स्वायत्त भाग आहे, तिथेही दुसऱ्या पातळीची आपत्ती जाहीर करण्यात आली.

**आपत्कालीन साहित्य रवाना**

भूकंप होताच प्रशासनाने कापडी तंबू, कापडी पलंग, रजया, फोल्डिंग करणारे पलंग यासह आपत्कालीन स्थितीत वापरण्यासारख्या जवळपास २२ हजार वस्तू तिबेटमध्ये पाठवल्या. (वृत्तसंस्था)




# नवेगाव बांध पर्यटक निवास पर्यटकांसाठी पर्वणी ठरेल

### मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते लोकार्पण

◆ **मुंबई, ७ जानेवारी**

विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात एमटिडीसीचे नवेगाव बांध पर्यटक निवास नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या भोवती शाश्वतरीत्या उभारले असून, ते पर्यटकांना पर्वणी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नवेगाव बांध लोकार्पण सोहळा आभासी पद्धतीने पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई आदी उपस्थित होते.

२२ नोंव्हेंबर १९७५ या दिवशी अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आलेले हे घनदाट जंगल गोंदिया जिल्ह्याच्या दक्षिणेला असून, गोंदियापासून ६५ कि.मी. अंतरावर नवेगावबांध येथे राष्ट्रीय पक्षी उद्यान आहे. वनश्रीने नटलेल्या या उद्यानाचा परिसर १६५ चौरस कि.मी. आहे. येथे सैबेरियासारख्या अतिदूर प्रदेशातील पक्षी विशिष्ट हंगामात दरवर्षी येतात. नवेगांव बांध तलाव सुमारे ११ वर्ग कि.मी. परिसरात पसरला आहे. तलावाच्या मध्यभागी प्रेक्षणीय असे 'मालडोंगरी' बेट आहे. या जंगलाचा भाग नागझिरा अभयारण्यापासून सुरू होऊन गडचिरोली जिल्ह्यातून थेट छत्तीसगढपर्यंत जातो.

**सर्व सोयीसुविधांनी सज्ज पर्यटक निवास**

नवेगाव बांध या पर्यटन स्थळी पर्यटकांना राहण्याकरिता महामंडळाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून २१ कोटी रुपयांच्या निधीतून उत्तम सुविधेने सज्ज असलेले पर्यटक निवास चांदपूर या नावाने सुरू केले आहे. येथे व्हीआयपी सूट, डीलक्स सूट, स्टॅण्डर्ड सूट आणि ८ बेडेड डॉर्मिटरी, उपहारगृह आणि मनोरंजनासाठी स्विमींगपूल इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. येथे एकूण डिलक्स १८ सूट, लेडीज २ डॉरमेटरी सूट, जेन्ट्स डॉरमेटरी १ सूट, १ चेंजींग रूम,१ मॅनेजर रूम आहे.

**पर्यटकांचे आकर्षण केंद्र**

इटियाडोह धरण हे गोंदिया, भंडारा व गडचिरोली जिल्ह्यांसाठी असलेला हा पाटबंधारे प्रकल्प मोरगांव अर्जुनी तालुक्यात आहे. कटला मासा व कोळंबीसाठी हा प्रकल्प प्रसिध्द आहे. तिबेटिया कारपेट बनविण्याचे केंद्र येथून जवळच आहे. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# जिल्ह्यात नव्या विषाणूचा प्रादुर्भाव नाही : जिल्हा आरोग्य विभाग

## जिल्ह्यात एचएमपीव्ही विषाणूचे सर्वेक्षण सुरू : जिल्हा आरोग्य अधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

नव्या एच.एम.पी.व्ही या विषाणूजन्य आजाराचा चिनमध्ये मोठया प्रमाणात उद्रेक सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आरोग्य सेवा विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यात सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

या विषाणूजन्य आजाराचा जिल्ह्यात एकही रुग्ण आढळला नसल्याचे स्पष्टीकरण सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य



विभागाकडून देण्यात आले आहे. दरम्यान, शासनाच्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिलेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील ८० प्राथमिक आरोग्य केंद्र व ४३४ उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात या आजाराबाबत सर्वेक्षण करण्यात येत आहे. सतत खोकला, शिंका, ताप ही लक्षणे असल्यास रुग्णांनी तात्काळ जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उपकेंद्रात उपचार घ्यावेत. आजार अंगावर काढू नये, असे आवाहन जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**व्हायरस पासून घ्यावयाची काळजी**

सतत खोकला किंवा शिंका, येत असतील तर तोंड आणि नाक रुमाल किंवा टिशू पेपरने झाका, साबण किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझर ने आपले हात वारंवार धुवा, ताप खोकला आणि शिंका येत असल्यास दूर राहा, भरपूर पाणी प्या, पौष्टिक आहार घ्या, संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे व्हेंटिलेशन होईल याची दक्षता घ्यावी.

**घाबरू नका काळजी घ्या**



चीनमधून आलेल्या नवीन विषाणू आजाराबाबत काळजीचे कोणतेही कारण नाही. याबाबत जिल्ह्यात आवश्यक ती दक्षता घेण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात सर्वेक्षण अधिक गतिमान करून सर्दी-खोकला असलेल्या रुग्णांचे नियमित सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या आजारासंदर्भात नागरिकांनी घाबरून जाऊ नये, मात्र दक्षता घ्यावी.

**- डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्य अधिकारी**

**व्हायरसपासून संरक्षणासाठी हे करू नका**

हस्तांदोलन, टिशू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर, आजारी लोकांशी जवळचा संपर्क, डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेऊ नका.

---

## संक्षिप्त वृत्त



### सामाजिक कार्यात जैन समाजाचे योगदान मोठे : डॉ. संजीव ठाकूर

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

वैद्यकीय क्षेत्र असो किंवा सामाजिक क्षेत्र असो यात गरीब व गरजू लोकांना मोफत वैद्यकीय सेवा तसेच सामाजिक कार्यात खूप मोठे योगदान देणारे समाज म्हणजे जैन समाज आहे असे उद्गार छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे डीन डॉ. संजीव ठाकूर यांनी काढले ते भारतीय जैन संघटना, जैन सोशल ग्रुप सोलापूर सेंट्रल व युगंधर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच स्वर्गीय मातोश्री जीटीदेवी छाजेड पिताश्री मोहनलाल छाजेड यांच्या स्मृति प्रित्यर्थ मोफत दोन दिवसीय प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याध्यक्ष केतनभाई शहा तर अमेरिका स्थित डॉ. राजा लाला त्यांची धर्मपत्नी ललिता लल्ला यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी युगंधर हॉस्पिटलचे डॉ. विलास हरपळे, डॉ. अभिजीत वडगावकर जैन सोशल ग्रुपचे संजयभाई शहा, भारतीय जैन संघटनेचे श्याम पाटील, अभिनंदन विभुते, प्रवीण बलदोटा रवींद्र गांधी गौतम संचेती यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय डॉ. शरद दीक्षित यांच्या स्मरणार्थ मातोश्री जेठीदेवी छाजेड व पिताश्री मोहनलाल छाजेड यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केतनभाई शहा यांनी केले. या शिबिरासाठी छाजेड परिवाराने सहकार्य केले. कार्यक्रमाची सुरुवात णमोकार महामंत्र्याने करण्यात आला. उपस्थित मान्यवरांचे सत्कार बुके व भेटवस्तू देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष बंब व आभार प्रदर्शन गौतमचंद संचेती यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जैन संघटनेचे देशभूषण व्हसाळे, विक्रांत बेशेट्टी, माया पाटील, कोमल पाचोरे, अशोक भालेराव प्रशांत वर्धमाने महावीर नळे पंकजा पंडित वर्षा जैन जैन सोशल ग्रुपचे अशोक छाजेड, अतुल गांधी, रमेश बंब, दिनेश जैन, गिरीश गांधी, वसंत मुनोत, गौतम सुकलेचा,संतोष शहा, हेमंत मेहता, हितेश शहा यांनी परिश्रम घेतले.



### तामलवाडी पोलिस स्टेशनच्या वतीने पत्रकारांचा गौरव

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

६ जानेवारी हा दिवस राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्त तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलिस स्टेशन व सुयोग फाऊंडेशनच्या वतीने तामलवाडी पंचक्रोशीतील पत्रकार बांधवांचा सत्कार सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरज देवकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार अविनाश गायकवाड, संतोष मगर, सर्जेराव गायकवाड, पीपी जाधव, रवी घोटकर, सचिन शिंदे, जाकीर तांबोळी आदींना गौरविण्यात आले. यावेळी सपोनि देवकर यांनी तामलवाडी पंचक्रोशीतील पत्रकारांबाबत गौरवोद्गार काढले. मी तामलवाडी पोलिस ठाण्यात सेवेत आल्यापासून कर्तव्य बजावताना या ठिकाणच्या पत्रकार बांधवांचे मोठे सहकार्य लाभत असून, या ठिकाणचे पत्रकार चांगले काम केल्यावर बातमीतून कौतुकही करतात आणि एखाद्या कर्तव्यात आमचे पोलिस कर्मचारी चुकल्यास त्यांचीसुध्दा बातमी करतात. तसे तर तामलवाडी पंचक्रोशीत गुन्हेगारी अत्यंत कमी प्रमाणात दिसून येत असल्याचेही समाधान देवकर यांनी यावेळी व्यक्त केले. तर डॉ. रविराज गायकवाड यांनीही पत्रकार दिनानिमित्त पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या आणि पत्रकारांनी पत्रकारितेबरोबर आपल्या आरोग्याचीही काळजी घेण्याचे आवाहन केले. यावेळी आकाश सुरनार, उमेश माने हे पोलिस कर्मचारीही उपस्थित होते.



### बालाजी अमाईन्स' निर्मित गोटेवाडीच्या दोन वर्गखोल्यांचे लोकार्पण

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील गोटेवाडी येथील बाबुराव पाटील विद्यालयात बालाजी अमाईन्सच्या सीएसआर फंडातून बांधण्यात आलेल्या दोन वर्गखोल्याच्या इमारतीचे लोकार्पण बालाजी अमाईन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार यांचे हस्ते करण्यात आले. या इमारतीच्या लोकार्पण प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र पाटील यांनी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळाने वर्गखोल्या बांधून दिल्याबाबत आभार मानले. आमच्या शाळेस दोन वर्गाची गरज होती; वर्गाची कमतरता असल्याने शाळा दोन (सकाळी व दुपारी) सत्रात भरत होती, आता बालाजी अमाईन्सच्या मदतीमुळे शाळा एकाच वेळेत भरेल, असेही मुख्याध्यापकांनी नमूद केले. यावेळी बोलताना बालाजी अमाईन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार म्हणाले, बालाजी अमाईन्सच्या सीएसआर विभागाच्या वतीने जिल्ह्यातील विविध गावात आजतागायत अनेक गावात रस्ते, ओढा नाला खोलीकरण-सरळीकरण, साठवण तलावातील गाळ काढणे, वर्गखोल्या बांधणे आदी विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. शाळेतील वर्गखोल्याच्या इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमास गोटेवाडीचे तानाजी हांडे, शाळेतील शिक्षक नाईकनवरे, सोलनकर, आदलिंगे, वाघमारे, सोनटक्के, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, बसवराज आंटद, नचिकेत शहा, गोटेवाडी ग्रामपंचायतीचे सदस्य व गावातील नागरीक तसेच विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

---

## हिराचंद नेमचंद कॉलेजचे समूह नृत्य स्पर्धेत यश



**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाच्या दशकपूर्ती महोत्सवांतर्गत आयोजित आंतरशालेय व आंतर महाविद्यालयीन सेवासदन कला कौमुदी युवती महोत्सवात हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सने समूह नृत्य स्पर्धेत यश संपादन केले.

या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आपला बहारदार गोंधळी नृत्य सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. स्पर्धेत २० संघाने सहभाग घेतला होता. त्यामध्ये हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सने सादर केलेल्या गोंधळी समूह नृत्याला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. त्यांना प्रा. अजित देवसाळे यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये अकरावी आणि बारावी मधील धनश्री कोल्हापूरे, स्नेहा श्रावण, स्नेहल पुजारी, नंदिनी कोरे, श्वेता कुणी या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. त्यांचा अखिल भारतीय नाटय परिषद, शाखा सोलापूरच्या उपाध्यक्षा डॉ. मीरा शेंडगे यांच्या हस्ते प्रमाणपत्र, रोख रक्कम व कलाकौमुदी युवती महोत्सव सेवासदन मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर पुणे सेवासदन संस्था, सोलापूर शाखेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिवा वीणा पतकी, कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव प्रधान, प्रा. तृप्ती बापट, ॲड. अर्चना कुलकर्णी, पुष्पा आगरकर, सुलभा पिशवीकर, सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. पद्मकुमार उपाध्ये आदी उपस्थित होते.

पुरस्कार प्राप्त विद्यार्थिनीचे वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी व सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ.सत्यजित शहा यांनी अभिनंदन केले.

---



## तुमच्या चेहऱ्यावरील आनंद, हेच आमचे समाधान : एम. राजकुमार

### १९३ फिर्यादींना एक कोटी १० लाख १८ हजारांच्या मुद्देमालाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी -**

गुन्हेगाराचा शोध घेणे हे पोलिसांचे जरी कर्तव्य असले तरी सामाजिक जाणीव ठेवून केलेले कर्तव्यातून एक प्रकारचे समाधान प्राप्त होते. हेच समाधान आज होत असलेल्या मुद्देमाल परत करण्याच्या कार्यक्रमात तुमच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून होत असल्याचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार म्हणाले.

पोलिस रेझिंग डे निमित्त सोमवार, दि. ७ जानेवारी रोजी पोलीस आयुक्तालयाच्या सभागृहात मुद्देमाल परत करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे उपस्थित होते. पुढे बोलताना आयुक्त एम. राजकुमार म्हणाले, पोलीस आयुक्तालयातंर्गत सात पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या चोरी, घरफोडी तसेच वाहन चोरीच्या गुन्हद्ययातील १९३ फिर्यादींना सोमवारी मुद्देमाल परत करण्यात आला आहे. दागिने, वस्तू तसेच वाहनाशी आपले भावनिक नाते जुळलेले असते. त्या गमावल्याने होणारी वेदना फारच क्लेषदायक असते. त्या वस्तू परत मिळाल्यानंतर तुमच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसतो, यातूनच आम्हाला आम्ही केलेल्या कामाचे समाधान मिळते. अशा प्रकारचा महिन्यातून एक तरी कार्यक्रम व्हावा अशी अपेक्षा यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी व्यक्त केली. १९३ फिर्यादींना न्यायालयाच्या आदेशाने त्यांचा चोरीस गेलेला पोलिसांनी शोधलेला मुद्देमाल परत करण्यात आला. यामध्ये २२ मोटार सायकल, एक ट्रॅक्टर, एक जीप, १२३ मोबाईल हॅन्डसेट, १ टॅब, सोन्या-चांदीचे दागिने असा १ कोटी १० लाख १९ हजार ३५० रुपयांच्या ऐवजाचा समावेश आहे. चोरीस गेलेला मुद्देमाल परत मिळाल्याने अनेकांना अश्रू अनावर झाले होते. यावेळी अनेक महिला फिर्यादी या भावनिक होऊन पोलिसांच्या कामाचे कौतुक करीत होत्या. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, तसेच सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी पोलीस निरीक्षकांसह मुद्देमाल परत घेण्यासाठी आलेले फिर्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पानगल प्रशालेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ७ जानेवारी-**

एम.ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या वतीने पानगल फेस्टिवलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन हुतात्मा स्मृती मंदिरात केले होते. पानगल फेस्टिवलमध्ये हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी हमद, नाअत, कव्वाली, देश गीत, गझल, गानी, तमसिली मुशायरा आणि नाटके सादर करून प्रेक्षकांकडून भरभरून दाद मिळविली.

या स्नेहसंमेलना विद्यार्थ्यांसह प्रसिद्ध पार्श्वगायक महंमद अयाज आणि युसूफ अत्तार यांनी त्यांच्या मुलांसह गाणी व नाअत सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यानंतर नाटककार मरहूम नसीम मन्नान यांनी लिहिलेले 'बैकां का कोर्ट' हे नाटक सादर केले. शहरातील पहिल्या बालनाट्यसंग्रह 'आयना' चे बाल नाट्य लेखक आणि पानगल हाईस्कूल व ज्युनिअर कॉलेज चे प्राचार्य डॉ. हारून रशीद अहमद साहब बागबान यांनी लिहिलेले बाल नाट्य तीन सवाल सादर केले. ते प्रेक्षकांना चांगलेच आवडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रीडा शिक्षक अल्ताफ सिद्दिकी होते. यावेळी त्यांच्या २५ वर्षाचे अध्यापन सेवेचा गौरव म्हणून त्यांचे विशेष सत्कार करण्यात आले. तसेच दोन शिक्षिका निकहत नल्लामंदु व हाजरा माशाळवाले त्यांच्या ३२ वर्षाच्या अध्यापन सेवेबद्दल सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुराण पठणाने झाली. सूत्रसंचालन मो.अली शेख व तारिक शेख यांनी केले. जाकीर शहापुरे आभार मानले.

प्राचार्य हारून रशीद बागबान यांनी स्वागत व पाहुण्यांचा सत्कार केला. तर उपमुख्याध्यापिका डॉ. सूररया परविन जहागीरदार यांनी निकहत नल्लामंदू व हाजरा मशालवाले यांचा सत्कार केले. मो. अली शेख, रियाज सय्यद, वसीम नलानंदू, जाकीर शहापुरे, इद्रिस पेरमपल्ली, फौजीया शेख, फरजाना नदाफ यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मेहमूद खतीब, अकबर पठाण, वसीम नल्लामंदू, खलील पेरमपल्ली, आफ्रीन मुल्ला, नगमा मुजावर, शबाना शाभाई, आलिया इनामदार, फरहत शेख, इरम शेख, उजमा उस्ताद, मोहसीन माशाळ, यांचे शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल गौरव करण्यात आला.

---




## तरुणांनी शिक्षणाला प्राधान्य द्यावे : अजित गायकवाड

### सामाजिक जबाबदारी या विषयावर एक दिवसीय मार्गदर्शन शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

समाजकार्यास सुरुवात करण्याअगोदर तरुणांनी शिक्षणास प्राधान्य द्यावे. उच्च शिक्षित तरुण समाजात परिवर्तन घडवित असतो, असे प्रतिपादन समाजसेवक अजित गायकवाड यांनी केले. ते संतोष बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या तरुणांसाठी आयोजित मार्गदर्शन शिबिरात बोलत होते.

संतोष बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने तरुणांसाठी सामाजिक जबाबदारी या विषयावर एक दिवसीय शिबिर रूपाभवानी बगीच्च्या या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. या शिबिरास भेट देऊन माजी नगरसेवक रवी गायकवाड, अजित गादेकर, पिंटू डावरे, प्रा. रोहन जामगेकर, प्रा. डॉ. सचिन कांबळे, प्रा. सचिन गायकवाड, प्रा. अरविंद नडखांबे, ॲड गौतम जगझाप, रितेश प्रधाने, प्रा. प्रकाश कांबळे, सचिन गायकवाड, गौस पटेल, अमित सुर्वे, महेश गजधाने, अश्विन गायकवाड आदींनी तरुणांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक संचित गायकवाड यांनी तर सूत्रसंचालन संतोष कांबळे व आभार प्रदर्शन संतोष गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमा वेळी माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने उत्सव पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

**उत्सव पदाधिकारी असे**

उत्सव अध्यक्ष - प्रथमेश सोनकांबळे; उपाध्यक्ष - रोहन चितारे, प्रथम साबळे, चिदंबर रुपनर, सार्थक कांबळे, सचिव - विश्वराज सावंत; खजिनदार - सोनू बाबरे; सहखजिनदार - संकेत सातपुते, संग्राम भोसले; सह सेक्रेटरी - विराट कुरा; विश्वस्त - अहिंसक इंगळे, सुरज गायकवाड, प्रथमेश जाधव, प्रथमेश सुर्वे, मिरवणूक प्रमुख - अश्वत खळसोडे यांची निवड करण्यात आली

---

## शहरात आढळली ४१ अति कुपोषित आणि ६०४ कुपोषित बालके

### महापालिका आयुक्तांनी साधला बालक, माता यांच्याशी संवाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सोलापूर महानगपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक शीतल तेली-उगले यांच्या हस्ते डफरीन चौक येथे सोलापूर महानगपालिकेच्या पोषण पुनर्वसन केंद्राचे उदघाटन करण्यात आले. आयुक्त शीतल तेली -उगले यांनी पोषण पुनर्वसन केंद्रावर दाखल कुपोषित बालक व त्यांच्या माता यांच्याशी संवाद साधून बाळाच्या काळजी बाबत मार्गदर्शन केले.



२१व्या शतकात असूनही बालकांमध्ये कुपोषण ही अतिशय गंभीर समस्या आहे. एकूण होणाऱ्या बालमृत्यूंमध्ये सुमारे ३३ टक्के बालके कुपोषित असतात. ही समस्या ग्रामीण भागामध्ये जरी असली तरी शहरी भागामध्ये सुद्धा याचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या अनुषंगाने सोलापूर शहरांमधील सर्व ० ते ५ वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून यामध्ये ४१ अति कुपोषित आणि ६०४ कुपोषित बालके आढळलेली आहेत. सोलापूर शहरातील कुपोषित बालकांची संख्या लक्षता घेता या कुपोषित बालकांचा पुन्हा आरोग्य बनविण्यासाठी महानगरपालिकेने पोषण पुनर्वसन केंद्र डफरीन चौक येथे सुरू केले केला आहे.

यामध्ये शून्य ते पाच वयोगटातील बालकांना दाखल केले जात आहे. बालकांच्या दृष्टीने अतिशय सुंदर असे वातावरण येथे निर्माण केलेले आहे. त्यांना १४ दिवस मोफत सकस आहार ,स्वच्छता, घरच्या घरी उपलब्ध पदार्थातून पोषण आहार बनवण्याचे प्रशिक्षण तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार देण्यात येत आहे. बालकांच्या मातांना निवासी भत्ता येणार आहे. आज पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये १४ बालके दाखल झालेली आहेत. त्यांच्या आरोग्याची काळजी करण्यासाठी सर्व सोयीनुयुक्त असे स्टाफ व त्या ठिकाणी लहान पोषक अहार त्याबरोबर मुलांसाठी खेळणी, टीव्ही इत्यादी सोय करणायत आली आहे. महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य अधिकारी डॉ.राखी माने, प्रजनन व बाल आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. शिरशेट्टी यांनी परिश्रम घेतले.

**पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये १४ बालके दाखल**

यामध्ये शून्य ते पाच वयोगटातील बालकांना दाखल केले जात आहे. बालकांच्या दृष्टीने अतिशय सुंदर असे वातावरण येथे निर्माण केलेले आहे. त्यांना १४ दिवस मोफत सकस आहार ,स्वच्छता, घरच्या घरी उपलब्ध पदार्थातून पोषण आहार बनवण्याचे प्रशिक्षण तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार देण्यात येत आहे. बालकांच्या मातांना निवासी भत्ता येणार आहे. आज पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये १४ बालके दाखल झालेली आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# श्वसनाच्या आजारांवर नजर ठेवा

## केंद्राचा राज्यांना सल्ला

**नवी दिल्ली, ७ जानेवारी**

आयएलआय आणि एसएआरआयसह श्वसनाच्या इतर आजारांवर नजर ठेवा, असा सल्ला केंद्र सरकारने राज्यांना दिला तसेच एचएमपीव्हीचा संसर्ग रोखण्यासाठी जनजागृती करा, असे आवाहन केंद्र सरकारने या आजाराचे पाच बाधित देशात आढळल्यानंतर केले आहे.

एचएमपीव्हीची प्रकरणे आणि श्वसनाशी संबंधित आजारांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य सचिव पुनिया सलिला यांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांची आभासी बैठक घेतली. या व्यतिरिक्त सार्वजनिक आरोग्याबाबत उपाययोजना आणि व्यवस्थापनाचाही आढावा या बैठकीत घेण्यात आला.

या बैठकीला आरोग्य संशोधन विभागाचे सचिव डॉ. राजीव बहल, आरोग्य सेवेचे सचिव डॉ. अतुल गोयल, राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, एकात्मिक रोग निरीक्षण कार्यक्रम, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, राष्ट्रीय विषाणू संस्था आणि आयडीएसपीच्या राज्यांत पाळत ठेवणारे युनिट्सचे तज्ज्ञ उपस्थित होते, असे आरोग्य मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे.

चीनमध्ये एचएमपीव्हीची प्रकरणे वाढल्याच्या तसे कर्नाटक, तामिळनाडू आणि गुजरातमध्ये एकाच दिवशी पाच बाधित आढळल्याच्या पृष्ठभूमीवर ही बैठक घेण्यात आली. *(तभा वृत्तसेवा)*



## एचएमपीव्ही विषाणूबाबत घाबरण्याचे कारण नाही

### हसन मुश्रीफ यांची ग्वाही



**मुंबई, ७ जानेवारी**

जगातील अनेक देशांमध्ये ह्युमन मेटान्यूमोनिया व्हायरस (एचएमपीव्ही) विषाणूचा प्रभाव दिसून येत आहे. आपल्या देशात आजपर्यंत सात बाधित नागपूर, कर्नाटक, तामिळनाडू व गुजरातमध्ये आढळून आले. त्या पैकी एक जण बरा होऊन घरी गेला आहे. उर्वरित बाधित बरे होत आहेत. हा आजार गंभीर नसून, लहान मुले, वृद्ध आणि इतर गंभीर आजार असणाऱ्यांनी काळजी घ्यावी, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

मंत्रालयीन दालनात एचएमपीव्ही विषाणूसंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. मुश्रीफ म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. काही राज्यांमध्ये एचएमपीव्ही प्रकरणे आढळून आली आहेत. मात्र, आपल्या राज्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये; कारण सरकार लवकरच या परिस्थितीबद्दल सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे जारी करून या रोगाला प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन आळा घालण्यात येईल असे सांगितले. *(तभा वृत्तसेवा)*

## भारत-मालदीवमध्ये आज उच्चस्तरीय संरक्षण चर्चा

**नवी दिल्ली, ७ जानेवारी**

मालदीवचे संरक्षण मंत्री मोहम्मद घासन मौमून हे तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून, दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासाठी ते बुधवारी उच्चस्तरीय संरक्षण चर्चेत सहभागी होतील.

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्यासोबत मौमून तपशीलवार चर्चा करतील. या व्यतिरिक्त त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबतही बैठक होणार आहे. चीनसमर्थक समजले जाणारे मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुईझ्झू यांच्या मागणीनुसार भारताने या देशातून लष्करी कर्मचारी मागे घेतल्यानंतर आठ महिन्यांनी मालदीवच्या मंत्र्यांचा हा पहिला दौरा आहे. मालदीवच्या राष्ट्रीय संरक्षण दलांची क्षमता वाढवण्यासाठी प्रशिक्षण, सराव आणि संरक्षण प्रकल्प तसेच संरक्षण उपकरणांचा पुरवठा यासह दोन्ही मंत्री द्विपक्षीय संरक्षण सहकार्याच्या विविध पैलूंचा आढावा घेतील. *(वृत्तसंस्था)*



परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी मंगळवारी ओडिशाच्या पुरी जिल्ह्यातील श्री जगन्नाथ मंदिराला भेट दिली आणि जगन्नाथाचे दर्शन घेतले

## खवाजा बद्रोद्दिन चिश्ती यांच्या ऊरूसास आजपासून प्रारंभ

**परंडा, दि. ७ जानेवारी-**

सूफी संतांनी खऱ्या अर्थाने मानवतेच्या कल्याणाची व त्यांच्या सामुहिक विकासाची मांडणी केली. त्यामुळेच हा देश व प्रदेश सुखी, समृद्ध झालेला आहे. सुमारे ७०० वर्षापुर्वी चौदाशे अवलियांच्या पालकी सोबत खवाजा सय्यद शाह बद्रोद्दिन चिश्ती (रहे.) औरंगाबाद येथे आले. तेव्हा त्यांचे मुर्शीद दिल्लीचे हजरत निजामोद्दिन अवलिया यांनी त्यांना कोंकणात राहून प्रचार करण्याचे आदेश दिले होते. शेवटी त्यांना परंडा येथे समाधिस्थ राहण्याची आज्ञा होती.

खवाजा बद्रोद्दिन औरंगाबादहून पैठण, परंडा, पुणे मार्गे पेणला गेले. तेथे त्यांनी मानवतेच्या कल्याणाचा प्रारंभ केला, असा इतिहास आहे. तिथेच ते शहीद झाले. आपले 'शिर' कुटुंबाच्या हवाली करून मुर्शीदांच्या आदेशानुसार 'शिर' शिवाय 'धडा'ने घोड्यावर स्वार होऊन परंडा येथे येऊन समर्पीत झाले. याच ठिकाणी तेव्हापासून या महात्म्याच्या जीवनकार्याची प्रचिती आली व ऊरूसाच्या रूपाने ती चालू आहे. गेल्या सातशे वर्षांपासुन ही परंपरा चालू आहे. मुतवल्ली युनूस आलम सिद्दीकी यांच्या दर्गाह रोड, मुजावर गल्ली येथून दिनांक ०९ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजतां फातेहखानी (मुजावर गल्ली) होऊन संदल मिरवणूकीस प्रारंभ होईल. मानाच्या घोड्यावर गीलाफ फुलांची चादर चढवून भक्तिभावाने तहसिल कार्यालयात येतो. मुजावर गल्ली, मंगळवार पेठ येथील आलेली मानाची फुलांची चादर मा. तहसिलदार, लोकप्रतिनिधी व मान्यवरांच्या उपस्थितीत फातेहा नंतर मानाची चादर तहसिलदार यांच्या डोक्यावर देऊन, घोड्यावर चादर चढवून ऊरूसाच्या मिरवणुकीस प्रारंभ होतो.

८ जानेवारी रोजी दर्गाह येथे मुजावर व मुतवल्ली युनूस आलम सिद्दीकी यांच्या मार्गदर्शनानुसार कुराण पठण, मिलाद, सलाम दुवा नंतर गुसल, संदल व चादर चढविली जाईल. मौलानांचे वाअजबयान, फातेह खानीनंतर प्रसाद वाटप करण्यांत येता. तनंतर नियोजित वार्षिक ऊरूसास खऱ्या अर्थाने प्रारंभ होतो. द्वेष, मत्सर व समाजातील इतर वाईट प्रवृत्ती नष्ट करून समाजात सर्वधर्मसमभाव, प्रेम, बंधुत्व निर्माण करणाऱ्या सुफी संतांच्या शिकवणीचा आदर करण्याची गरज प्रतिपादन करून, मुतवल्ली युनूस आलम सिद्दीकी, ऊर्स कमेटी व समस्त मुजावर यांनी या ऊरूसानिमित्त सर्व भाविकांनी दिनांक ०८ ते १२ जानेवारी, पर्यंतच्या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# मनुष्यबळ पुरवठा कामाचा रक्षक सिक्युरीटीचा ठेका रद्द

## पंढरपूरच्या श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीचा निर्णय :४.५ कोटीचा होता ठेका

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ जानेवारी -**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरला आवश्यकतेनुसार आऊटसोर्सिंग पध्दतीने कुशल, अर्धकुशल व अकुशल कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक असल्याने विहित प्रक्रिया राबवून ई निविदा राबविण्यात आली होती. त्यामध्ये रक्षक सिक्युरीटी सर्व्हिसेस ॲंड सिस्टम्स प्रा.लि., पुणे यांची ई निविदा मंजुर होऊन ४ जुलै, २०२४ रोजी करारनामा करण्यात आला होता. तथापि, त्यांचेकडून करारनाम्यातील अटी व शर्ती चे पालन होत नसल्याने त्यांचा ठेका रद्द करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

मनुष्यबळ /कर्मचारी पुरवठा कामामध्ये वारंवार नोटीस देऊनही त्या संदर्भात योग्य तो खुलासा व सुधारणा होत नसल्याचे दिसून आले होते. तसेच त्यांच्या कामाबाबत विविध प्रकारच्या लेखी तक्रारी देखील प्राप्त झाल्या होत्या. त्यावर मंदिर समितीच्या १० डिसेंबर, २०२४ रोजीच्या सभेत चर्चा होऊन, संबंधित पुरवठाधारकास अंतिम नोटीस देऊन, त्यांचेकडून लेखी खुलासा घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे ठरले होते. त्यानुसार संबंधित कंपनीला अंतिम नोटीस देण्यात आली होती. त्यावर त्यांनी सादर केलेला खुलासा वस्तुस्थितीला धरून व समाधानकारक नाही. मंदिर समितीने माहे फेब्रुवारी, २०२४ मंदिर समितीला कुशल, अर्धकुशल व अकुशल कर्मचारी पुरवठा करणे कामी ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची अंदाजपत्रकीय रक्कम सुमारे ४ कोटी ५९



विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेची ऐशीतैशी
• मंदिर सुरक्षेचा लाखो रुपयांचा ठेका देवूनही मंदिरात श्वानाची एन्ट्री

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. ४ जानेवारी-
येथील विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेची ऐशीतैशी झाल्याचा अनुभव याचि देहि, याची डोळा प्रत्यक्ष विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मंदिरात उपस्थित असलेल्या शेकडो भाविकांना आज अनुभवयास मिळाला. कारण लाखो रुपये खर्च करुन विठ्ठल मंदिर सुरक्षेचा ठेका दिलेला असताना शनिवारी मंदिरात चक्क एका श्वानाची एन्ट्री झालेली पहावयास मिळाली.

मंदिरातील अंतर्गत सु[illegible]




लाख होती. या प्रक्रियेत १२ पुरवठाधारकाने सहभाग घेतला होता. त्यामध्ये रक्षक कंपनीचा ठेका मंजूर झाला होता. रक्षक कंपनीने नियुक्त केलेले कर्मचारी हे भाविक भक्तांना धक्काबुक्की करतात व त्यांना ढकलून देतात, भाविकांशी नम्रतेने न वागणे, कर्मचारी आयकार्ड व गणवेश परिधान करीत नाही, नेमूण दिलेली सेवा व्यवस्थितपणे पार न पाडणे, मंदिरात प्रवेश करणा-या गेटवर भाविकांची तपासणी न करता मोबाईलसह मंदिरात प्रवेश देऊन करारातील अटी-शर्तीचा भंग करणे, २५ पैकी फक्त २ माजी सैनिक नियुक्त करून करारातील अटीचा भंग केला, कर्मचा-यांना पेमेंट स्लिप न देणे, कर्मचा-यांना चांगले प्रशिक्षण न देणे, सुरक्षा विभागाकडील कर्मचारी कंपनीचे बोधचिन्ह असलेले गणवेश वापरत नाहीत, सेवेच्या ठिकाणी मोबाईल वापरणे व इतर अनुषंगीक गैरवर्तन करीत असल्याच्या बाबी अनेकवेळा निदर्शनास आलेल्या आहेत. याबाबत अनेकवेळा लेखी व मौखिक सुचना करूनही सुधारणा झाली नाही. तसेच नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे वेतन वेळेत अदा न करणे, कर्मचा-यांना दोन नग गणवेश न देणे, पुरवठा आदेशापेक्षा जास्त कर्मचारी नियुक्त करून बिलाची मागणी करणे. याबाबत मंदिर समितीने संस्थे विरूध्द अनेकवेळा कारणे दाखवा नोटीस बजावून व समज देऊन ही सुधारणा होत नसल्याने तसेच वर नमूद अन्य कारणाने करारानुसार दंडात्मक कारवाई वेळोवेळी केली होती.

तथापि, त्यासंदर्भात सुधारणा अथवा कोणतीच कारवाई झाली नाही. सेवा पुरवठा कालावधीच्या एक वर्षातील ६ महिने होऊन देखील सुधारणा नाही व यापूढे देखील सुधारणा होईल असे वरील कारणास्तव वाटत नाही. तसेच सदरचा करार यापूढे देखील सुरू ठेवल्यास, मंदिर समितीची प्रतिमा जनसामान्यात मलिन होईल. त्याचा भाविकांच्या सोई सुविधेवर परिणाम होऊन, त्याचा रोष मंदिर समितीवर येऊ शकतो. त्या संदर्भात थेट प्रसारमाध्यमांतून बातम्या प्रसिध्द होऊन मंदिर समितीची बदनामी झाली आहे, तसेच दि. ४ जानेवारी रोजी भटक्या कुत्र्यांचा मंदिरात मुक्त वावर अशा विविध प्रसारमाध्यमांत बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. यावरून त्यांचेकडील कर्मचारी प्रामाणिकपणे सेवा देत नसल्याचे पून्हा एखदा दिसून आले आहे. त्यामुळे रक्षक सिक्युरीटी सर्व्हिसेस ॲंड सिस्टम्स प्रा.लि., पुणे ही संस्था करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामकाज करू शकत नसल्याने आणि वारंवार नोटीस देऊनही त्या संदर्भात योग्य तो खुलासा व सुधारणा होत नसल्याने, त्यांच्याशी करण्यात आलेला करार रद्द करणे क्रमप्राप्त झाले होते असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

## यंदा अर्थव्यवस्थेचा चार वर्षांतील सर्वांत कमी वेग

**नवी दिल्ली, ७ जानेवारी**

२०२४-२५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग चार वर्षांचा नीचांक गाठून तो ६.४ टक्के असेल, असा अंदाज सरकारी आकडेवारीतून वर्तवण्यात आला. उत्पादन आणि सेवा क्षेत्राच्या निराशाजनक कामगिरीमुळे हा वेग कमी होणार आहे. कोरोनाच्या काळापासून देशाच्या जीडीपीचा ६.४ टक्के हा वेग सर्वांत कमी आहे. कोरोना काळात हा वेग ५.८ टक्क्यांवर होता. २०२१-२२ मध्ये जीडीपी ९.७, तर २०२२-२३ मध्ये ७ टक्के होता. मागील वर्षी मार्चध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात हा वेग ८.२ टक्के होता. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने २०२४-२५ साठी पहिल्यांदा वर्तवलेला आगाऊ अंदाज डिसेंबर २०२४ मध्ये रिझर्व्ह बँकेने वर्तवलेल्या ६.६ टक्क्यांच्या अंदाजापेक्षा कमी आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयाने सुरुवातीला वर्तवलेल्या ६.५ ते ७ टक्क्यांपेक्षाही तो कमी असल्याचे स्पष्ट झाले.

## आसाराम बापूला अंतरिम जामीन

### अनुयायांना भेटण्यास मज्जाव

**नवी दिल्ली, ७ जानेवारी**

बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय कारणास्तव ३१ मार्चपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापूला सुटकेनंतर आपल्या अनुयायांना भेटू नये, असा निर्देश दिला आहे. बापूवर सध्या जोधपूरच्या आरोग्य मेडिकल सेंटरमध्ये उपचार सुरू असून, तो जोधपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत आहेत.

८५ वर्षीय आसाराम बापू २०१३ पासून जोधपूर तुरुंगात बंद आहे. जोधपूर पोलिसांनी आसारामला २०१३ मध्ये एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी इंदूर येथून अटक केली होती. आसारामने आपल्या आश्रमातच अल्पवयीन विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याचा आरोप होता. या प्रकरणी पाच वर्षांच्या प्रदीर्घ सुनावणीनंतर २५ एप्रिल २०१८ रोजी न्यायालयाने आसारामला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. याशिवाय, दुसऱ्या एका प्रकरणातही आसारामला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती.

# जिल्ह्यातील तलाठी भाऊसाहेबांचे आंदोलन सुरू असल्याने अनेकांची खोळंबली कामे!

### जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने तोडगा काढण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

जिल्ह्यातील तलाठी भाऊसाहेबांनी वारंवार मागणी करूनही त्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता होत नसल्याने जिल्ह्यातील तलाठी बांधवांनी सोमवारपासून कामबंद आंदोलन सुरू केले असल्याने शेतकरी बांधव व इतर नागरिकांच्या कामाचा खोळंबा होत आहे. यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या तलाठी बांधवांच्या प्रश्नांकडे लक्ष देवून यावर तोडगा काढावा, अशी अपेक्षा जाणकार नागरिक आणि तलाठी संघाच्या पदाधिकाऱ्यांची आहे.

तलाठी संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, प्रलंबित कालबद्ध पदोन्नतीचे प्रस्ताव, प्रलंबित विभागीय चौकशी, प्रलंबित स्थायी प्रमाणपत्र प्रस्ताव, प्रलंबित वैद्यकीय बिले, अतिरिक्त कार्यभार वेतन, सेवापुस्तके अद्ययावत करणे, मासिक वेतन वेळेवर न होणे, नवीन लॅपटॉप व स्कॅनरसह प्रिंटर, ग्राम महसूल अधिकारी सेवाजेष्ठता यादी, लोकसभा निवडणूक अतिकालिक भत्ता, इ. आदी अत्यावश्यक मागण्या तात्काळ पूर्ण होणे आवश्यक आहेत.

यातील महत्वाच्या मागण्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये काम केलेल्या ग्राम महसूल अधिकारी यांना मूळ वेतन अतिकालिक भत्ता म्हणून देण्यात येतो परंतु सोलापूर जिल्ह्यामध्ये अद्याप अतिकालिक भत्ता मिळालेला नाही. इतर जिल्ह्यांमध्ये सर्वत्र अतिकालिक भत्त्याचे वाटप करण्यात आलेले आहे. तरी सदरचा भत्ता त्वरित मिळावा, जिल्ह्यातील अनेक ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी यांना पूर्वी मिळालेले लॅपटॉप व प्रिंटर कालबाह्य झालेले आहेत. त्यांना नवीन लॅपटॉप व प्रिंटर मिळणे आवश्यक आहे. तसेच नवीन ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) सज्जावर रुजू झालेले असून, त्यांचेकडे सदर सज्जाचा कार्यभार हस्तांतरित झालेला आहे. परंतु लॅपटॉप व प्रिंटर नसल्याने त्यांना दैनंदिन कामकाज करताना अनेक अडचणी येत आहेत व खातेदारांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.

# एनटीपीसचा ३ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी बांबू लागवडीचा नवा प्रस्ताव

### सोलापूरसह धाराशिव, लातूरचा समावेश

### ५० वर्षांसाठी कंपन्यांसोबत करार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. जानेवारी-**

एनटीपीसी अर्थात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळाच्या सोलापूर येथील ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी कोळशामध्ये मिसळण्यासाठी बांबू बायोमास खरेदी करणार आहे. यादृष्टीने शाश्वत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांसोबत पन्नास वर्षांसाठी प्रारंभिक करार केले जातील.

पर्यावरण संवर्धनासाठी बायोमासवर आधारित ऊर्जा प्रकल्प ही काळाची गरज आहे, असे एनटीपीसीचे अध्यक्ष गुरदीप सिंह यांनी सांगितले. सोलापूर येथील एनटीपीसी संयंत्रासाठी दरवर्षी चार दशलक्ष इतक्या कोळशाची गरज असते. सुरुवातीच्या टप्प्यात दहा टक्के बायोमास मिसळल्यास दरवर्षी अंदाजे ४००,००० टन बायोमास लागेल. बांबूंची उपलब्धता जसजशी वाढत जाईल तसतसे हे प्रमाण २०३०% वाढवता येईल, असे ते म्हणाले. बांबू बायोमासची खरेदी लगेच करण्यासाठी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांसोबत दीर्घ कालावधीचे करार करण्यासाठी एनटीपीसी तयार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. या उपक्रमामुळे सोलापूर, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील बांबू उत्पादक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ होईल, असे ते म्हणाले. एनटीपीसीच्या अध्यक्षांनी या बैठकीत अशा प्रकारच्या पहिल्यांदाच होत असलेल्या या उपक्रमाचा तपशील सांगितला.




या बैठकीला महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण सिंग परदेशी, मुख्यमंत्र्यांच्या पर्यावरण आणि शाश्वत विकास कृती दलाचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल आणि एनटीपीसीचे सोलापूर प्रकल्प प्रमुख तपनकुमार बंदोपाध्याय, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, एनटीपीसीचे प्रादेशिक कार्यकारी संचालक कमलेश सोनी यांसारखे प्रमुख अधिकारी तसेच मित्रा आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होते.

२६ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एनटीपीसीच्या अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रानंतर धाराशिव, लातूर आणि सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी धोरणे आखण्याच्या उद्देशाने आठवड्याभरात ही बैठक बोलावण्यात आली.

कालव्यांच्या, रस्त्याच्या कडेला आणि शेतांजवळ मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड केली जाते आणि सोलापूर एनटीपीसी प्रकल्प पूर्णपणे बांबू बायोमास वापरू शकतो. ही बाब शेतकऱ्यांना आणि शाश्वत लागवड पद्धतींसाठी उपयुक्त ठरेल, असे पाशा पटेल यावेळी म्हणाले. शेतकऱ्यांना मनरेगाद्वारे देण्यात येणारे प्रति हेक्टर ७.04 लाख रुपये यासारख्या अनुदानाचा लाभ घ्यावा असे आवाहन पटेल यांनी केले. याव्यतिरिक्त, १० हेक्टरपर्यंत बांबू लागवडीसाठी आशियाई विकास बँक देत असलेल्या अनुदान योजनेचा त्यांनी उल्लेख केला. बांबू लागवडीसाठी ही संस्था आवश्यक सहकार्य करेल आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना या कामात पुढाकार घेण्यासाठी प्रोत्साहित करेल, असे आश्वासन प्रवीणसिंह परदेशी यांनी दिले. बांबूच्या बायोमास गोळ्यांवर प्रक्रिया करण्यासाठी सीएसआर उपक्रम द्वारे यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याच्या योजनांचाही त्यांनी उल्लेख केला.

### शेतकरी उत्पादक कंपन्यांचे स्वागत

''विक्रीच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी पूर्वी बांबूची लागवड करण्यास कचरत होते. एनटीपीसीने ५० वर्ष बांबू खरेदी कराराचे आश्वासन दिल्याने बांबू विक्रीचा प्रश्न आता सुटला आहे'', असे शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी या उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले.

## सराईत महिला गुन्हेगार संगीता जाधव दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी -**

सराफ दुकानांमधून सोन्या-चांदीचे दागिने चोरणारी सराईत महिला गुन्हेगार संगीता जाधव हिला पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीनंतर संगीता जाधवला ठाणे येथे सोडण्यात आले.



संगीता शेखर जाधव (वय ४५, रा. घर नं. ५८, चर्च जवळ, धोंडीबा वस्ती, रामवाडी, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या महिला गुन्हेगाराचे नाव आहे. संगीता जाधव हिच्याविरुध्द सन २०२३ व २०२४ मध्ये बुरखा घालून सोने-चांदी विक्रिच्या दुकानात जाऊन त्याठिकाणी दुकानातील कामगारांना बोलण्यामध्ये व्यस्त ठेऊन त्यांची नजर चुकवून सोन्या-चांदीचे दागिन्यांची चोरी करणे, चोरी करताना त्यांना कोणी पकडल्यास त्यांच्याविरुध्द विनयभंगाची तक्रार देणे, सोबत असलेल्या पुरुषांकडून प्रसंगी मारहाण करण्यास लावणे अशास्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे संगीता जाधव हिला तडीपार करण्या बाबतचा प्रस्ताव जेलरोड पोलिसांकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्या प्रस्तावास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत संगीता जाधव हिला सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर संगीता जाधव हिला पोलिसांनी ठाणे येथे सोडले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# भारताशी वैर : ट्रुडोंची गच्छंती

भारतविरुद्ध कारवाया करणाऱ्या खलिस्तान्यांना राजाश्रय देण्याचे पाप करणाऱ्या कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांना अखेर पायउतार व्हावे लागले. भारताविरोधात घेतलेल्या भूमिकेचा फटका त्यांना बसला आहे. खलिस्तानी दहशतवाद्यांची पाठराखण करताना सातत्याने भारताच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या ट्रुडो यांना त्यांच्याच लिबरल पक्षातून तीव्र विरोध झाला. या विरोधामुळे शेवटी त्यांना राजीनामा द्यावा लागला. हरदीप निज्जरच्या हत्येप्रकरणी ट्रुडो यांच्या नेतृत्वातील ट्रुडो सरकारने भारताला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. भारताने कॅनडा सरकारचा आरोप फेटाळूनही लावला होता. हा मुद्दा त्यावेळी एवढा तापला होता की, दोन्ही देशांनी आपापल्या राजनयिकांना माघारी बोलावले होते. तेव्हापासून दोन्ही देशांमधील परस्पर संबंध ताणलेले होते आणि आजही तसेच आहेत. ट्रुडो पायउतार झाल्यानंतर संबंधांमध्ये सुधारणा होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. ट्रुडो यांच्याशी माझे थेट संबंध आहेत आणि भारताच्या विरोधातील माहिती मी त्यांना दिली, असा दावा खलिस्तानी दहशतवाद्यांचा नेता गुरपतवंत सिंह याने केला होता. या गुरपतवंतने ट्रुडो यांना जणू कह्यात घेतले होते असे वाटावे एवढे ट्रुडो भारताविरोधात बोलायला लागले होते. कॅनडाचे सरकार खलिस्तानी दहशतवाद्यांना पाठिंबा देते आहे असा आरोप भारतानेही केला होता. गुरपतवंतच्या दाव्याने त्याला एकप्रकारे पुष्टी मिळाली होती. ट्रुडो यांनी खलिस्तान्यांना पाठिंबा देताना भारताशी संबंध बिघडतील याची कधी पर्वा केली नाही. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी राबविलेली धोरणे आणि घेतलेली भारतविरोधी भूमिका यामुळे सत्ताधारी लिबरल पक्षातच असंतोष निर्माण झाला होता. असंतोष हळूहळू वाढत गेला आणि त्याचा उद्रेक होताच त्यांना राजीनामा द्यावा लागला. नव्या पंतप्रधानाची निवड होईपर्यंत ट्रुडो आता फक्त काळजीवाहू पंतप्रधान असतील. जस्टिन ट्रुडो यांनी राजीनामा देण्यामागे वेगवेगळी कारणे असल्याचे बोलले जातेय. जस्टिन ट्रुडो यांच्यावर दबाव होता. यात डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून सातत्याने केले जाणारे ट्रोलिंग तसेच स्वकीयांकडूनच बंडखोरीची भीती अशी अनेक कारणे आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकल्यापासून डोनाल्ड ट्रम्प हे जस्टिन ट्रुडो यांना सतत ट्रोल करत होते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकताच ट्रम्प यांनी ट्रुडोंना अमेरिकेच्या ५१ व्या राज्याचे गव्हर्नर म्हटले होते. ट्रम्प यांच्या विधानाचा अर्थ स्पष्ट होता, ते कॅनडाला अमेरिकेचे ५१ वे राज्य मानतात. इतकेच नाही, ट्रुडो अमेरिकेत ट्रम्प यांना भेटायला गेले, त्यावेळी त्यांच्यासोबतचा फोटो शेअर करताना ट्रम्प यांनी ट्रुडोंना 'अमेरिकी राज्य कॅनडाचे गव्हर्नर', असे म्हटले होते. ट्रम्प यांच्या या विधानामुळे कॅनडामध्ये ट्रुडो यांची खिल्ली उडवली जात होती. त्याशिवाय ट्रम्प यांनी कॅनडावर २५ टक्के टॅरिफ आकारण्याची धमकी दिली होती. जस्टिन ट्रुडो यांच्या धोरणांमुळे त्यांच्या पक्षाच्या नेत्यांवरच बंडखोरीची वेळ आली होती. २०२४ च्या अखेरीस ट्रुडो यांच्या मंत्रिमंडळात राजीनाम्याची लाटच आली. १९ सप्टेंबर २०२४ ला परिवहन मंत्री पाब्लो रोड्रिग्ज यांनी राजीनामा दिला. २० नोव्हेंबर २०२४ ला अल्बर्टाचे खासदार रँडी बोइसोनॉल्ट यांनी राजीनामा दिला. १५ डिसेंबर २०२४ रोजी गृहनिर्माण मंत्री सीन फ्रेजर यांनी कौटुंबिक कारणांचा हवाला देत कॅबिनेट सोडण्याचा मनसुबा बोलून दाखवला. कहर तर तेव्हा झाला, जेव्हा १६ डिसेंबर २०२४ रोजी क्रिस्टिया फ्रीलँड यांनी उपपंतप्रधानपदाचा आणि अर्थमंत्री पदाचा राजीनामा दिला. मंत्रिमंडळातील सहकारी एकापाठोपाठ एक राजीनामा देत असल्यामुळे जस्टिन ट्रुडो यांच्यावर दबाव वाढला होता. कॅनडामध्ये एका बाजूला महागाई वाढत चालली होती. दुसऱ्या बाजूला बेरोजगारी सुद्धा वाढत होती. ट्रुडो यांच्या लिबरल पार्टी विरोधात कन्झर्व्हेटिव्ह पार्टीने हा मोठा मुद्दा बनवला होता. कॅनडामध्ये कोविडनंतर बेरोजगारीचा दर जवळपास ६.५ टक्क्यांपर्यंत पोहोचला. घरांच्या किमती सातत्याने वाढत आहेत, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा जस्टिन ट्रुडो यांच्यावरील रोष वाढत गेला. त्याची परिणती त्यांच्या राजीनाम्यात झाली. मधल्या काळात भारत आणि कॅनडात तणाव निर्माण झाला असताना भारताने आपल्या नागरिकांसाठी एक ॲडव्हायझरी जारी केली होती, हेही आपल्याला स्मरत असेलच. भारत सरकारच्या वतीने असे सांगण्यात आले होते की, परिस्थिती पाहता आम्ही आमच्या नागरिकांना सल्ला देतो की, कॅनडाच्या ज्या भागात भारतविरोधी कारवाया झाल्या आहेत, त्या भागात जाणे टाळावे. भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी आमचे उच्चायुक्त आणि महावाणिज्य दूतावास कॅनडाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत. कॅनडामधील ढासळत चाललेली सुरक्षा परिस्थिती पाहता तेथे उपस्थित असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना अत्यंत सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला होता. भारतीय समुदाय आणि विद्यार्थी उच्चायुक्तालय आणि वाणिज्य दूतावासांच्या वेबसाईटवर तक्रारी नोंदवू शकतात, असेही त्यावेळी सांगण्यात आले होते. एकूण काय, तर ट्रुडो यांच्या सरकारने खलिस्तानी दहशतवाद्यांची बाजू घेत भारतीयांच्या हिताकडे दुर्लक्ष केल्याने तणाव आणखी वाढला होता. हा तणाव कमी करण्यासाठी ट्रुडो प्रशासनाने कोणतेही प्रयत्न केले नाहीत. उलट, तणाव कसा वाढेल यादृष्टीनेच त्यांचे धोरण राहिले. त्यामुळे दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये कटुता आली, ती वाढत गेली. भारत सरकार आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आणि कॅनडाला वाकवण्याचा यशस्वी प्रयत्नही केला. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पंतप्रधान मोदींच्या पाठिंब्याने कणखर भूमिका घेतल्याने भारताच्या प्रतिष्ठेतही वाढ झाली. भारताचे परराष्ट्र धोरण किती मजबूत आणि स्पष्ट आहे, हेही यानिमित्ताने अधोरेखित झाले. भारताचा मोस्ट वॉन्टेड खलिस्तानी दहशतवादी हरदीप निज्जर कॅनडात ठार झाला होता. त्याच्या हत्येमध्ये भारताचा सहभाग असल्याचा आरोप कॅनडाने खलिस्तान्यांची बाजू घेताना केला होता. त्यामुळे भारताशी संघर्षाच्या मुद्यावरून कॅनडाचे विरोधक पंतप्रधान ट्रुडो यांच्यापासून दूर असल्याचे दिसत होतेच. विरोधी पक्षनेते पीअर पॉलिव्हर सोशल मीडियावर असे म्हणाले होते, आमच्या पंतप्रधानांनी स्पष्ट आणि थेट बोलले पाहिजे. त्यांच्याकडे पुरावे असतील तर त्यांनी ते जनतेसमोर मांडावेत. हे घडल्यावरच कोण बरोबर आणि कोण चूक हे लोक ठरवू शकतील. आश्चर्याची बाब म्हणजे ट्रुडो कोणतेही तथ्य मांडत नव्हते. त्यामुळे विरोधी पक्षांनीसुद्धा ट्रुडो यांच्या भूमिकेचे कधी समर्थन केले नव्हते, ही भारताच्या दृष्टीने जमेची बाजू होती. भारतासोबत तणावाचे वातावरण असताना कॅनडाच्या एका सरकारी अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर न्यू यॉर्क टाईम्सशी बोलताना सांगितले होते की, अनेक देशांच्या मदतीने हरदीप निज्जरच्या हत्येची माहिती गोळा करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर याबाबतची संपूर्ण माहिती दिली जाईल. आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की, कॅनडा हा 'फाईव्ह आइज' नावाच्या इंटेलिजन्सस अलायन्सचा एक भाग आहे. कॅनडाशिवाय यात अमेरिका, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियाचा समावेश आहे. कॅनडाच्या अधिकाऱ्याच्या या कथनाचा अर्थ काय? कॅनेडियन प्रशासनाला घटनाक्रमाची संपूर्ण माहिती होती. असे असतानाही कॅनेडियन प्रशासनाने खलिस्तान्यांच्या दबावाखाली भारतावर आरोप केला. पुरावे असल्याच्या फक्त बाता मारल्या. भारताने मात्र पहिल्या दिवसापासून स्पष्ट भूमिका घेत कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. त्यावेळी परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की, कॅनडाचे सर्व आरोप हास्यास्पद आहेत. असेच आरोप कॅनडाच्या पंतप्रधानांनी आपल्या पंतप्रधान मोदींवर केले होते आणि ते पूर्णपणे फेटाळण्यात आले होते. असे बिनबुडाचे आरोप म्हणजे खलिस्तानी दहशतवादी आणि अतिरेकी यांच्यापासून लक्ष हटवण्याचा प्रयत्न आहे. त्यांना कॅनडात अभय देण्यात आले असून, ते भारताच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेला धोका आहे. भारताची ही भूमिका कॅनडाच्या जिव्हारी लागली नसती तरच नवल!

---

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# नवीन वर्षात अर्थव्यवस्था सुधारणार

निश्चितपणे, नवीन वर्ष २०२५ च्या आर्थिक संभाव्यतेवर जागतिक आर्थिक आणि वित्तीय संस्थांनी प्रकाशित केलेल्या विविध अहवालांनुसार, २०२५ हे वर्ष भारतासाठी उज्ज्वल आर्थिक संभावनांचे वर्ष असेल. नवीन वर्षात, भारतीय अर्थव्यवस्था गतवर्षी २०२४ पासून आलेल्या आर्थिक आव्हानांना तोंड देत यशस्वीपणे पुढे जाईल आणि जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून लक्ष वेधून घेईल. गेले वर्ष २०२४ पासून नवीन वर्ष २०२५ मध्ये आपल्याला मिळणारा आर्थिक वारसा पाहिला तर आपल्या लक्षात येते की, या वारशात अनेक आव्हाने असली, तरी विकासासाठी अनेक मजबूत आर्थिक पायादेखील आहेत. गेल्या वर्षी ८ टक्के विकास दराने सुरुवात झाली असली, तरी गेल्या वर्षी जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत केवळ ५.४ टक्के विकास दर राहिल्याने अनेक आर्थिक गणिते चुकली. गेल्या वर्षभरात भारताच्या आर्थिक परिस्थितीवर महागाई आणि रोजगार हे चिंतेचे प्रमुख मुद्दे राहिले आहेत.

महागाईच्या आघाडीवरील अडचणी जवळपास बहुतेक महिने कायम होत्या. विशेषतः नोव्हेंबर २०२४ नंतर, पुन्हा एकदा घाऊक आणि किरकोळ महागाई वाढू लागली आणि महागाई रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या मर्यादेबाहेर राहिली. गेल्या वर्षभरात शहरी बेरोजगारी कमी झाली असली, तरी असंघटित क्षेत्रातील रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. परकीय व्यापार तूटही वाढली. वर्षभर रुपयाची घसरण सुरूच होती. वर्षभर डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य कमी होत राहिले आणि डिसेंबर २०२४ मध्ये डॉलरच्या तुलनेत रुपया ८५ च्या खाली आला. २०२४ मध्ये देशाच्या परकीय चलनाचा साठा कधी कमी होत होता तर कधी वाढत होता. परकीय चलनाचा साठा सुमारे ६५२ अब्ज डॉलरच्या पातळीवर घसरला आहे. निश्चितपणे, नवीन वर्ष २०२५ लादेखील मागील वर्षाच्या तुलनेत आर्थिक विकासाचा भक्कम पाया मिळाला आहे. अर्थतज्ज्ञ व्यवसाय आणि आर्थिक वाढीबद्दल एकमताने आशावादी आहेत आणि देशाचा मजबूत ताळेबंद मांडत आहेत तसेच विकासाभिमुख संकेत देत आहेत. त्यामुळे कृषी, खाणकाम, बांधकाम आणि औद्योगिक उत्पादनाला अधिक गती मिळेल, असे बोलले जात आहे. नवीन द्विपक्षीय व्यापार वाटाघाटी आणि नवीन मुक्त व्यापार करार (एफटीए) आकार घेताना दिसतील.

विशेषतः सिमेंट, वीज, हॉटेल, वाहतूक, ऑटो मोबाईल, फार्मा, केमिकल, फूड प्रोसेसिंग, टेक्सटाईल, ई-कॉमर्स, बँकिंग, मार्केटिंग, डेटा ॲनालिसिस, सायबर सिक्युरिटी, आयटी, पर्यटन, किरकोळ व्यापार या क्षेत्रांमध्ये वेगाने वाढ होईल. त्यामुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढताना दिसतील. नवीन वर्ष २०२५ मध्ये निफ्टी नवीन उंची गाठताना दिसेल. यासोबतच सोन्या-चांदीच्या दरातही नवी वाढ पाहायला मिळणार आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, नवीन वर्ष २०२५ मध्ये स्थानिक आणि देशांतर्गत बाजाराची ताकद अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर ठरेल. स्वावलंबनाचे धोरण आणि स्थानिकांसाठी व्होकल हा मंत्र घेऊन गेल्या १० वर्षांत देशाने ज्या वेगाने प्रगती केली आहे, त्याचा नवीन वर्षात अधिक फायदा होणार आहे. डेलॉईट इंडियाचा इंडियाज होम ॲण्ड हाऊसहोल्ड मार्केट रिपोर्ट सांगतो की, भारताचा स्थानिक बाजार १० टक्क्यांहून अधिक चक्रवाढ वार्षिक वाढ दराने (सीएजीआर) वाढेल आणि या वेगाने भारताचा स्थानिक बाजार २०३० पर्यंत सुमारे २३७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकेल.

नवीन वर्षात देशाच्या कानाकोपऱ्यात 'मेक इन इंडिया' मोहिमेची ताकद वाढणार हे नक्की. भारत जगातील तिसरे सर्वांत जास्त मागणी असलेले उत्पादन गंतव्य म्हणून उदयास येईल. चीनमधून आयात होणारी औषधे, रसायने आणि इतर कच्च्या मालाला पर्याय निर्माण करण्यासाठी देशात लागू केलेल्या उत्पादन लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआई) योजनेचे अधिक चांगले परिणाम दिसून येतील. नवीन वर्ष २०२५ मध्ये कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, यात शंका नाही. देशातील शेतीचा दर्जा सुधारणे, शेतीतील नावीन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देणे, खर्च कमी करणे आणि उत्पादनासोबतच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे ही अभूतपूर्व मोहीम पुढे सरकताना दिसेल. सरकारला गेल्या वर्षीपासून मिळालेल्या चांगल्या मान्सूनमुळे नवीन वर्षात ग्रामीण अर्थव्यवस्था झपाट्याने वाढेल आणि ग्रामीण भागातील खपही वाढेल, यात शंका नाही. देशातील कृषी क्षेत्राची झपाट्याने प्रगती होईल. उल्लेखनीय बाब ही आहे की, पीक वर्ष २०२३-२४ मध्ये अन्नधान्य उत्पादन ३२.२२ कोटी टनांच्या विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. २०२३-२४ मध्ये गहू आणि तांदळाचे अधिक उत्पादन झाले आहे. गव्हाचे विक्रमी उत्पादन ११३२.९२ लाख टन आणि तांदळाचे उत्पादन १३७८.२५ लाख टनांवर पोहोचले. सरकारच्या नवीन कृषी विकास धोरणामुळे नवीन वर्षात अन्नधान्य उत्पादन विक्रमी पातळीवर पोहोचेल, असा अंदाज आहे. नवीन वर्ष २०२५ मध्ये भारतातील कर संकलनात मोठी वाढ होणार असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. उद्योग आणि व्यवसायात सुधारणा झाल्याने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलन वाढेल. चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान जीएसटी संकलन गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ९ टक्क्यांनी वाढून १४.५६ लाख कोटी रुपये झाले आहे. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत जास्त आयकर परतावा आणि अधिक प्राप्तिकर संकलनाची परिस्थिती दिसून येत आहे. चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ७.२८ आयकर रिटर्न भरले गेले. वेगाने वाढणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेतील वाढती उद्योग उलाढाल, सेवा क्षेत्र, शेअर बाजार आणि मध्यमवर्गाची क्रयशक्तीची नवी उंची यामुळे नवीन वर्षात देशातील कर संकलनात मोठी वाढ होईल, यात शंका नाही. यामुळे पायाभूत सुविधा, सामाजिक सेवा आणि जीवनमान सुधारण्याची सरकारची क्षमता वाढेल. सरकारच्या हातात कर महसूल वाढल्याने अर्थव्यवस्थेचे नूतनीकरण होण्यास मदत होईल.

नवीन वर्षात निर्यात आणि परकीय गुंतवणुकीत वाढ होण्याची शक्यताही महत्त्वाची आहे. सरकारच्या आर्थिक नियंत्रण धोरणांमुळे भारत नवीन वर्ष २०२५ मध्ये वित्तीय तूट नियंत्रित करण्यात यशस्वी होताना दिसेल. ट्रम्प जानेवारी २०२५ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर चीनवर मोठ्या प्रमाणात व्यापारी निर्बंध लादण्याची शक्यता वाढेल. त्यामुळे भारत हा नवा जागतिक पुरवठादार देश बनण्याची शक्यता वाढेल. नवीन वर्षात भारतीय शेअर बाजाराचा मार्ग कठीण होणार नाही, शेअर बाजाराला सर्वोच्च उंचीवर नेण्यात देशांतर्गत निधी महत्त्वाची भूमिका बजावेल आणि कॉर्पोरेट कमाईला चालना मिळेल. आर्थिक सुधारणा, कृषी सुधारणा, मेक इन इंडिया, निर्यात वाढविणे आणि ग्रामीण भागातील उत्पन्न वाढविणे या दिशेने सरकारच्या धोरणात्मक प्रयत्नांमुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल. नवीन वर्षात भारताचा विकास दर ७ टक्क्यांच्या पातळीवर असेल आणि सध्या जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला भारत नव्या वर्षात जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर वेगाने वाटचाल करेल आणि तितक्याच वेगाने आर्थिक विकासासोबत देशाचा विकास होईल तसेच देशभरातल्या सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावरही आर्थिक हास्यही पसरलेलं दिसेल.

९९८७७४६७७६

---

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# कठोपनिषदातील यम आणि नचिकेता संवाद



आपल्या भारतीय तत्त्वज्ञानात साधारणतः वेदांच्या एक लाख श्रुती असून त्या १) कर्मकांड २) उपासनाकांड ३) ज्ञानकांड अशा तीन भागांत विभागल्या आहेत. यातील ज्ञानकांड केवळ चार हजार श्रुतींचे असून हे ज्ञानकांड अंतिम असल्यामुळे याला 'वेदांतशास्त्र' म्हटले आहे. वेदांतामध्ये ब्रह्मविद्येचे गुह्यज्ञान आहे. उपनिषद हे वेदांतावरील भाष्य असून त्यात आत्मस्वरूपाचे चिंतन आहे. उपनिषदे अनेक म्हणजे ज्यांची १०८ नावे उपलब्ध आहेत. परंतु श्रीमद्‌भगवत्पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी दशोपनिषदावर भाष्य केले असल्यामुळे दहा उपनिषद प्रमुख मानले जातात. या उपनिषदांनाच आदिशंकराचार्यांनी प्रस्थानत्रयीमध्ये स्थान दिले आहे. इतर उपनिषदांचेही महत्त्व आहेच; त्यांना 'गौण उपनिषद' असे म्हणतात.

दशोपनिषदात १) ईशोपनिषद, २) कठोपनिषद, ३) केनोपनिषद, ४) प्रश्नोपनिषद, ५) मुंडकोपनिषद, ६) मांडुक्योपनिषद, ७) ऐतरेयोपनिषद, ८) तैत्तरीयोपनिषद, ९) छांदोग्योपनिषद, १०) बृहदारण्यक उपनिषद. अशी ही १० उपनिषदे असून ते चार वेदांतील वेदांतशास्त्रानुसार आहेत. ज्यामध्ये- १) ऋग्वेदीय श्रुतींपासून ऐतरेय उपनिषद २) यजुर्वेदापासून कठोपनिषद, तैत्तरीय, बृहदारण्यक, ईशावास्य उपनिषद ३) सामवेदातून केन आणि छांदोग्य उपनिषद ४) अथर्वेदापासून प्रश्न, मुंडक आणि मांडुक्य उपनिषद निर्माण झालेत. तसे तर 'उपनिषद' या शब्दाचे अनेक अर्थ विद्वानांनी लावले, पण त्यातल्या त्यात सर्वांत सोपा अर्थ म्हणजे गुरूजवळ बसून संक्रमित केलेला, समजून घेतलेला वेदांचा गूढार्थ होय. उप म्हणजे सान्निध्य आणि नि म्हणजे निश्चित आणि षत् म्हणजे यथार्थ. आचार्यांच्या सान्निध्यात बसून मिळविलेले यथार्थ ज्ञान म्हणजे उपनिषद होय.

कठोपनिषद हा तिसरा उपनिषद आहे. वेदव्यासांच्या चार शिष्यांपैकी ऋषी वैशंपायन होते. या वैशंपायन ऋषींचे शिष्य होते आचार्य कठऋषी. कठोपनिषदाचे कर्तेऋषी आचार्य कठ असल्यामुळे नाव पडले कठोपनिषद. कठोपनिषदाची सुरुवात कथेने झालेली आहे. ब्रह्मविद्या जड वाटू नये, सहज समजावी म्हणून कथा प्रयोजन असते. आपल्या पूर्वजांमध्ये वाजश्रवा नावाचे ऋषी होते. त्यांच्या पुत्राचे नाव वाजश्रवस ऋषी. या वाजश्रवस ऋषींनी विश्वजित यज्ञ केला. या यज्ञात दानधर्माचे महत्त्व असल्याने त्यांनी गोदान संकल्प केला. गाई दान करताना त्या गाई पीतोदका, जग्धतृणा, दुग्धदोहा आणि नीरिंद्रिया होत्या.

पीतोदका जग्धतृणा, दुग्धदोहा नीरिंद्रियाः ।
अनंदा नाम ते लोकस्तान्स, गच्छति ता ददत् ॥

म्हणजे त्या गाई शेवटचे पाणी आणि गवत खाल्लेल्या, ज्यांनी दूध देणे बंद केले, ज्या वांझ झालेल्या आहेत. ज्या गाई गलितगात्र, मरणोन्मुख होत्या.

या वाजश्रवस ऋषींना एक पुत्र होता त्याचे नाव नचिकेता होते. हा कुमारावस्थेतील नचिकेता हे सर्व पाहत होता. आपल्या पित्याकडून अशा गाई दिल्या जात असल्याने पुण्यकर्म घडणार नाही म्हणून तो आपल्या पिताश्रीजवळ जाऊन 'मला कोणाला दान देता?' असा प्रश्न पित्याला करू लागला. पित्याने पहिल्यांदा दुर्लक्ष केले, पण हाच प्रश्न त्याने तीन-तीनदा विचारल्यावर रागाने चिडून ते वाजश्रवस ऋषी आपल्या पुत्राला म्हणजे नचिकेत्याला म्हणाले, ''जा! तुला यमाला दान केले!''

नचिकेत्याने वडिलांची आज्ञा प्रमाण मानून यमाकडे जाण्याची परवानगी मागितली. तेव्हा 'मी रागाच्या भरात बोललो' असे वडिलांनी प्रतिपादन केले. नचिकेता आणि पिता वाजश्रवस यांचा शास्त्रोक्त संवाद झाल्यावर त्यानंतर अंतिमतः वडिलांची आज्ञा घेऊन नचिकेता यमाच्या द्वारावर येतात. यावेळी यम बाहेर गेलेले होते. तीन दिवस-रात्र नचिकेता यमसदनी उपवास करून राहिले. यमधर्म परत आल्यावर अतिथी म्हणून यमांनी नचिकेत्याचे पाद्यपूजन, वस्त्रालंकार देऊन अतिथी भोजन केले. 'माझ्यामुळे तुम्हाला तीन दिवस प्रतीक्षा करावी लागली म्हणून मी तुम्हाला तीन वर देतो' असे यमांनी नचिकेत्याला म्हटल्यावर नचिकेत्याने तीन वर मागितले.

शांतसंकल्पः सुमना यथा स्यात वीतमन्यु गौतमो माऽभि मृत्यो ।
त्वत्प्रसृष्टम् माऽभिवदेत्प्रतीत एतत् त्र्याणाम् प्रथमं वरं वृणे ॥

१) माझे वडील माझ्यावर रागावले आहेत, त्यांचा माझ्यावरील राग कमी करून त्यांना शांतसंकल्प करा.

स्वर्गलोका अमृतत्वं भजंते एतद् द्वितीयेन वृणे वरेण ॥

२) ज्या तत्त्वाने अमृतत्व प्राप्ती होते, ते तत्त्व माझ्यात संक्रमित करा.

येयं प्रेते विचिकित्सा मनुष्ये अस्तीत्येके नायमस्तीति चैके ।
एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाऽहं वराणामेष वरस्तृतीयः ॥

३) मला मृत्युरहस्यविषयक ज्ञान द्या.

सूर्यपुत्र यमधर्म आणि नचिकेता यांचा संवाद कठोपनिषदात असून यमाने सुरुवातीला तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देण्यास असमर्थता दर्शवत दुसरा एखादा वर मागण्याची नचिकेत्याला विनंती केली. यमराजांनी त्याला अनेक प्रलोभनेही दाखविली. इतर काहीही माग, पण मृत्यूविषयक ही ब्रह्मविद्या मागू नको; पण नचिकेता ठाम होता.

जीविष्यामो यावदीशिष्यसि त्वं वरस्तु मे वरणीयः स एव ॥

'मला मी मागितलेलाच वर दे' यावर तो अडीग राहिला. त्यामुळे यमाने नचिकेत्याला जी ब्रह्मविद्या सांगितली ती कठोपनिषदात आहे.

९८२२२६२७३५

---

## वेध

**विजय निचकवडे**

# आजन्म बंदी; पण मानसिकतेचे काय?

आम्ही प्रत्येक गोष्टीचा अतिरेक करीत सुटलो आहोत. आपल्या अतिरेकी वर्तणुकीचा काय परिणाम होऊ शकतो? याचा विचार करण्याची शक्तीही गमावून बसलो आहोत. अशाच अतिरेकी पर्यटनाचा अनुभव ३१ डिसेंबरच्या निमित्ताने आला आणि पर्यटकांवर पर्यटनाला आजन्म बंदीसारखी कारवाई पुढे आली. कदाचित हे एका अर्थाने योग्यही आहे. स्वतःच्या आनंदासाठी प्राण्यांना वेठीस धरून आसुरी आनंदाचा अनुभव घेणे म्हणजे पर्यटन असेल तर मग मात्र अशा पर्यटनाला चाप बसलाच पाहिजे. पण यासोबतच अगतिक मानसिकता बदलणेही तेवढेच महत्त्वाचे ठरेल.

जंगलात जातो, म्हणजे आम्ही फक्त वाघ्रदर्शन करण्यासाठी! वाघ दिसला तर आमची पर्यटनवारी सफल झाल्याचा आनंद आमच्या चेहऱ्यावर दिसतो. याला काही अपवादही असतात, जे निसर्गाच्या सान्निध्यात निवांत वेळ घालून खऱ्या अर्थाने पर्यटन जगतात. पण सध्या पर्यटनाच्या नावाखाली घातला जाणारा गोंधळ नक्कीच चिंतेचा विषय! आज व्याघ्र संवर्धनासाठी नाना तऱ्हेचे उपक्रम शासन स्तरावर राबविले जात आहेत. तरीही यंत्रणांच्या डोळ्यात धूळ झोकून वाघांची शिकार केली जातच आहे. दोन दिवसांपूर्वी भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यात घनदाट जंगलात चार तुकड्यांमध्ये आढळून आलेला मादी वाघाचा मृतदेह प्रचंड क्लेशदायी असाच आहे. ही घटना पाहून खरंच, लोकांना कशाचेच भय राहिले नाही, याची खात्री पटते. कधी कधी यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्याविषयीसुद्धा आपसूकच शंकेची पाल मनात चुकचुकून जाते.

वाघांचे हल्ले, त्याचे मानवी वस्तीत येणे याचा कायमच गवगवा आम्ही करतो. मग वाघाच्या घरात म्हणजेच जंगलात जाऊन त्याला वेठीस धरीत पर्यटनाचा आनंद घेण्याच्या प्रकारावर कधीच वन्यप्रेमी का विचार करीत नाही. अशा पर्यटकांविषयी वन्यजीवांसाठी झटणाऱ्या संस्थाही उदासीन दिसतात. ३१ डिसेंबर रोजी उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पात पर्यटनाच्या निमित्ताने पुढे आलेला प्रकार अत्यंत कीव यावा, असा आहे.

एक वाघीण आपल्या शावकांसह जात असताना पर्यटकांच्या गाड्यांपुढे आल्यानंतर तिला मार्ग मोकळा करून देणे हा धर्म असताना चारही बाजूने तिला घेऊन छायाचित्र, चित्रफीत काढण्याच्या मोहात 'त्या' पाचही जणांचा जीव धोक्यात टाकणे कितपत सयुक्तिक होते. वाघांचाच नव्हे, तर पर्यटकांच्या घेऱ्यात वाघ बिथरून एखाद्या पर्यटकावर हल्ला झाला असता तर? पर्यटकांना वाघ दिसल्याने ते भान विसरले असतील; मात्र वन विभागाचे प्रतिनिधी असलेल्या जिप्सीचालक आणि गाईड यांचे काय? त्यांना नियमांचे भान नसावे, याचे नवल वाटते. आज कारवाई झाली. जिप्सीमध्ये जे पर्यटक होते, त्यांच्यावर उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात पर्यटनाला आजन्म बंदी घालण्यात आली. नक्कीच ही कारवाई योग्य असेल. पण कारवाई करून ही मानसिकता बदलणार आहे का, हा प्रश्न आहे. त्यासाठी कारवाईपेक्षा स्वतःच्या कर्तव्याची जाणीव होणे अधिक गरजेचे आहे. हा प्रकार आजचा नाही. यापूर्वीही अनेकदा असे उतावीळ पर्यटक लोकांपुढे आले आहेत. आम्ही जंगलात जातो, म्हणजे जणू काही प्राण्यांवर उपकार करतो, अशीच भावना त्यांची असावी. पण आम्ही त्यांच्याच अधिवासात जाऊन त्यांना वेठीस धरतो, हे न बदलणारे सत्य आहे. नक्कीच पर्यटनाने अर्थचक्र गतिमान राहण्यास मदत होते, पण ते करताना आपण काय करतो? याची जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी. पर्यटक म्हणून नियमांचे पालन करण्याची जबाबदारी येणाऱ्या प्रत्येकाची आहे. मग अशावेळी पर्यटक जबाबदारी विसरत असतील, तर जाणीव करून देण्याचे काम गाईडचे नक्कीच आहे. पण तोच जर त्यांच्या सुरात सूर मिसळत असेल तर मात्र पालथ्या घड्यावर पाणीच म्हणावे लागेल. आज जिप्सीचालक, गाईड आणि पर्यटकांवर कारवाई झाली. जिप्सीचालक, गाईड यांच्या रोजीरोटीचा विषय तीन महिन्यांसाठी गोठविला गेला. पण पर्यटक तर दुसरीकडे जाऊन पुन्हा आणखी कुठल्या वाघाला वेठीस धरून आनंद घेऊ शकतील ना? अशावेळी पर्यटक कोण? यापेक्षा त्याची मानसिकता कशी बदलेल, याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी ज्यांच्या भरवशावर जंगलात सोडले जाते, त्या गाईडला सर्वार्थाने प्रशिक्षित करून त्याचे कर्तव्य आणि नियमांचे जाणीव करून देण्याची गरज आहे. ज्यावेळी पर्यटकांचा अतिउत्साह आपल्यासाठीही अडचणीचा ठरू शकतो, हे माहिती असेल, तेव्हा कदाचित अशा पद्धतीने कुठल्या वाघाच्या परिवाराला वेठीस धरण्याची आणि नियम मोडण्याची हिंमत कुणाची होणार नाही. नाहीतर आज एका व्याघ्र प्रकल्पात आजन्म बंदी घातली तरी दुसऱ्या ठिकाणी हे घडणार नाही? याची शाश्वती कोण देणार?

९७६३७१३४१७

---

## वाचक पत्रे

### दादागिरीविरहित राजकारण हे आता स्वप्नवतच

नुकतेच 'वाचक पत्रे' या सदरात राम राजे यांचे या विषयावरील पत्र वाचनात आले. मला देखील याविषयी काही विचार मांडावेसे वाटतात. आजकाल राजकारणात दादागिरीचे स्वरूप दिसून येते. ते थेट शारीरिक दादागिरीपासून ते सूक्ष्म राजकीय खेळाडूंपर्यंत पसरलेले असते.

शारीरिक दादागिरी : ही दादागिरी प्रत्यक्ष शारीरिक हिंसाचाराद्वारे केली जाते. निवडणुकांमध्ये विरोधकांना धमकावणे, मतदानाच्या वेळी गोंधळ घालणे, याचे उदाहरण म्हणून दिले जाऊ शकते.

आर्थिक दादागिरी : पैशाच्या जोरावर लोकांना प्रभावित करणे, भ्रष्टाचार करणे, या प्रकारची दादागिरीही राजकारणात दिसून येते.

राजकीय दादागिरी : सत्तेचा गैरवापर करून विरोधकांवर दडपण आणणे, कायदे बदलून स्वतःला फायदा करून घेणे, ही राजकीय दादागिरीची उदाहरणे आहेत.

सामाजिक दादागिरी : समाजात विभाजन निर्माण करून, जाती-धर्म-प्रांत यांच्या नावावर राजकारण करणे, ही सामाजिक दादागिरीचे उदाहरण आहे.

माहितीच्या दादागिरी : खोट्या बातम्या पसरवून समाजात भ्रम निर्माण करून, राजकीय प्रतिस्पर्ध्यांना बदनाम करणे, हे माहितीच्या दादागिरीचे उदाहरण आहे.

दादागिरीची कारणे : सत्ता मिळवण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी काही नेते कोणतेही मार्ग अवलंबतात. काही नेते केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी दादागिरी करतात. लोकांच्या अज्ञानाचा फायदा उठवून काही नेते दादागिरी करतात. राजकीय प्रणालीतील दोषांचा फायदा उठवून काही नेते दादागिरी करतात.

दादागिरीमुळे लोकशाही कमजोर होते. विकासावर परिणाम होतो. समाजात असंतोष निर्माण होतो. गुन्हेगारी वाढते.

दादागिरी रोखण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. कायदे कठोरपणे लागू करणे. राजकीय प्रणालीत सुधारणा करणे. मीडियाने आपली जबाबदारी पार पाडावी. चुकीच्या बातम्या देऊन नुसता आपला टी. आर. पी. वाढविण्याचा प्रयत्न न करणे. नागरिकांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

### कुंभमेळ्याचे महत्त्व

यावर्षी १३ जानेवारीपासून प्रयागराज येथे कुंभमेळा सुरू होत आहे. कुंभमेळा हा जगातील सर्वांत मोठा सांस्कृतिक आणि धार्मिक मेळा आहे. या काळात भारतातील हिंदू धर्मीय आस्तिक लोक, साधक, भक्त, साधू- संत एकत्र येऊन कुंभ पर्वात पवित्र नदीत स्नान करतात. यावेळी संतांची प्रवचने ऐकणे, ध्यानधारणा, साधना याद्वारे आपले जीवन आध्यात्मिकदृष्ट्या सुंदर होण्यासाठी प्रयत्न केले जातात. कुंभमेळ्यात येणाऱ्या श्रद्धाळूची अशी आस्था आहे की, यावेळी पवित्र नदीत डुबकी मारून स्नान केले की आपले पापक्षालन होते म्हणजेच पापापासून मुक्ती मिळते. तसेच जन्म- मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती मिळते. या आशेनेच जगभरातील हिंदू श्रद्धाळू पवित्र स्नानासाठी प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन, नाशिक येथे पोहोचतात. काहींना प्रश्न पडतो की केवळ याच नदीच्या किनारी कुंभमेळा का भरतो? कुंभ याचा अर्थ कलश. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार कुंभमेळ्याचा इतिहास जवळपास ८५० वर्ष जुना आहे. पौराणिक ग्रंथानुसार जेव्हा देव आणि असुर यांनी अमृत प्राप्त करण्यासाठी समुद्रमंथन केले. तेव्हा त्यातून मूल्यवान असा अमृत कलश निघाला. तो अमृत कलश घेण्यासाठी देव आणि असुरांमध्ये युद्ध झाले. असुरांपासून अमृत वाचवण्यासाठी विष्णूने तो अमृत कलश आपले वाहन गरुड याला दिला. असुरांनी गरुडाकडून तो कलश हिसकावून घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा त्यातील काही थेंब प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक येथील नदीत पडले. तेव्हापासून दर बारा वर्षांनी या पवित्र नदीकाठी कुंभमेळा भरतो. यावेळी २०२५ मध्ये प्रयागराज येथे महाकुंभमेळा आहे. कुंभातील पहिले पवित्र शाही स्नान १३ जानेवारी पौष पौर्णिमेला सुरू होईल .१४ जानेवारीला मकर संक्रांतीला शाही स्नान, २९ जानेवारीला मौनी अमावास्या स्नान, २ फेब्रुवारीला वसंत पंचमी शाही स्नान होईल. या काळात ४ फेब्रुवारीला रथसप्तमी, १२ फेब्रुवारीला माघ पौर्णिमा आणि २६ फेब्रुवारीला महाशिवरात्र. म्हणजेच हा कुंभमेळा पूर्ण ४५ दिवस चालेल.

**पल्लवी देशपांडे**/दुर्ग, छत्तीसगढ

### परदेशच का?

देशभक्तीच्या गोष्टी करणारे नेते चिंतन (?) करायचे असेल तर परदेशात जात असतात. उपचार करायचा असेल तर परदेशात जात असतात. फिरायचे असेल तर परदेशात जात असतात आणि भारतात परतल्यावर मात्र देशभक्तीच्या बाता मारत असतात. हत्तीचे खायचे दात वेगळे असतात आणि दाखवायचे वेगळे. तसेच हे असते. या नेत्यांचे आत एक असते आणि बाहेर एक. स्वदेशीची चळवळ ज्या देशात झाली, परकीय वस्तूंची होळी ज्या देशात झाली त्याच देशातले हे बाबुआयटम नेते परदेशाचे उंबरठे झिजवीत असतात.

**आशिष देव**/चंद्रपूर

# स्त्रियांना प्रतिभेचे पंख देण्यासाठी पुरुषांनी प्रयत्न करावेत : देशमुख

## सावित्री महिला संघटनेचा पहिला वर्धापन दिन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

आजच्या स्त्रिया संसारात समता मागतात म्हणून घटस्फोट वाढत आहेत; म्हणून पुरुषाने बदलणं आवश्यक आहे. भारतातील पहिले समतावादी जोडपे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा आदर्श आज सर्वांनी घेतला पाहिजे. स्त्रियांना प्रतिभेचे पंख देण्यासाठी पुरुषांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्री महिला संघटनेच्या वतीने हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या टिळक सभागृह येथे आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता महिला शिक्षण व संविधान. अध्यक्षस्थानी ॲड. सरिता मोकाशी होत्या. त्या म्हणाल्या, सामाजिक कामासाठी स्त्री-पुरुषांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. सावित्री महिला संघटनेचे ध्येय द्वेष संपवणे आणि प्रेम वाढवणे हा आहे. हे स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध, कबीर, भीमराव फुले या भूमीवर जन्मले ,आम्ही प्रकाश बीजे या गीताने आणि सावित्रीच्या ओवीने झाली. स्मिता पाटील यांनी प्रदीप आवटे लिखित सावित्रीचे हात



ही कविता सादर केली. यानंतर सुमित्रा देशमुख लिखित आजची स्त्री खरंच स्वतंत्र झाली आहे का? हे पथनाट्य वालचंद समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. कार्यक्रमाची प्रस्तावना शकुंतला सूर्यवंशी यांनी केली. यामध्ये वर्षभरात संघटनेने केलेल्या कार्याचा आढावा मांडला. सुजाता फडतरे यांनी वाचन टपरी या सावित्री संघटनेने सुरू केलेल्या उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती भोसले यांनी केले. जयंती कदम यांनी आभार मानले

देशमुख पुढे म्हणाले, आजच्या महिला स्वतःला सावित्रीच्या लेकी समजतात ही आनंदाची बाब आहे. आज सावित्रीबाई फुले यांचे विचार जाणून घेण्याची उत्सुकता तरुण आणि महिलांमध्ये निर्माण झाली आहे. ५ जानेवारी हा सावित्रीबाईंच्या प्रिय विद्यार्थिनी मुक्ता साळवे यांचा जन्मदिन आहे. मुक्ता साळवे हिने महार-मांगाच्या दुःखाविषयी हा निबंध लिहला जो खणखणीत होता. ज्ञानोदय या नियतकालकात तो प्रसिद्ध झाला. सावित्रीबाईंनी आपल्या शिष्येला दिलेला विवेकवाद मुक्ताच्या निबंधातून प्रकट होतो. सावित्रीबाई मानवतावादी होत्या. जे माता पिता आपल्या पाल्यास शिकवत नाही ते त्यांचे शत्रू आहेत असे विचार सावित्रीबाईंनी मांडले. आजच्या स्त्रिया सावित्रीच्या कर्तव्यलेकी झाल्या आहेत, परंतु पुरुष मात्र ज्योतिबांच्या विचाराला पात्र होत नाहीत.



## महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा

सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २१वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत मंगळवारी सकाळी 'सदा फुले रंगीत झाले' हे नाटक वसंतराव नाईक विद्या विकास शिक्षण संस्था गंधोरा ( जि. धाराशिव) येथील बाल कलाकारांनी सादर केले. (छायाचित्र : केवल तिवारी)

## निधन वृत्त...

### ताहेरा तांबोळी

**अकलूज दि. ७ जानेवारी-**



अकलूज येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या ताहेरा फौंडेशनच्या संस्थापिका ताहेरा हाजी अब्दुलकादरभाई तांबोळी (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांना सामाजिक व धार्मिक कार्याची आवड होती. गरजूंना मदत करणे, निराधाराला आधार देणे असे कार्य केले आहे. त्या ताहेरा फौंडेशनचे अध्यक्ष अबुबकर तांबोळी यांच्या त्या मातोश्री होत्या.

### रमणदास हलसगी

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**



येथील परीट समाजातील कार्यकर्ते लक्ष्मणदास हलसगी यांचे वडील रमणदास कल्लाप्पा हलसगी यांचे अल्पशा आजाराने सोमवार ६ जानेवारी रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### सुचेता पोफळे

**श्रीपूर, दि. ७ जानेवारी-**



श्रीपूर येथिल चंद्रशेखर विद्यालयाच्या सेवा निवृत्त शिक्षिका तसेच कर्मयोगी सुधाकरपंत परिचारकपांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे वैद्यकिय अधिकारी डॉ. सुधीर सुधाकर पोफळे यांच्या मातोश्री सुचेता पोकळे यांचे (वय ७५) निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

### बिहारीलाल तापडिया

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**



बिहारीलाल तापडिया (वय ८२) यांचे ६ जानेवारी रोजी निधन झाले. मारवाडी समाजाचे वरिष्ठ धार्मिक विश्वस्त होते. डॉ. निर्मल तापडिया व बजरंग तापडियांचे ते वडिल होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना व नातवंडे असा परिवार आहे.


## जाहीर समन्स/नोटीस

एच.एम.पी.अर्ज नं.१४५/२०२४ नि.नं.१०
पुढील नेमलेली तारीख १७/०२/२०२५

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

**विवेक लिंबराज आगळे** ----- **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**सौ. प्रतिक्षा विवेक आगळे** ----- **सामनेवाली**

**प्रति,**
**सौ. प्रतिक्षा विवेक आगळे,** वय २९ वर्षे
रा. हल्ली मु. सांगवी नं. १, ता. करमाळा, जि. सोलापूर
............... यांना

ज्याअर्थी, सदरचा अर्ज यातील अर्जदार याने सामनेवाली हिचे विरुद्ध हिंदू विवाह कायदा कलम १३ (ia) प्रमाणे दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हाला वर अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. कोर्टामार्फत समन्स/नोटीस रजि. पोस्टाने पाठविली असता तुम्ही सदरची नोटीस घेण्यास नकार दिलेला आहे. तसा पोस्टारा शेरा आलेला आहे. त्यामुळे तुमचे विरुद्धचे सदर अर्जाचे समन्स/नोटीस न बजावता परत आलेली आहे.

ज्याअर्थी, तुम्ही सामनेवाली हिने सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली तारीख १७/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात या दाव्याचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचेमार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे काही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुद्ध एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे, हे जाहीर समन्स/नोटीस मे. कोर्टाचणे सही शिक्क्यानिशी दिली.
तारीख : ०७/०१/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. १०४/२०२४ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख ०६/११/२०२४

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**श्री. शिवकुमार सोमनाथ तांबे,** वय ३० वर्षे, धंदा- शेती, रा. देवळाली, ता. भूम, जि. धाराशिव — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**कोणी नाही** — **सा. वाला**

**अर्ज-** Bombay Regulation Act Section 2 **प्रमाणे**

ज्याअर्थी, मयत कावेरा उर्फ काविराबाई शंकर डुरे व शंकर श्रीपती डुरे यांचे नांवे मौजे इर्लेवाडी, ता. बार्शी येथील ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत अ.क्र. २१५ (अनुक्रमांक २१५) क्षेत्र १६३३ चौ. फूट यात १०० चौ. फूट दगड, माती बांधकाम व १५३३ चौ. फूट खुली जागा असून कावेरा उर्फ काविराबाई शंकर डुरे ही ता. २०/०६/२०२३ रोजी मयत झालेली असून शंकर श्रीपती डुरे हे ता. ०२/११/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत कावेरा उर्फ काविराबाई शंकर डुरे यांना कोणतेही मूलबाळ/अपत्ये नव्हते. यातील अर्जदार यानेच त्यांचे पालनपोषण, सांभाळ, सेवासुश्रुषा, देखभाल, दवाखान्यातील सर्व खर्च, औषधोपचार केलेला होता व आहे. मयत कावेरा उर्फ काविराबाई शंकर डुरे व शंकर श्रीपती डुरे पश्चात यातील अर्जदार हाच एकमेव जवळचा व कायदेशीर वारस होता व आहे. सदर अर्जदाराशिवाय मयतास अन्य कोणीही जवळचे व कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. मयत शंकर श्रीपती डुरे यांनी दि. १४/०७/२०११ रोजी त्यांचे स्वईच्छने व राजीखुशीने त्यांचे नांवे असलेल्या वर नमूद मिळकतीबाबत यातील अर्जदाराचे नांवे मृत्यूपत्राचा दस्त साक्षीदारासमक्ष लिहून ठेवलेला होता व आहे. सदर मृत्यूपत्राचे दस्ताप्रमाणे यातील अर्जदाराने ग्रामपंचायत मौजे इर्लेवाडी, ता. बार्शी येथील ग्रामपंचायत उतारा असेसमेंट लिस्ट नमुना नं. ८ चे हक्कपत्रकी मयताचे पश्चात अर्जदाराचे नांवाची नोंद होणेकरीता विनंती कीली असता सदर ग्रामपंचायतीने यातील अर्जदारास मे. कोर्टातून वारस प्रमाणपत्र आणणेस सांगितलेने अर्जदाराने सदरचा अर्ज अर्जदार हा मयत कावेरा उर्फ काविराबाई शंकर डुरे व शंकर श्रीपती डुरे यांचे पश्चात एकमेव जवळचा व कायदेशीर वारस आहे असे ठरवून जाहीर होवून मिळणेकरीता या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जदार याचे व्यतिरिक्त मयत कावेरा उर्फ काविराबाई शंकर डुरे व शंकर श्रीपती डुरे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क, हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली तारीख ३१/०१/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे, हे प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. ०२/०१/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. जमा-२/आरटीएस/१५५/कावि-२७/२०२४
बार्शी, दि. ०३/०१/२०२५

**श्री.एफ. आर. शेख, तहसीलदार बार्शी यांचे न्यायालयात**

प्रति,
**१. हरीभाऊ भागवत ढेरे,**
**२. राम भागवत ढेरे,**
रा. पानगांव, ता. बार्शी — **वादी/अर्जदार**
विरुध्द
**१. फकिरा दौला**
**२. बहिरु रंगु नाईकवाडी,**
रा. पानगांव, ता. बार्शी — **प्रतिवादी/सामनेवाले**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५**

मौजे-पानगांव, ता. बार्शी येथील ग.नं.९६७/१ व ९६७/२ च्या इतर हक्कातील फकिरा दौला व बहिरु रंगु नाईकवाडी ही नावे पोकळ स्वरुपाची असल्याने कमी करणेबाबत श्री. हरीभाऊ व राम भागवतन ढेरे, रा. पानगांव, ता. बार्शी यांनी अर्ज दिलेला आहे.

सदर अर्जाच्या चौकशीवेळी फकिरा दौला व बहिरु रंगु नाईकवाडी या दोन व्यक्ती गांवी रहात नसलेबाबत तसेच त्यांचा पत्ता आढळून येत नसलेबाबत निदर्शनास आलेले आहे. तरी ग.नं. ९६७/१ व ९६७/२ चे इतर हक्कातील फकिरा दौला व बहिरु रंगु नाईकवाडी ही नांवे कमी करणेबाबत त्यांचे हितसंबंधित अथवा त्यांनी स्वतः हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यानंतर कुणाच्या कांही हरकती/ तक्रारी असतील तर त्या १५ दिवसाचे आत इकडील कार्यालयात माझे समोर दाखल कराव्यात.

जाहिर प्रसिध्दीकरणापासून १५ दिवसाचे आत कुणाच्या कांही हरकती/तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत तर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकती/तक्रारांची विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(शिक्का) **सही/- एफ.आर. शेख तहसिलदार, बार्शी**



## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी नामांकित फर्म/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करतात. निविदा सूचना क्रमांक: 01-2025-SrDENC कामाचे नाव: 1. सांगोला स्थानकावरील टॉवर वॅगन शेडचे शिल्लक काम (PVR End) DEN/PVR उपविभाग अंतर्गत RE द्वारे अंशतः पूर्ण केले. 2 लातूर स्टेशनवर टॉवर वॅगन शेड आणि साइडिंगचे बांधकाम आणि लातूर येथील OHE डेपोचे शिल्लक काम आणि DEN/LUR उपविभागांतर्गत BTW स्टेशनवर टॉवर वॅगन साइडिंगचे काम अंदाजे खर्च: रु. 56860528.34/- बयाणा पैसे: रु. 434300.00/- काम पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 12 महिने. www.lreps.gov वर उद्धृत निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 24/01/2025 15.00 वाजेपर्यंत. www.lreps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 24/01/2025 15.30 वाजता. संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की त्यांनी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटवर वारंवार भेट द्यावी आणि यासाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्र लक्षात घ्या. ही निविदा. वेबसाइट: **www.lreps.gov.in**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर**
Apex-49

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर हद्दीतील जुना सर्व्हे नं. १३२ यासी नविन सर्व्हे नं.१३० यापैकी नियोजित सुर्या नगर या नावाने ओळखले जाणारे नगरातील पश्चिम मुखी प्लॉट नं. १०९ याचे क्षेत्र ७३.११ चौ. मीटर, तसेच पुर्वमुखी प्लॉट नं. १२२ याचे क्षेत्र ५७.४३ चौ. मीटर असे दोन्ही प्लॉट्सचे एकुण क्षेत्र १३०.५४ चौ. मीटर अथवा १४०४ चौ. फुट आहे. यासी चतुःसीमा :- पुर्वेस :- न.म.पैकी ७.५ दक्षिणोत्तर रस्ता, पश्चिमेस : न.म. पैकी ६ मीटर दक्षिणोत्तर रस्ता, दक्षिणेस :- न.म. पैकी प्लॉट नं. ११० व १२१ ची मिळकत, उत्तरेस :- न.म.पैकी मुळेगांव मुळेगाव शीव येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुले प्लॉट्स त्यातील दगड, माती, झाडे, झुडूपे वगैरे तदंगभूत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह, इजमेंटचे सर्व हक्कासह, यात दक्षिण व उत्तर दिशेचे इजमेंटचे अधिकार नाहीत, अशी मिळकत.

ही मिळकत श्री. आनंद व्यंकटेश बोध्दूल, रा. सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी या प्लॉट जागा आमचे अशिलास खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी या प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट जागांचे संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०७/०१/२०२५

**सही/-**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

(मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क्र. ८८३८ दि. ०६/०१/२०२५

रेणुका भवन, २ मजला, सर्वे नं. ३५/२अ-२ब, पुष्पक हॉटेलजवळ,
पाईप लाईन रोड, सावेडी, अ.नगर,
अहमदनगर - ४१४ ००१

### जाहीर नोटीस

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि., अहमदनगर ----- अर्जदार
**विरुद्ध**

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ९०४/२०२३ | कर्जदार | **श्री. राजीव नरबहादूर गोरखा,** रा. एच.एन. ४ साईनगर, तपोवन रोड, तपोवन मंदिरजवळ, बुऱ्हानगर, अहमदनगर, जि. अहमदनगर |
| | जामीनदार | **श्री. गोविंद भास्करराव बुद्रुककर,** रा. ६९, सिर्सि परभणी, ता. सोनपेठ, जि. परभणी |
| | जामीनदार | **श्री. झेंडे निलेश नंदकुमार,** रा. १८२५, तुळशीराम रोड, बार्शी,ता.बार्शी, जि.सोलापूर |
| ३४५२/२०२४ | कर्जदार | **श्री. परदेशी आरती आकाश,** रा. परदेशी मळा, दत्तनगर, नरसोबा मंदिर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. तिवारी अजय तीरुप्रसाद,** रा. मु. मुलगे मळा समोर, परदेशी मळा अगो, ४० दत्तनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. चोबे संतोष झुंबर,** रा. दत्तनगर, परदेशी मळा, बार्शीता. बार्शी, जि. सोलापूर |
| ३४७२/२०२४ | कर्जदार | **श्री. मिरगणे श्रीकांत भाऊ,** रा. २११, महादेव मंदिर, भोईंजे, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. गोडगे कार्तिक कुमार** रा. मु. ६३१, हांडे गल्ली, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. पिंगळे मुकुंद लहू,** रा. शेंद्री भोईंजे, ता. बार्शी, जि. सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ११/०१/२०२५ रोजी ठीक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले असे.

सही/-
(गोल शिक्का) **ॲड. तनपुरे गोविंद दशरथ, लवाद अधिकारी**



## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३२५/२०२४**

**१) आशा शरद खडके,**
रा. मंगळवार पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील एस.व्ही. जाधव) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपालिका, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा निलेश शरद खडके, रा. मंगळवार पेठ, बार्शी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी दिनांक २२ ऑक्टोबर २०१५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा निलेश शरद खडके यांचा दिनांक २२ ऑक्टोबर २०१५ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही/-
(गोल शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी,** बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ८८/२०२४ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख २४/०२/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश सो. कनि. स्तर यांचे न्यायालयात मे. एच.यु.यु. पाटील सो. कोर्ट)**

**१) बाबा उर्फ बाबासाहेब अंबादास खंडागळे,** वय ४८ वर्षे, धंदा- शेती, रा. मालवंडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) सावित्रा अंबादास खंडागळे,** वय ६० वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
**३) कमल तुकाराम उबाळे,** वय ३५ वर्षे,धंदा- शेती, रा. एस. नं. ११०, रामटेकडी, पुणे, सोलापूर रोड, विठ्ठल मंदिराचे पाठीमागे, हडपसर, पुणे — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ व ३ ही अर्ज'ार नं. १ ची अपत्ये असून अर्जदार नं. १,३ यांना मंदा उर्फ नंदा राजू काळे नावाची विवाहीत बहीण होती. ती विवाहानंतर ता. २३/१२/२०२४ रोजी मालवंडी, ता. बार्शी येथे मयत झालेली असून तिला वारस अर्जदार हेच असून अर्जदाराशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जातील मिळकतीस तिचे नावाची नोंद आहे. परंतु ती मयत असलेने तिचे नांव कमी करणेकरीता अर्जदारांनी विनंती केली असता संबंधित अधिकारी यांनी अर्जदारांना वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारांनी अर्जदार हे मयत मंदा उर्फ नंदा राजू काळे हिचे कायदेशीर वारस असलेबाबत हेअरशिप/वार प्रमाणपत्र मिळावे याकरिता अर्जदारांनी सदरचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधिताने ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख २४/०२/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : ०४/०१/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहा. अधीक्षक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डि व सब डी सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी येथील भिम नगर परिसर झोपडपट्टी जुना वार्ड क्रं. १७, नवीन वार्ड क्रं.४ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील जुना म्युन्सिपल घर नं.अ-११७ यांसी नवीन म्युन्पिल घर/ मालमत्ता क्रं.३१५/१ यांसी हद्द पूर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर २५ फुट एकूण क्षेत्र ५०० चौरस फुट इतकी असून यात १०x१० मापाचे पत्राशेड मारलेली खोली असून बाकीची जागा खुली आहे. यात उत्तर मुखी दरवाजा असून, पाणी जाण्याचे हक्कासह. यासी चर्तुसीमा पूर्वेस- गंगाराम टोणगे घरजागा, पश्चिमेस मलिक आरेनवरु घरजागा, दक्षिणेस-सुनिता टोणगे यांची घरजागा, उत्तरेस-रस्ता.

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली घरजागा ही कैलास महादेव टोणगे यांचे कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक ०७/०१/२०२५ रोजी कब्जा पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी घरजागा ही आमचे अशिल सतिश परमेश्वर आरेनवरु यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर घरजागेवर नगर परिषद मैंदर्गी यांचे कडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज दिलेले आहे.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, जुना वार्ड क्रं. १७, नवीन वार्ड क्रं.४ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील जुना म्युन्सिपल घर नं.अ-११७ यांसी नवीन म्युन्पिल घर / मालमत्ता क्रं.३१५/१ या जागेवर आमच्या अशिल सतिश परमेश्वर आरेनवरु यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता. ०७/०१/२०२५.

**सही/-**
**नाईकवाडी ए.डी. ॲडव्होकेट**
**१८८६/४, विणकर वसाहत**
**मु.पो. मैंदर्गी ता. अक्कलकोट जि. सोलापूर.**
**मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## नावात बदल

माझे जुने नाव **राजेश पोशय्या यनगंटी** असे होते. ते बदलून नविन नाव **राजेशम पोशय्या यनगंटी** असे वाचण्यात यावे. वरील दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.

**रा. ३६३, न्यू सुनील नगर सोलापूर - ४१३००६**
**ऑफि. नं. (1009)**
**दि. 07/01/2025**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE

| Sr. No. | RFX No. | Name of work | Tender No. | Estimated Cost EMD Rs. | Tender Fee Rs. | Work completion period | Date of Tender Submission | Date of Technical Bid opening |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **70000 34431** | Work of new 220kV equipment foundations and roof shed over class-III staff quarter at **220 kV S/Stn Bale,** Dist.-Solapur. | **T-17/ 2024-25** | Rs. 8,80,069.31 Rs. 8,800.69 | (500 + GST) | 30 Days | 07.01.2025 (11:00 Hrs) up to 22.01.2025 (11:00 Hrs). | 22.01.2025 (11:00 Hrs). (If possible) |

For further details visit out website https://srmetender.mahatransco.in/
**Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal. (https://srmetender.mahatransco.in).

**Executive Engineer (Civil), EHV, CCCM Division, Solapur.**



INVITATION TO THE REMAINING PUBLIC SHAREHOLDERS TO AVAIL THE EXIT OPPORTUNITY UNDER EXIT OFFER

## TCI DEVELOPERS LIMITED

**Corporate Identification Number (CIN):** L70102TG2008PLC059173
**Registered Office:** Flat No. 306-307, 1-8-271 to 273, 3rd Floor, Ashoka Bhoopal Chambers, S. P. Road, Secunderabad, Telangana - 500003 | **Tel. No.:** +91- 40-27840104 | **Fax. No.:** +91- 40-27840163
**Contact Person:** Ms. Saloni Gupta, Company Secretary & Compliance Officer
**Email id:** secretarial@tcidevelopers.com | **Website:** www.tcidevelopers.com

**Dear Residual Public Shareholder,**

(This public invitation shall be read in continuation of and read in conjunction with and all capitalized terms used in this public invitation shall have the same meaning as ascribed to it in Detailed Public Announcement dated September 02, 2022 published on September 05, 2022 ("**DPA**"), the Letter of Offer dated September 05, 2022 ("**LOF**"), Post Offer PA dated September 21, 2022 ("**Post Offer PA**"), Exit Offer Public Announcement dated November 03, 2022 ("**Exit Offer PA**"), Exit Letter of Offer dated November 11, 2022 ("**ELOF**") and Corrigendum to the public announcement dated November 17, 2023 and May 31, 2024.

This invitation of the Company is being issued for and on behalf of TDL Real Estate Holdings Limited ("**Promoter Acquirer**"), and other members of promoter and promoter group of TCI Developers Limited to the remaining Public Shareholders ("**Residual Public Shareholders**") of TCI Developers Limited (the "**Company**") in adherence with Regulation 27(1)(a) and all other applicable regulations of the Delisting Regulations.

This is to inform to all Residual Public Shareholders that the Equity Shares of the Company have been delisted and trading in the Equity Shares of the Company has been discontinued trading w.e.f. November 11, 2022 ("**BSE and NSE Date of Discontinuance of Trading**") and the above referred security symbol will be delisted from BSE and NSE with effect from November 18, 2022 ("**BSE and NSE Date of Delisting**").

In terms of Regulation 27(1)(a) read with Regulation 26 and all other applicable Regulations of the Delisting Regulations, the Promoter Acquirer is inviting the Remaining Public Shareholders to avail the exit opportunity during the one-year exit window after delisting of Equity Shares.

The Residual Public Shareholders who have still not tendered their Equity Shares, can tender their Equity Shares to the Promoter Acquirer at the **Exit Price of Rs. 400/-** (Indian Rupees Four Hundred Only) during the extended period from **June 01, 2024 till May 31, 2025** (both days inclusive) (the **"Exit Window"**) subject to the terms and conditions provided in ELOF.

The Residual Public Shareholders are required to ensure that their Exit Application Form, together with the necessary enclosures, as per ELOF, is received by the Registrar to the **Exit Offer on or before May 31, 2025**.

In case of non-receipt of said Exit Application Form / ELOF or if the same has been misplaced, the Residual Public Shareholders may obtain a copy of the same by writing to the Registrar to the Exit Offer. Copy of the ELOF can also be downloaded from the websites of the BSE at www.bseindia.com, NSE at www.nseindia.com and Company at www.tcidevelopers.com.

**A follow-up email for the quarter ended December 2024,** has been sent to all the remaining Residual Public Shareholders in compliance with Regulation 27(1)(b) of the Delisting Regulations.

The Promoter Acquirer will make the payment by way of electronic credit to Residual Public Shareholders who have validly tendered their Equity Shares in Exit Offer following the receipt and verification of duly filled Exit Applications Form(s) (together with necessary enclosures, if any and receipt of the Equity Share(s) in the Special Depository Account / receipt of physical share certificate(s) (along with duly filled in transfer deed(s) as applicable) by the Registrar to the Exit Offer.

Any Residual Public Shareholders seeking any other assistance in connection with their shareholding like issue of duplicate share certificate, rectification of name, transmission of shares, deletion of name of a shareholder in case of joint shareholding, etc. may contact the Registrar to the Exit Offer.

**The Promoter Acquirer accept full responsibility for the information contained in this Public Invitation and confirms that such information is true, fair and adequate in all material aspects.**

| MANAGER TO THE OFFER | REGISTRAR TO THE EXIT OFFER |
|---|---|
| SAFFRON energising ideas<br>**SAFFRON CAPITAL ADVISORS PRIVATE LIMITED**<br>605, 6th floor, Centre Point, Andheri Kurla Road, J.B. Nagar, Andheri (East) Mumbai - 400 059, Maharashtra, India.<br>**Telephone:** +91 22 4973 0394 \| **Fax:** NA<br>**E-mail:** delistings@saffronadvisor.com<br>**Website**: www.saffronadvisor.com<br>**Investor grievance:** investorgrievance@saffronadvisor.com<br>**SEBI Registration Number:** INM 000011211<br>**Validity of Registration:** Permanent<br>**Contact Person:** Amit Wagle / Gaurav Khandelwal | KFINTECH<br>**KFIN TECHNOLOGIES LIMITED**<br>Selenium Tower – B, Plot 31 & 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Serilingampally, Hyderabad - 500 032, Telangana, India.<br>**Telephone:** +91 40 6716 2222/ / +91 40 7961 1000<br>**Toll Free No:** 1-800-3094-001 \| **Fax:** + 91 40-23001153<br>**Email:** tci.delistingoffer@kfintech.com<br>**Website:** www.kfintech.com<br>**Investor Grievance Email:** einward.ris@kfintech.com<br>**Contact Person:** Mr. Murali Krishna M<br>**SEBI Registration Number:** INR000000221 |

*For and on behalf of the Board of Directors of TDL Real Estate Holdings Limited (the Promoter Acquirer)*

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| Urmila Agarwal | Karanjit Singh | Ishwar Singh Sigar |

**Place:** Gurugram
**Date:** January 08, 2025
AdBaaz

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### चॅम्पियन्स चषकामध्ये बुमराह राहणार उपकर्णधार

**नवी दिल्ली :** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पुढील महिन्यात म्हणजेच फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन पाकिस्तान करणार आहे. पण भारतीय संघ पाकिस्तानचा दौरा करणार नाही, तर भारताचे सामने दुबईत होणार आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतीय संघाला इंग्लंडविरुद्ध पांढऱ्या चेंडूंची मालिका खेळायची आहे.



दरम्यान, भारतीय संघाने बॉर्डर-गावस्कर चषक गमावला आहे. पुढील स्पर्धेत वेगवान गोलंदाज बुमराहला मोठी जबाबदारी मिळू शकते असे बोलले जात आहे. भारतीय क्रिकेटमध्ये अलिकडच्या काळात बरेच काही घडले आहे. गेल्या वर्षी श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात हार्दिकला उपकर्णधारपदावरून हटवून शुभमन गिलकडे जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र, आता एका वृत्तानुसार, हार्दिक किंवा गिल या दोघांनाही उपकर्णधारपद दिले जाणार नाही. जसप्रीत बुमराहला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये भारतीय संघाचा उपकर्णधार बनवले जाऊ शकते. रोहित शर्माची कर्णधारपदी निवड निश्चित असल्याचेही सांगण्यात आलं आहे. बुमराह पूर्णपणे तंदुरुस्त राहिला तर त्याच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात येणार आहे. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेत सर्वाधिक ३२ गडी बाद केले.

# बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी होणार अव्वल खेळाडू

### १४ जानेवारीपासून इंडिया ओपन सुपर ७५०

**नवी दिल्ली, ७ जानेवारी**

लक्ष्य सेन आणि पी. व्ही. सिंधू यांच्या नेतृत्वाखालील भारताचा आतापर्यंतचा सर्वात मोठा संघ १४ जानेवारीपासून येथे सुरू होणाऱ्या योनेक्स-सनराईज इंडिया ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी होणार आहे. ऑलिम्पिक चॅम्पियन व्हिक्टर एक्सेलसेन, अॅन से यंग आणि क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या शी युकी यांसारख्या अव्वल खेळाडूंसह भारताचे २१ खेळाडू सहभागी होणार आहेत. यामध्ये पुरुष एकेरीत तीन, महिला एकेरीत चार, पुरुष दुहेरीत दोन, महिला दुहेरीत आठ आणि मिश्र दुहेरीत चार जोड्या आव्हान देतील.

इंदिरा गांधी स्टेडियमच्या केडी जाधव इनडोअर हॉलमध्ये होणाऱ्या स्पर्धेत अजिंक्यपदासाठी साडे नऊ लाख डॉलर्स (सुमारे ८.१५ कोटी रुपये) बक्षीस पूल आणि ११,००० रँकिंग गुण देण्यात येतील. सुपर ७५० स्पर्धेत अनेक भारतीय खेळाडूंनी भाग घेणे हे जागतिक स्तरावर भारतीय बॅडमिंटनच्या वाढीचे आणि विकासाचे प्रतीक आहे, असे भारतीय बॅडमिंटन असोसिएशनचे सरचिटणीस संजय मिश्रा यांनी सांगितले.





मिश्रा यांनी सांगितले की, ही तर सुरुवात आहे. या वर्षी आपल्या प्रस्थापित खेळाडूंसोबत भारतीय बॅडमिंटनमध्ये नवीन नावेही चमकतील. ही स्पर्धा २०२३ मध्ये सुपर ७५० श्रेणीमध्ये रूपांतरित झाली. गेल्या दोन हंगामात भारतातील १४ खेळाडूंनी भाग घेतला होता. स्पर्धेच्या मागील आवृत्तीत, चिराग शेट्टी आणि सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचले होते तर एचएस प्रणॉयने २०२४ मध्ये पुरुष एकेरी उपांत्य फेरी गाठली होती. चीन मास्टर्स २०२४ च्या उपांत्य फेरीत पोहोचलेले चिराग आणि सात्त्विक पुरुष दुहेरीत पुन्हा एकदा विजेतेपदाचे प्रबळ दावेदार असतील. दुखापतीतून पुनरागमन करणारा सात्त्विक पॅरिस ऑलिम्पिकनंतर पुन्हा लय मिळवण्याचा प्रयत्न करेल. सात्त्विक-चिराग व्यतिरिक्त भारताच्या आशा माजी विजेता लक्ष्य सेन आणि दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती सिंधू यांच्यावर आहेत.

**भारतीय संघ**

**पुरुष एकेरी :** लक्ष्य सेन, एचएस प्रणॉय, प्रियांशू राजावत

**महिला एकेरी :** पीव्ही सिंधू, मालविका बनसोड, अनुपमा उपाध्याय, आकार्शी कश्यप

**पुरुष दुहेरी :** चिराग शेट्टी/सात्त्विकसाईराज रँकिरेड्डी, के साई प्रतीक/पृथ्वी के रॉय

**महिला दुहेरी :** त्रिशा जॉली/गायत्री गोपीचंद, अश्विनी पोनप्पा/तनिषा क्रास्टो, ऋतुपर्णा पांडा/श्वेतपर्ण पांडा, मनसा रावत/गायत्री रावत, अश्विनी भट्ट/शिखा गौतम, साक्षी गेहलावत/अपूर्व गेहलावत, सानिया ऋषिपान्ना/गणेशर, श्रीमान देहलावत/अपूर्व गेहलावत.

**मिश्र दुहेरी :** ध्रुव कपिला/तनिषा क्रास्टो, के सतीश कुमार/आद्या वारीथ, रोहन कपूर/जी रुत्विका शिवानी, असिथ प्रमुथेश.

(वृत्तसंस्था)

# त्रिशा-गायत्री जोडी उपउपांत्यपूर्व फेरीत

### मलेशिया ओपन सुपर बॅडमिंटन स्पर्धा

**क्वालालम्पूर, ७ जानेवारी**

भारताच्या त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या महिला दुहेरी जोडीने मंगळवारी येथे थायलंडच्या ऑर्निचा जोंगसाथापोर्न आणि सुकिता सुवाचाई यांचा सरळ गेममध्ये पराभव करून मलेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.



येथे सहाव्या मानांकित भारतीय जोडीने अवघ्या ३० मिनिटांत २१-१०, २१-१० असा विजय मिळवत अंतिम १६ मध्ये स्थान पक्के केले.

लखनौ येथील सय्यद मोदी इंटरनॅशनल सुपर ३०० स्पर्धेमध्ये मिळालेल्या यशाने आनंदित झालेल्या त्रिशा आणि गायत्रीला बिगरमानांकित थाई जोडीकडून फारसे आव्हान मिळाले नाही. भारतीय जोडीने पहिल्या गेममध्ये अल्पावधीतच १७-८ अशी आघाडी घेतली आणि त्यानंतर गेम जिंकण्यास वेळ लागला नाही.

दुसऱ्या गेमच्या सुरुवातीला त्रिशा आणि गायत्रीला आव्हानाचा सामना करावा लागला. सुरुवातीला गुणसंख्या ८-८ अशी बरोबरीत होता पण त्यानंतर भारतीय जोडीने शानदार कामगिरी करत गेम आणि सामना जिंकला. (वृत्तसंस्था)

# सप्टेंबरमध्ये होणार भालाफेक स्पर्धा

### नीरज चोप्रा सहभागी होण्याची शक्यता

**चंदीगड, ७ जानेवारी**

भारत कदाचित यावर्षी सप्टेंबरमध्ये अव्वल भालाफेक स्पर्धेचे आयोजन करेल. यामध्ये ऑलिम्पिक सुवर्ण आणि रौप्य पदक विजेता नीरज चोप्रासह अनेक स्टार खेळाडू सहभागी होतील, असे अॅथ्लेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया (एएफआय) ने मंगळवारी सांगितले.



भारताने यजमानपदासाठी स्वारस्य व्यक्त केलेल्या अनेक स्पर्धांव्यतिरिक्त हा कार्यक्रम आहे. यामध्ये २०२९ मध्ये होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा समावेश आहे.

एएफआयचे निवर्तमान अध्यक्ष आदिल सुमारीवाला यांनी सांगितले की, भारताने २०२९ ची जागतिक स्पर्धा आणि २०२७ मध्ये जागतिक रिले स्पर्धा आयोजित करण्यात स्वारस्य व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये जागतिक अॅथ्लेटिक्सचे अध्यक्ष सेबॅस्टियन को यांच्या भारत भेटीदरम्यान एएफआयने २०२८ च्या जागतिक ज्युनियर चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यास स्वारस्य व्यक्त केले आहे.

गेल्या १२ वर्षांपासून एएफआयचे अध्यक्ष असलेले सुमारीवाला यांनी क्रीडा महासंघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पहिल्या दिवशी सांगितले की, भारत या वर्षाच्या अखेरीस अव्वल भालाफेक स्पर्धा आयोजित करेल ज्यामध्ये जगातील अव्वल १० खेळाडू सहभागी होतील.

या स्पर्धेत नीरज चोप्रा सहभागी होण्याची शक्यता आहे. या स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या संघाचा तो एक भाग आहे. जएसडब्ल्यू ही परदेशी कंपनी आणि एएफआय संयुक्तपणे या स्पर्धेची तयारी करत आहेत. ही स्पर्धा सप्टेंबरमध्ये होऊ शकते, असे सुमारीवाला यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



रांची येथील बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडियमवर हॉकी इंडिया लीग महिला स्पर्धेपूर्वी मंगळवारी सराव सत्रात ओडिशा वॉरियर्सच्या खेळाडूंनी सहभाग घेतला.

### हिमाचल संघाला कुराशमध्ये १० पदके

**शिमला :** हिमाचल प्रदेशने कुराशच्या ५८ व्या शालेय राष्ट्रीय खेळांमध्ये चमकदार कामगिरी केली आणि १० पदके जिंकली. २ ते ६ जानेवारी दरम्यान रायपूर, छत्तीसगड येथे झालेल्या स्पर्धेत हिमाचल संघ उपविजेता ठरला होता. या स्पर्धेत २० राज्यांतील संघ सहभागी झाले होते. हरयाणा, दिल्ली, पंजाब, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्रातील संघांना पराभूत करून विजयाची नोंद केली. हिमाचल संघाचे खेळाडू आर्यन आणि तान्या यांनी स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. सिद्धार्थ ठाकूरला रौप्य पदक मिळाले. दीपांशी धुळी, गौरव, आरव, अक्षित, सार्थक, आदित्य ठाकूर आणि याशिका शर्मा यांनी कांस्यपदक पटकावले. राज्य कुराश असोसिएशनचे अध्यक्ष कौशल मुंगटा म्हणाले की, या हिमाचल संघाने स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच दहा पदके जिंकली आहेत. १३व्या राष्ट्रीय हापकिडो मार्शल आर्ट्स चॅम्पियनशिपचा रविवारी दिल्लीत समारोप झाला. यामध्ये द स्कॉलर्स होम स्कूल पांवटा संघाने ध्वजारोहण केले आहे. इशिका, तन्वीर, चक्षू आणि वैष्णवी यांनी नॅशनल मार्शल आर्ट्सच्या विविध प्रकारांमध्ये सुवर्णपदक जिंकून नावलौकिक मिळवला आहे. ही स्पर्धा ३ जानेवारी ते ५ जानेवारी दरम्यान तालकटोरा, दिल्ली येथे झाली.

# एएफआयच्या अध्यक्षपदी बहादूरसिंग बिनविरोध

**चंदीगड, ७ जानेवारी**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णविजेता आणि माजी गोळाफेकपटू बहादूरसिंग सागू यांची मंगळवारी येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (एएफआय) अॅथ्लेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. ते आदिल सुमारीवाला यांची जागा घेतील. ते मागील अनेक वर्षांपासून अध्यक्षपदावर आहेत.



२००२ बुसान आशियाई खेळांमध्ये गोळाफेकमध्ये सुवर्णपदक जिंकणारा आणि २००० आणि २००४ च्या ऑलिम्पिक खेळांमध्ये सहभागी झालेल्या ५१ वर्षीय सागूची चार वर्षांसाठी या पदावर निवड झाली आहे. ते एएफआय अॅथ्लेटिक्स कमिशनचे सदस्य देखील आहेत.


वरिष्ठ उपाध्यक्ष अंजू बॉबी जॉर्ज अध्यक्षपदाच्या शर्यतीतून बाहेर पडल्यानंतर सागू हे एकमेव उमेदवार रिंगणात उरले होते. एएफआयच्या दोन दिवसीय वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांची निवड औपचारिकरीत्या पार पडली.

सागूने २००२ आशियाई क्रीडा स्पर्धेत १९.०३ मीटर फेक करून पुरुषांच्या गोळाफेकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्याची कारकीर्दीतील सर्वोत्तम कामगिरी २०.४० मीटर आहे. त्यांना पद्मश्रीनेही गौरविण्यात आले आहे. दिल्ली युनिटचे सर्वोच्च अधिकारी संदीप मेहता यांची एएफआय सचिव बिनविरोध निवड झाली. निवर्तमान कार्यकारी परिषदेत ते वरिष्ठ सहसचिव होते. स्टॅनले जोन्स यांची कोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

६७ वर्षीय सुमारीवाला २०१२ पासून एएफआयचे अध्यक्ष होते आणि विद्यमान राष्ट्रीय क्रीडा संहितेनुसार ते यावेळी निवडणूक लढवण्यास पात्र नव्हते. आपल्या कार्यकाळात नीरज चोप्राने टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. (वृत्तसंस्था)

### दिव्यांगांच्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघ श्रीलंकेला रवाना

**नवी दिल्ली :** दिव्यांग चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेटसाठी भारताचा १७ सदस्यीय संघ मंगळवारी श्रीलंकेला रवाना झाला. माजी प्रथम श्रेणी क्रिकेटपटू आणि मुख्य प्रशिक्षक रोहित झालानी यांच्या देखरेखीखाली जयपूर येथे झालेल्या प्रशिक्षण शिबिरानंतर संघाची निवड करण्यात आली. १२ जानेवारीपासून श्रीलंकेत होणाऱ्या या स्पर्धेत भारतीय संघाचा सामना इंग्लंड, श्रीलंका आणि पाकिस्तानसारख्या बलाढ्य आंतरराष्ट्रीय संघांशी होणार आहे. डिसेबल्ड क्रिकेट कौन्सिल ऑफ इंडियाचे (डीसीसीआय) सरचिटणीस रविकांत चौहान म्हणाले, कठोर निवड प्रक्रियेनंतर संघाची निवड करण्यात आली आहे. आम्हाला विश्वास आहे की हा संघ स्पर्धेत चांगली कामगिरी करेल आणि भारताचे नाव उंचावेल. यावेळी 'स्वयम्' या स्वयंसेवी संस्थेचे संघाला सहकार्य केल्याबद्दल आभार मानले.



सर्बियाचा नोव्हाक जोकोविच (डावीकडे) आणि प्रशिक्षक अँडी मरे यांनी मंगळवारी मेलबर्न येथील मेलबर्न पार्क येथे ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेपूर्वी सराव सत्रात सहभाग घेतला.

# देशात न्यूझीलंडकडून पराभव होणे मोठे अपयश

### युवराज सिंगची नाराजी

**दुबई, ७ जानेवारी**

मायदेशात न्यूझीलंडकडून पराभव होणे हे भारतीय संघाचे बॉर्डर-गावस्कर चषकातील पराभवापेक्षा मोठे अपयश आहे, असे मत माजी विश्वचषक विजेता अष्टपैलू युवराज सिंग याने व्यक्त केले. गेल्या काही महिन्यांत भारताला कसोटी क्रिकेटमध्ये अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. त्यांना घरच्या मैदानावर कमकुवत न्यूझीलंडकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला, जे संघाच्या कसोटी इतिहासात पहिल्यांदाच घडले. त्यानंतर पाच सामन्यांच्या बॉर्डर-गावस्कर मालिकेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध १-३ असा पराभव स्वीकारावा लागला. या दोन्ही पराभवांना बऱ्याच अंशी संघाच्या फलंदाजीची खराब कामगिरी, विशेषतः कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली जबाबदार आहेत. युवराजने एका व्हिडिओ ध्ये वृत्तसंस्थेला सांगितले की, मला वाटते न्यूझीलंडविरुद्ध हरणे अधिक वेदनादायक आहे. कारण घरच्या मैदानावर त्यांचा ३-० असा पराभव झाला.

### तनिष्का ठोकळ हिची खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर :** वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या तनिष्का ठोकळ हिची खेलो इंडिया आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. भुवनेश्वर (ओडीसा) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ धनुर्विद्या स्पर्धेत तिने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सघांतून प्रतिनिधित्व करताना १४ वे स्थान प्राप्त केले. या काम गिरीवर तिची संभाव्य संघात निवड झाली. तर तिला क्रीडा शिक्षक राहुल हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य डॉ. जोशी (कला विभाग) उपप्राचार्य डॉ.होलीकट्टी (विज्ञान विभाग) यांनी अभिनंदन केले.




# महाराष्ट्राचे अॅड. गोविंद शर्मा भारतीय खो-खो संघाचे निवड समिती सदस्य

### पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा

**नवी दिल्ली, दि. ७ जानेवारी-**

महाराष्ट्र खो-खो संघटनेचे खजिनदार अॅड. गोविंद शर्मा यांची भारतीय खो-खो महासंघाने पहिल्यांदाच होणाऱ्या खो-खो विश्वचषकासाठी भारतीय खो-खो संघाच्या निवड समिती सदस्यपदी नियुक्ती केली आहे. ही प्रतिष्ठित स्पर्धा १३ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर होणार असून, २४ देशांचे संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.


भारतीय संघाची अंतिम निवड प्रक्रिया दिल्ली येथे सुरू असलेल्या सराव शिबिरातून भारताच्या खो खो पुरुष आणि महिला संघाची अंतिम निवड ८ आणि ९ जानेवारी २०२५ रोजी जवाहरलाल नेहरू स्टेडियम, नवी दिल्ली येथे होणार आहे. या निवडीसाठी निवड समिती सदस्य म्हणून अॅड. गोविंद शर्मा यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. या निवडीबद्दल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजित पवार, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्री. संजीवराजे नाईक निंबाळकर, भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, जिल्हा खो-खो असोसिएशन अध्यक्ष समीर मुळे, सचिन गोडबोले, आणि बालाजी सागर किल्लारीकर आदींनी अॅड. शर्मा यांचे अभिनंदन केले आहे.




**अशी आहे निवड समिती**

गोविंद शर्मा, माजी सचिव व खजिनदार, (महाराष्ट्र खो-खो असोसिएशन), एम सीतारामी रेड्डी, उपाध्यक्ष, (केकेएफआय), उपकार सिंग विर्क, सहसचिव, (केकेएफआय), सुषमा गोळवलकर, अर्जुन पुरस्कारप्राप्त, एस. एस. मलिक, सचिव, केकेएडी, डॉ. मुन्नी जून (एमडीयू), रोहतक, नितुल दास, खो खो प्रशिक्षक (साई), कु. वंदना पी शिंदे, कर्नाटक, आनंद पोकार्डे, एनआयएस आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू, कोल्हापूर. अशी निवड समिती असेल तर या समितीवर भारतीय खो-खो महासंघाचे अध्यक्ष व सरचिटणीस पदसिध्द म्हणून काम पाहतील.

**अॅड. शर्मा यांच्या समृद्ध कार्यकिर्दीचा गौरव**



छत्रपती संभाजीनगरचे निवासी आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व संभाजीनगर जिल्हा खो-खो संघटनेचे माजी सचिव अॅड. गोविंद शर्मा यांचा क्रीडा क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि योगदान या नियुक्तीमागील महत्त्वाचे घटक आहेत. २०१६ पासून त्यांनी भारतीय खो-खो महासंघाच्या पुरस्कार समिती सदस्य म्हणून काम केले आहे. त्यांनी खेलो इंडिया, महाराष्ट्र राज्य शालेय स्पर्धा, राष्ट्रीय स्पर्धा, आणि नेपाळविरुद्ध झालेल्या खो-खो कसोटी सामन्यांमध्ये प्रशिक्षक आणि तांत्रिक अधिकारी म्हणूनही उल्लेखनीय भूमिका बजावली आहे. २०१६ मधील इंदौर आणि २०२३ आसाम येथील आशियाई खो-खो स्पर्धांमध्ये त्यांनी तांत्रिक अधिकाऱ्याची भूमिका यशस्वीरीत्या निभावली आहे. याशिवाय, छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रीडा मार्गदर्शक म्हणूनही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.



# क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी तिन्ही विभागाचा पदभार घेतला

**मुंबई, दि. ७ जानेवारी-**

क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास मंत्रीपदी नियुक्ती झाल्यानंतर मुंबई येथे या तिन्ही विभागाचा मंत्री पदाचा पदभार घेतला. यावेळी त्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये नाविन्यपूर्ण योगदान दिल्याबद्दल खेळाडूंचा सत्कार केला. याप्रसंगी राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष गणेश पुजारी, अविनाश भडकुंबे आदी उपस्थित होते.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी मंत्री भरणे यांचा सत्कार केला.

**सत्कारमूर्ती खेळाडू :** स्वप्नील कुसाळे (शूटींग ऑलिंपिक ब्राँझ पदक विजेता), सचिन खिलारे (पॅरा ऑलिंपिक रौप्य पदक विजेता, गोळाफेक), दिपाली देशपांडे (द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्या क्रीडा मार्गदर्शक), पद्मश्री मुरलीकांत पेटकर, पंरा ऑलिंपिक पदक विजेते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### विंचूर जिल्हा परिषद शाळेत बालिका दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचूर येथील जिल्हा परिषद शाळेत सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला बचत गटाच्या प्रमिला वांगीकर या होत्या. प्रारंभी कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेत रंगभरण, संगीत खुर्ची, रांगोळी, लिंबू चमचा इत्यादी स्पर्धा घेऊन विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. याप्रसंगी शाळेतील शिक्षिका सौ जमादार मॅडम व नळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमास महानंदा पाटील, रेखा पाटील, सुनंदा जमादार, नीलिमा एकमलले, शिवानी लोणारी, स्नेहा बिराजदार, स्वरा म्हेत्रे, नित्याश्री बिराजदार, गौरी बेनुरे, आरोही पवार व स्नेहल कांबळे होते. सूत्रसंचालन मीना नळे तर आभार प्रदर्शन सुनंदा जमादार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक बसवराज बनपुरे यांचे मार्गदर्शन लाभले.




### समाजातील सर्वच क्षेत्रात पत्रकारांचे योगदान महत्त्वाचे : जयकुमार शितोळे

**बार्शी, दि. ७ जानेवारी -**

समाजातील शिक्षण, कृषी, राजकारण, समाजकारण, उद्योग, कायदा व सुव्यवस्था इत्यादी सर्वच क्षेत्रात लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या समाज माध्यमांचे व त्या क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांचे भरीव योगदान असते, असे गौरवोद्गार श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी व्यक्त केले. लोकसेवा विद्यालय आगळगाव येथे संस्थांतर्गत क्रीडा स्पर्धा व पत्रकार दिनाच्यानिमित्ताने पत्रकारांचा सन्मान सोहळा या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सरपंच पुतळाताई गरड व मुख्याध्यापक सचिन उकिरडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल ओमन, पी.एम. शिंदे व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी पत्रकार संजय बोकेफोडे (लोकमत) असलम काजी (जनता न्यूज) गणेश गोडसे (पुढारी), सागर गरड (जनता न्यूज), बाबासाहेब शिंदे (सकाळ), विनोद ननवरे, सुशांत डमरे (जनता न्यूज) या पत्रकारांचा लेखणी व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश मिरगणे व आभार सुहास बचोटे सर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### समस्यांचे निराकरण करणारा दुवा म्हणजे पत्रकारच : लक्ष्मण नरे

**अणदूर, दि.७ जानेवारी-**

पत्रकार हा समाजाच्या विविध क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करणारा दुवा असला तरी तोच आज मात्र आडगळीला पडला असून,शासनाने लोकशाहीच्या या चवथ्या खांबाला मजबूत करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत तसेच समाजमनात पत्रकाराबद्दल खऱ्या अर्थाने सहनभुती व पाठबळ देण्याची भावना उरली नसल्याची खंत श्रीश्री गुरुकुलचे मुख्याध्यापक तथा पत्रकार लक्ष्मण नरे यांनी व्यक्त केले. ते तुळजापूर तालुका व्हॉइस ऑफ मीडिया डिजिटल विंगच्या वतीने ज्येष्ठ पत्रकारांच्या सत्कार प्रसंगी बोलत होते. प्रारंभी दर्पण कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ पत्रकार सर्वश्री, चंद्रकांत हगलगुंडे, श्रीकांत अणदूरकर, चंद्रकांत गुड, दयानंद काळुंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष सचिन तोग्गि, शिवशंकर तिरगुळे, सचिन कंदले, संजू आलूरे उपस्थित होते.

### शासनाने अँटी लँड ग्रॅबींग कायदा करण्याकरता अध्यादेश काढावा

**सांगोला,दि. ७ जानेवारी-**

सांगोला येथे महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने देवस्थानच्या शेतजमिनी बऱ्याच प्रमाणात लँड ग्रॅबींग द्वारे बेकायदेशिररित्या हडपल्या जात असल्याने महाराष्ट्र शासनाने अँटी लँड ग्रॅबींग (प्रतिबंध) कायदा आणण्याकरता अध्यादेश काढण्याबाबत तसेच जमीन हडपणाऱ्या विरोधी विशेष पथकाची नेमणूक करण्याबाबतचे तसेच देवस्थान किंवा देवस्थान शेत जमिनी बाबत कोणत्याही प्रकारचे निर्णय प्रक्रिया राबवताना सदर प्रक्रियेमध्ये महाराष्ट्र मंदिर महासंघाला आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी, अशी मागणी करत याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावे सांगोला तहसीलदार यांना मंगळवार दि. ७ जानेवारी रोजी देण्यात आले. तहसीलदार संतोष कणसे यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी महाराष्ट्र मंदिर महासंघ शाखा सांगोलाच्या वतीने विठ्ठल गोडसे (ध्यानमंदिर), श्रीकांत देशपांडे (दत्त मंदिर, गोडसेवाडी), ऋषिकेश पुजारी (व्यंकटेश मंदिर), मानस कमलापूरकर, श्रीनिवास इंगोले, उत्तम जाधव (सटवाई मंदिर), श्रीपाद वांगीकर (पुरोहित), उदय पुजारी, अजय तेली, नवनाथ कावळे, चेतन बुरंगे, दत्तात्रय शिंदे, सुभाष लउळकर (दत्त मंदिर), शंकर महादेवकर (विठ्ठल मंदिर,महुद) संतोष पाटणे, श्रेयश तोडकरी उपस्थित होते.

# देगाव एक्सप्रेस कालव्यातून येणाऱ्या पाण्याचे नियोजन करावे

## अक्कलकोट तहसील कार्यालयासमोर शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जानेवारी**

देगांव कालव्याचे काम पूर्ण झाल्यावर थोड्याच कालावधीत शेताच्या बंधाऱ्यावर पाणी येणार असून या पाण्याने जेऊर, मंगरूळ, नागणसूर जिल्हा परिषद गटातील सर्व छोटे-मोठे तलाव भरून घ्यावी. उजनीच्या पाण्याला लिफटद्वारे जोड देऊन तालुक्यातील प्रत्येक तलाव भरून घ्यावे. पावसाळ्यात भीमा नदीतून कर्नाटक राज्यात वाहून जाणारे भरमसाठ पाणी अडवून व वळवून तालुक्यातील प्रत्येक तलाव भरून घेण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे म्हणून तहसील कार्यालयासमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन करण्यात आले.

स्वातंत्र्यापासून अक्कलकोट तालुका हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. एक वर्ष पाऊस पडतो तर दोन-चार वर्ष म्हणावा तसा पाऊस पडत नाही. त्यामुळे येथील शेतकरी अनेक संघटना तोंड देत आहे. यापुढे शेतकऱ्यांना पाणी देण्याबाबत




सूक्ष्म नियोजन व्हायला पाहिजे. देगाव एक्सप्रेस कालव्यातून येणाऱ्या पाण्याचा सूक्ष्म नियोजन प्रशासनाने करण्याची गरज आहे. नागणसूर जिल्हा परिषदमधील नागणसूर, नाविंदगी, गौड़गांव, कडबगांव, उडगी, गळोरगी, तोळणूर, हैद्रा, गुरववाडी, मराठवाडी, बासलेगांव या परिसरात असलेल्या छोटे मोठे तलाव पाण्याने भरून घेतल्यास खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचा सुजलम सुफलम् होणार आहे. तसेच कर्नाटक राज्याकडे जाणाऱ्या भिमानदीचे पाणी हिळ्ळी,खानापूर, आळगी येथे बॅरेज बांधून पंप हाऊस लिप्ट करुन त्या पंप हाऊसद्वारे भीमा नदीचे पाणी अक्कलकोटच्या दक्षिण भागातील तलावात सोडण्यात यावे. तसेच कुरनूर धरणात सोडण्यात येणाऱ्या उजनी धरणाचे पाणी चपळगाव, सलगर, वागदरी, मैदर्गी, दुधनी, अक्कलकोट शहर परिसरातील तलावात पाणी भरून घ्यावे.या सर्व मागणीचा प्रशासन गांभीर्यपुर्वक विचार करुन येत्या महिनाभरात पर्यंत सकारात्मक तोडगा काढावा अन्यथा शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने संबधित सर्व पीडीत शेतकऱ्यांना सोबत घेऊन जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ जिल्हाप्रमुख अमर पाटील, विधानसभा संपर्क प्रमुख उमेश सारंग, तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली आणखीन रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

> गेल्या वर्षापासून ओंकार शुगर कारखाना, गोकुळ साखर कारखाना, सिद्धेश्वर साखर कारखाना, जय हिंद साखर कारखाना, मातोश्री साखर कारखानदारानी शेतकऱ्यांचे थकित बील तात्काळ द्यावे तसेच ऊसाचा पहिला उचल तीन हजार रुपये तर अंतिम दर साडेतीन हजार रुपये दिलेच पाहिजे अन्यथा पुढील काळात प्रत्येक कारखान्यात घुसून पीडित शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचे भूमिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने घेतली आहे.
>
> **- आनंद बुक्कनुरे**
> उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना तालुका पक्षप्रमुख अक्कलकोट

यावेळी करजगी विभागात मंडळ सर्कल मल्लिनाथ सुतार यांनी प्रत्येक शेतकऱ्याचा नोंदणी घ्यायला दहा हजार पेक्षा जास्त पैसे मागत आहे, उतारा द्यायला पाचशे ते हजार रुपये मागत आहे याच्यावर ताबडतोब कारवाई करण्याचे मागणी केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य मल्लिनाथ भासगी तालुका संघटक शरण सुरवसे शेतकरी सेना महांतेश हत्तुरे, उपतालुकाप्रमुख शांतवीर कळसगुंडा, श्रीशैल स्वामी,गुरुनिंगप्पा पाटील,संतोष पाटील, सिद्धाराम बिराजदार, शहर प्रमुख मल्लिनाथ अरवतकल, सिद्धाराम गुब्याड व इतर पदाधिकारी बसवराज पुजारी मल्लिनाथ कल्याण, श्रीशैल धनशेट्टी, स्वामीनाथ प्रचंडे, नितीन मोरे, मंजुनाथ हडपद, बोळेगाव वाघमारे, सुनील धर्मशाले, नागू शिंदे, इलाई पटेल, सागर सुरवसे उपस्थित होते.

## सफाई कामगारांचे ऋण कधीही फिटणार नाहीत : माजी आमदार प्रशांत परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. ७ जानेवारी-**

क्रांतिवीर लहुजी वस्ताद चौक येथे अण्णाभाऊ साठे युवक संघटनेच्या वतीने राजेंद्र वाघमारे ह्यांचा सेवानिवृत्त निमित्त सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमास प्रमूख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत परिचारक उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र वाघमारे यांचा सपत्नीक सत्कार केला तसेच सफाई कर्मचारी मामजी पाटोळे, इंदुबाई पाटोळे, संगीता वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला.

आमदार प्रशांत परिचारक म्हणाले, राष्ट्राच्या विकासासाठी सैन्यदल, मंत्रालयातील सचिवालय तसेच विविध शासकीय निमशासकीय वरिष्ठ अधिकारी ह्यांच जस योगदान आहे तसेच योगदान ह्या सफाई कामगरांचे आहे हे नाकारून चालणार नाहीं. परंतु समाजात योग्य तो मानसन्मान कर्मचाऱ्यांना मिळायला पाहिजे तो मिळत नाही ही शोकांतिका आहे. आजपर्यंत समाजावर सफाई कामगारांचे ऋण आहेत आणि आपण ते ऋण कधीच फेडू शकणार नाही किंबहुना सफाई कामगारांचे पाय धूऊन पाणी पील तरी सुद्धा हे



ऋण फिटणार नाही असे गौरवद्गार परिचारक यांनी सफाई कामगार ह्यांच्या बद्दल काढले.

यावेळी महादेव अदापुरे, दशरथ कांबळे, ॲड.किशोर खिलारे, गुरू दोडिया ह्यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी दलित मित्र नानासाहेब वाघमारे, माजी नगरसेवक गुरुदास अभ्यंकर, राजू सर्वगोड, अमोल डोके अशोक शिंदे, अप्पा राऊत, संतोष पवार, बजरंग बंदपट्टे, धनंजय वाघमारे, जॉकी वाघमारे, गणेश वाघमारे, भिमराव वाघमारे, अशोक वाघमारे, ज्ञानेश्वर वाघमारे, विनोद वाघमारे, विठ्ठल वाघमारे, संजय आडगळे, दत्ता खिलारे, धनंजय खिलारे, दत्ता यादव, राजु देवकुळे, जिवन कांबळे, उमेश सर्वगोड, प्रदिप रणदिवे, ॲड.बादल यादव, बुवा कदम, अमित अवघडे, दत्ता चंदनशिवे, दास आंबुरे बापू रणदिवे, नागेश खिलारे, बाबा घाडगे, नारायण देवकुळे, दशरथ देवकुळे, यालप्पा कबाडे, बाळासाहेब सर्वगोड उपास्थित होते. सूत्रसंचालन शंकर वाघमारे यांनी केले. प्रास्ताविक आणि आभार माजी नगरसेवक कृष्णा वाघमारे यांनी मांनले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बापू वाघमारे, संदेश कांबळे, नितीन वाघमारे, अभिजीत कांबळे, सदाभाऊ वाघमारे, दीपक वाघमारे, दशरथ यादव, सर्जेराव खिलारे, सागर देवकुळे, नितीन वाघमारे, सुधीर रणदिवे किरण अवघडे, किरण शेंडगे, विघ्नेश वाघमारे, गणेश वाघमारे यांनी परिश्रम घेतले.



## फार्मसीच्या विद्यार्थ्यांना औषध निर्माण कंपन्यांमध्ये संधी

**टेंभुर्णी, दि. ७ जानेवारी-**

टेंभुर्णी मधील आर्या कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये रोल ऑफ क्वालिटी अॅशुरन्स विषयावरती व्याखानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याखानासाठी कैलास भोसले यांना आमंत्रित केले होते. कैलास भोसले हे लुपिन फार्मा.लि. गोवा येथे सिनीयर एक्सिक्युटिव्ह या पदावर कार्यरत आहेत. या सेशनमध्ये त्यांनी विद्यार्थांना फार्मा इंडस्ट्री मधील कामकाजाबद्दल माहिती दिली. इंडस्ट्री मधील वेगवेगळे विभाग जसे की मॅन्युफॅक्चुरिंग, क्वालिटी कंट्रोल, क्वालिटी अॅशुरन्स, प्रोडक्ट डेव्हलपमेंट, रेगुलेटरी अफेअर्स व फंक्शन ऑफ क्वालिटी अॅशुरन्स या विषयावरती सविस्तर माहिती दिली व डि फार्मसीच्या उत्तीर्ण विद्यार्थांना औषधनिर्माण कंपन्यामध्ये अमर्याद संधी उपलब्ध आहेत असे प्रतिपादन केले. प्राचार्य धनंजय चव्हाण यांनीही विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीमध्ये तसेच गव्हर्मेंट फार्मासिस्ट व मेडिकल कोडींग मध्ये फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना भरपूर संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. प्रास्ताविक प्रा. हर्षवर्धन वाघमारे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक तुषार कन्हेरे, साक्षी देवकर, संजीवनी कुटे, प्रतीक्षा मुळे उपस्थित होते.



## रेझिंग डे निमित्त विद्या मंदिर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी दिली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ जानेवारी-**

वैराग येथील विद्या मंदिर हायस्कूलचे विद्यार्थी व विद्यार्थिनीं रेझिंग डे च्या निमित्ताने वैराग पोलीस स्टेशनला भेट दिली यावेळी पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी व्यवस्थीत व चांगल्या प्रकारे विद्यार्थ्याना समजेल अशी शस्त्रास्त्रांची ओळख करून त्याबाबतची माहिती दिली. तसेच पोलीस ठाणेतील ठाणे अंमलदार कक्ष, बिनतारी संदेश विभाग, मुद्देमाल कक्ष, लाठी, ढाल, गोपनीय शाखा, कंपनी ऑर्डरली , क्राईम विभाग, डि.बी पथक, अपघात पथक, पोलीस अंमलदार कक्ष, मुद्देमाल कारकून इत्यादींची व पोलीस स्टेशनच्या कामकाजाबाबतची तसेच सायबर क्राईम, मुलींच्या सुरक्षेबाबत माहिती देण्यात आली . यावेळी किसन कोलते व अन्य कर्मचारी उपस्थीत होते.

## मोडनिंब शाळा परिसरात गतिरोधक बसवावेत

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ७ जानेवारी-**

मोडनिंब(ता.माढा) येथे वेगाची मर्यादा न पाळता वाहने दामटणाऱ्या वाहनचालकांना आवर घालण्यासाठी आणि होणारे अपघात टाळण्यासाठी रस्त्यावर गतिरोधक अथवा रब्लिंग स्ट्रिप बसविले जावेत, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील यांनी केली.



या मागणी संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागास लेखी निवेदन देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य रस्त्यावर गतिरोधक नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होते. कोणतीही दुर्घटना घडू नये, याकरिता संबंधित विभागाला पत्रव्यवहार करीत संबंधित बाबीकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे. तसेच म हालिंगेश्वर मंदिर नजीक मार्गावर मोठे वळण असल्याने अनेकदा या ठिकाणी अपघात होत आहेत.

> **रस्ता ओलांडताना विद्यार्थ्यांची तारांबळ**
>
> शाळा परिसरात मुख्य रस्त्यावर वाहने सुसाट वेगाने धावतात.याचा अंदाज विद्यार्थ्यांना येत नाही.रस्ता ओलांडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊन अपघाताची शक्यता वाढते. जिल्हा परिषद शाळेत येणाऱ्या विध्यार्थ्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणात आहे.वाहनांच्या वर्दळीने शाळेत जाणाऱ्या मुलांना व त्यांना सोडवण्यासाठी आलेल्या पालकांची मोठ्या प्रमाणात रस्ता ओलांडताना तारांबळ उडत आहे.
>
> **- विकास यादव,** गटशिक्षणाधिकारी

> गतिरोधक करून या गतिरोधकांवर पांढरे पट्टे ओढावेत. गतिरोधकाची उंचीही प्रमाणित उंची असावी. उंचीमुळे दुचाकीस्वारांचे हाल होतात. यामुळे गतिरोधकांसाठी आखून दिलेले नियम पाळावे.मुख्य रस्त्यावर वाहने उभी केल्याने नेहमीच वाहतुकीची कोंडी होत असल्याने वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.
>
> **- मंगेश पुरवत, पालक**

# शेतीमालाला गावातच बाजारपेठ मिळवून देणे गरजेचे

## दिलीप माने; पाकणीत आठवडी बाजाराची सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतीमालाला त्याच्या गावात आणि पंचक्रोशीतील गावांमध्ये बाजारपेठ मिळवून देणे गरजेचे असल्याचे मत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिलीप माने यांनी व्यक्त केले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील पाकणी गावामध्ये आठवडी बाजाराच्या उद्घाटन प्रसंगी माने हे बोलत होते. आठवडी बाजाराची सुरुवात दिलीप माने यांच्या हस्ते श्री नरसिंह महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली होती. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिलीप माने हे अध्यक्ष असताना त्यांनी बाजार समितीत मनुका लिलाव, गुळ बाजार, शेतकऱ्यांना एक रुपयांमध्ये जेवण, सकाळी विकलेल्या मालाची दुपारी रोख पट्टी (पैसे) देण्याची व्यवस्था अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून माने यांनी शेतकऱ्यांना न्याय दिला आहे त्याच धर्तीवर आज त्यांनी पाकणी



येथील शेतकऱ्यांकरिता आठवडा बाजार सुरू करून दिल्यामुळे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी बाळ यांचे आभार मानले.

यावेळी कार्यक्रमास सरपंच बालाजी येलगुंडे, उपसरपंच विजय शिंदे, ज्ञानोबा साखरे, सुनील शिंदे, सचिन ढेपे, रवी शिंदे, पांडूरंग बेलभंडारे, महादेव ढेंगले, नामदेव कुंभारे, श्रीकांत येलगुंडे,ग्रामपंचायत सदस्य श्रीशैले कुंभारे, सौरभ शिंदे, परिनीता शिंदे, बाळासाहेब येलगुंडे, आधीसह पाकणी ग्रामस्थ उपस्थित होते.

> सर्वसामान्य माणसाच्या भावनांचा विचार करणारा व्यक्ती म्हणून उत्तर सोलापूर तालुक्यामधील जनता दिलीप माने यांच्याकडे पाहत आहे. माने यांनी आम्हाला गावातच आठवडी बाजार निर्माण करून दिल्यामुळे आता आमची ताजी भाजी पाला व इतर वस्तूला गावातच ग्राहक मिळेल आणि ग्राहकांनाही ताजी भाजी (माळव) मिळेल कारण आम्ही इथून बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी भाजीपाला घेऊन जायचं तो विकायचा दुसऱ्या दिवशी विक्री त्याकडून किरकोळ विक्रेत्याकडे तो भाजीपाला विक्री होणार आणि मग ग्राहकापर्यंत पोहोचणार त्यामुळे भाजीपाला टवटवीत राहत नव्हता परंतु आता आठवडी बाजार सुरू झाल्यामुळे आमच्या शेजारच्या सात आठ गावांमध्ये या बाजाराचा उपयोग होईल आणि आम्हाला स्थानिकच बाजारपेठ मिळेल अशी भावना शेतकरी वर्गांनी व्यक्त केली आहे.

> **खूप दिवसापासूनची इच्छा होती**
>
> आपल्याही गावांमध्ये आठवडी बाजार भरावा आणि गावातल्या गावातच व्यवहार फीरावा कारण गावातला पैसा गावातल्या माणसाच्या हातामध्ये आला तर गावाच्या चलनामध्ये वाढ जरी नाही झाली तरी नुकसान तरी होत नाही. मात्र हाच भाजीपाला आपण बाहेरून ज्यावेळी खरेदी करतो. तेव्हा गावातला पैसा इतर बाजारपेठेत जातो. त्याचा गावाला आणि गावातल्या व्यक्तीला उपयोग होत नाही .मात्र या आठवडी बाजारमुळे गावातले चलण गावातच फिरत राहणार आहे. ते केवळ दिलीप माने यांच्यामुळेच. गावात बाजारपेठ असावी अशी खूप दिवसापासून इच्छा होती ती आता पूर्ण झाली.



## तयारी सिद्धेश्वर यात्रेची

सोलापूर : सिध्देश्वर देवस्थानच्या यात्रेनिमित्त गड्डायात्रा समितीने मानाच्या नंदीध्वच्या लग्नसमारंभासाठी मोगले दुकानात मानकरी व देवस्थान पंचकमीटीने बस्ता बांधणी केली.

# दुहेरी जलवाहिनी अंथरण्याचे काम ९४ टक्के पुर्ण

### हायड्रोलिक टेस्टिंगचे काम सुमारे ७८.४७ कि.मी. झाले काम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजने अंतर्गत सुरू असलेला शहराचा महत्त्वकांक्षी दुहेरी जलवाहिनी प्रकल्प येत्या महिन्याभरात पूर्ण होऊन पुढील प्रक्रियेसाठी फेब्रुवारीपर्यंत तयार असणार आहे. उजनी ते सोलापूर या एकूण ११० किलोमीटर पैकी १०८.९८ किलोमीटर (९९ टक्के) पर्यंतच्या पाईपचा साठा उपलब्ध झाला असून यातून १०३.७० किलोमीटर (९४ टक्के) जलवाहिनी अंथरण्याचे काम आता पुर्ण झाले आहे, अशी माहिती स्मार्ट सिटी योजनेतील तांत्रिक अधिकारी तथा महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

सोलापूर शहरातील नागरिकांना लवकरात लवकर जलद वेळेत आणि सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्याच्या जोरदार हालचाली सुरू आहेत. सोलापूरची जीवनदायी मानल्या जाणाऱ्या उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे. हैदराबाद येथील पोचमपाड कंपनीकडून हे काम करण्यात येत आहे. नुकतेच सोलापूर स्मार्ट सिटी प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार गोपीचंद कदम यांनी घेतला आहे. पदभार घेताच त्यांनी दुहेरी जलवाहिनी कामाची पाहणी केली. या संदर्भात सविस्तर आढावा घेऊन संबंधितांना सूचना केल्या आहेत. या कामासाठी असलेल्या अडथळ्यांना दूर करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले असून काही अडथळे मार्गी देखील लागले आहेत. यामुळे हा प्रकल्प आता वेगाने पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील प्रक्रिया देखील वेगाने करण्यात येणार आहे. हे काम फेब्रुवारी पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. उजनी ते सोलापूर या एकूण ११० किलोमीटर पैकी १०८.९८ किलोमीटर (९९ टक्के) पर्यंतच्या पाईपचा साठा उपलब्ध झाला असून यातून १०३.७० किलोमीटर (९४ टक्के) जलवाहिनी अंथरण्याचे काम आता पुर्ण झाले आहे.

जॅकवेलचे ३५ बाय ४० बाय १८.५ मीटर खोदाईचे काम एका सिझनमध्ये झाले. होते. त्यावर एकूण १२ पंप बसविण्यात आले आहेत. यासह या जॅकवेल कन्स्ट्रक्शनचे व इतर काम असे एकूण ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. हायड्रोलिक टेस्टिंगचे काम सुमारे ७८.४७ किलो मीटरचे (७१ टक्के) काम पूर्ण झाले आहे. कराराप्रमाणे नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न होता. मात्र काही अडथळ्यांमुळे हे काम पूर्ण झाले नाही. आता हे काम येत्या महिनाभरात पूर्ण करण्याचे शर्तीचे प्रयत्न राहणार असून फेब्रुवारी महिन्यात शहराच्या पाणीपुरवठ्याची पुढील कामांची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे व्यंकटेश चौबे यांनी स्पष्ट केले.

**पाकणी येथील जलशुद्धीकरण केंद्र कामाची प्रक्रिया युध्दपातळीवर**
या प्रकल्पाअंतर्गत पाकणी येथे जलशुद्धीकरण केंद्र (डब्ल्यूटीपी) उभारण्यात येणार आहे. या कामासाठी निविदा प्रक्रिया झाली आहे. यापूर्वी निविदा प्रसिद्ध केली होती मात्र प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे पुन्हा निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. याच्या कामाची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे.



# कष्ट, जिद्द, परिश्रम ही यशाची त्रिसूत्री आहे : प्रदीप सबनीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

विद्यार्थी दशेतचांगले संस्कार झाले तर ते आयुष्यभर पुरतात जीवनात. यशस्वी व्हायचे असेल तर कष्ट, जिद्द, परिश्रम यातील सृष्टीचा अवलंब करण्यास विद्यार्थ्यांच्या मनात रुजवावे लागेल तरच यशाची प्राप्ती होणार आहे. असे प्रतिपादन सेवाभारती पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत सचिव प्रदीप सबनीस यांनी केले.

सेवाभारती सोलापूर जिल्ह्याच्या वतीने आयोजित फिरती विज्ञान प्रयोग शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी व्यक्तिमत्त्व शिबिराचा समारोप झाला. त्याप्रसंगी सबनीस बोलत होते. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष अनिरुद्ध पवार, डॉ. अमोल निकम, जिल्हा सचिव बाबूलाल वर्मा, प्रांताचे सामाजिक आयाम प्रमुख सदानंद कुलकर्णी, उपाध्यक्ष वर्षा भावार्थी, शिबिराधिकारी शैलजा मुरूमकर, प्रकल्प प्रमुख धोंडू केंगले, प्रकल्प शिक्षक महादेव सोनगी उपस्थित होते.

यांप्रसंगी अनिरुद्ध पवार म्हणाले, मिळालेले ज्ञान वाटल्याने ते वाढते. निवासी शिबिरातून मिळालेल्या संस्काराची जपणूक करून आदर्श नागरिक होण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा. माणुसकी जपली तरच आपले भवितव्य उज्वल आहे. उपस्थित विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन सेवाभारती सोलापूरचे शिक्षण आयाम प्रमुख मोरेश्वर काटवे यांनी केले तर प्रास्ताविक बाबुलाल वर्मा यांनी केले. आभार सहप्रकल्प प्रमुख ज्ञानेश्वर लवटे यांनी मानले. हे निवासी शिबिर यशस्वी करण्यासाठी महिला प्रमुख मेघना झांबरे, प्रेमा वेर्णेकर, बजरंग कुलकर्णी किरण कोल्हापुरे, मार्तंड चौरे, महादेव सोनगी यांनी विशेष प्रयत्न केले.



# एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेमध्ये लुईस ब्रेल यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

नॅब संचलित एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेमध्ये लुईस ब्रेल यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नॅब संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री. अंकुश कदम सर यांच्या शुभहस्ते लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी अंधकार्यशाळेचे अक्षिक्षक रामचंद्र कुलकर्णी सर होते. यावेळी प्रास्ताविक रियाज मुल्ला सरांनी केले. सदर कार्यक्रमात कु. आकांक्षा भंडारे मॅडम यांची उपस्थिती होती. दीपांजली केसकर यांनी लुईस ब्रेल यांच्या कार्याविषयी विस्तृतपणे माहिती सांगितली. लुई ब्रेल जयंतीनिमित्ताने कार्यशाळेत पासिंग बॉल, गीतगायन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, ब्रेल वाचन व अंताक्षरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सूत्रसंचालन शिवकुमार पाटील तर आभार प्रदर्शन दयानंद चौगुले यांनी केले.

# आरोग्याच्या दृष्टीने प्रभागातील नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या : किसन जाधव

### प्रभाग २२ येथे ड्रेनेज लाईन कामाचे शुभारंभ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या विशेष सहकार्यातून राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष नागेश गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या हेड अंतर्गत ८ लाख ९८ हजार ६९२ रुपये खर्चित प्रभाग क्रमांक २२ येथील रामवाडी अंबाबाई देवी मंदिरच्या पाठीमागील परिसरात ड्रेनेज लाईन कामाचे शुभारंभ करण्यात आला.

गेल्या काही वर्षांपासून या परिसरात ड्रेनेज लाईन टाकण्याची येथील स्थानिक रहिवाशांचे मागणी होती ड्रेनेजलाईन नसल्यामुळे सांडपाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावरच साचत होते यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरत असल्याचे परिस्थिती होती असल्यामुळे येतील स्थानिक येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते ही गंभीर बाब लक्षात त्वरित या परिसरात ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी प्रयत्न सुरू झाले त्यानुसार या कामाचे शुभारंभ झाल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने येथील नागरिकांच्या समस्या दूर झाल्या यामुळे येथील स्थानिकांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे मनोगत यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव यांनी व्यक्त केलं.

या ड्रेनेज लाईन कामाचे शुभारंभ प्रसंगी सुनिता कांबळे, मालती सारवडकर, नूरजहा शेख, सुवर्णा शितोळे, सीताबाई शितोळे,मीना बनसोडे, दीपा स्वामी, वत्सला गायकवाड, विमलताई कांबळे, सुनंदा माळंत्री, सुदर्शन माळगे, सखुबाई कांबळे, दत्तात्रय डोंगरे, सागर कांबळे, शंकर गायकवाड, बाळासाहेब शितोळे, प्रदीप गायकवाड,दीपक गायकवाड, सलीम शेख, लक्ष्मण कांबळे, शेखर कांबळे, मल्लिकार्जुन वाघमारे, धनंजय माळगे, शिवशरण दोडमणी, फिरोज पठाण, वसंत कांबळे, माणिक कांबळे, महादेव राठोड आदींच्या उपस्थितीत या ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाचे विधिवत पूजन होऊन या कामाचे शुभारंभ करण्यात आले.





# शहराच्या मध्यवर्ती सराफ बाजार भागातील फिटरिम जीमचे उद्घाटन

- तत्कालीन पोलिस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय, राजेंद्र माने यांच्या हस्ते शुभारंभ
- रिपाइं नेते जोगेंद्र कवाडे यांच्याकडून जीमची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी -**

सोलापुरातील मध्यवर्ती भागात अर्थात मंगळवार पेठ इथल्या सराफ बाजार पेठ परिसरात उभारण्यात आलेल्या फिटरिम जिम या अद्यावत अशा जिमचा शुभारंभ नुकताच राज्याचे माजी पोलीस महासंचालक डॉ. भूषण कुमार उपाध्याय आणि राज्याचे माजी पोलीस उपमहानिरीक्षक राजेंद्र माने यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी रिपाइंचे ज्येष्ठ नेते जोगेंद्र कवाडे, पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, माजी पोलीस निरीक्षक भास्कर गायकवाड, सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश देवरमणी, रिपाई चे प्रदेश अध्यक्ष ज्येष्ठ नेते राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे, बाळासाहेब वाघमारे, आनंद चंदनशिवे, दशरथ कसबे, नागेश गायकवाड, विनयकुमार आपटे, सारंग आपटे, महेश आपटे, शार्दुल आपटे आदी उपस्थित होते.

नुतन जीमच्या उद्घाटनावेळी बबनराव शिंदे, पापाशेठ डायमंड, बालाजी एक्झाम, संतोष नारायणपेठकर, कपिल नारायणपेठकर, महेश धाराशिवकर, अविनाश पाटील, ओमकार पवार, वैभव पाटील, राजू भिसे, ओम जवळेकर, मयंक बळकोटे, अमित कुलकर्णी, शारदा गायकवाड, डॉ. किरण पराग, सुमन जगताप, गंगाराम जोगदंडकर, कराडकर, मुबारक मुजावर, प्रा. लोखंडे, संजय खरात आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावत गायकवाड बंधूना नुतन व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या. सध्याच्या जमान्यात जो तो स्वतःच्या शरीराबद्दल जागरूक झाला आहे. तरूणांमध्ये जीमची क्रेझ मोठ्या प्रमाणात आहे. तरूणांसोबतच मध्यम वयातील नागरीकांमध्येही आता जीमबद्दल आकर्षण वाढू लागले आहे. सोलापूर शहराच्या हद्दवाढ भागामध्ये जीम वाढलेले आहेत. परंतु. सोलापुर शहरातील मध्यवर्ती भागात अद्ययावत जीमची आवश्यकता होती. हेच ओळखून रोहन गायकवाड व ॲड. रोहित गायकवाड या बंधूनी शहराच्या मध्यवर्ती भागात म्हणजेच सराफ बाजारात अद्ययावत अशा फिटरीम जीमची उभारणी केली आहे.

स्मार्ट सोलापुरात पुण्या-मुंबईच्या धर्तीवर अद्ययावत अशा जिमची उभारणी केल्याबद्दल माजी पोलिस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी गायकवाड परिवाराला शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. सर्व सोयीयुक्त व अद्ययावत मशिनरीसहच्या जीमची जिमची सोलापुरात आवश्यकता होती , अशा भावना व्यक्त करून निश्चितच या जीमचा सोलापूरकरांना लाभ होईल असा विश्वास माजी पोलिस उपमहानिरीक्षक राजेंद्र मानेय यांनी व्यक्त केला.

यावेळी सर्व मान्यवरांचे स्वागत बाळासाहेब गायकवाड, भारती गायकवाड, जीमचे संचालक रोहन गायकवाड, ॲड. रोहित गायकवाड यांनी केले. याप्रसंगी सचिन गायकवाड, विनोद गायकवाड, प्रभाकर गायकवाड, राहुल गायकवाड, गणेश गायकवाड, हर्षल गायकवाड, जिचे व्यवस्थापक श्रीकांत सोनटक्के आदी उपस्थित होते.

सोलापुरात अत्यंत दर्जेदार आणि सर्व सोयीसुविधांनी युक्त अशा जीमची उभारणी करण्यात आल्याचे सांगून सोलापूरकरांनी या जीमचा लाभ घेऊन शरीरीसंपदा कमवावी असे आवाहन जीमचे संचालक रोहन गायकवाड व ॲड. रोहित गायकवाड यांनी केले आहे.

# पंढरपूरच्या विकासासाठी पत्रकारांची भूमिका महत्त्वाची

### आ. समाधान आवताडे, अभिजित पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकारांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ जानेवारी-**

पंढरपूर येथे सर्व पत्रकार संघटनांच्या वतीने पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूरचा सर्वांगीण विकासासाठी नागरिक, लोकप्रतिनिधी आणि पत्रकारांनी समन्वय साधला पाहिजे. विकासाच्या मुद्यावर सर्वांनी एकत्र आले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आ. समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार अभय जोशी हे होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशाखी जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सर्व पत्रकार संघाच्या अध्यक्षांचा तसेच पत्रकार बांधवांचा वही, पेन आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पंढरपूर शहर व तालुक्यातील वृत्तपत्र, साप्ताहिक, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे ज्येष्ठ पत्रकार, तसेच नवोदित पत्रकार बांधव उपस्थित होते.

यावेळी आमदार आवताडे म्हणाले की, पंढरपूर शहर व तालुक्याच्या विकासासाठी पत्रकारांनी चांगल्या गोष्टी सुचवल्या आहेत. पंढरपूरचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. याचबरोबर चंद्रभागा नदी शुद्ध झाली पाहिजे. ही बाब लक्षात घेऊन चंद्रभागेत जाणारे अस्वच्छ पाणी रोखण्यासाठी मला निसारण योजनेसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच मतदार संघात रस्ते, वीज, पाणी यासाठी काम सुरू आहे.

**विजयात पत्रकारांचा मोलाचा वाटा आ.पाटील**
आ.अभिजीत पाटील म्हणाले, राजकीय नेत्यांच्या जडणघडण्यामध्ये पत्रकारांचा मोलाचा वाटा आहे. पत्रकारांच्या मार्गदर्शनामुळे मला विधानसभेत जाता आले. यामध्ये पत्रकारांचा सिंहाचा वाटा आहे. पंढरपूरला विमानतळ झाले पाहिजे, याचबरोबर यमाई तलावाचे सुशोभीकरण केल्यास येथील छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांना आर्थिक लाभ होईल.







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नू.म.वि. मराठी शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
नू.म.वि. मराठी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन व महिला शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा जेथे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. शिक्षकांच्या वतीने आशा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आशा गायकवाड यांनी केले.





## संक्षिप्त वृत्त...

### महापालिकेतील कर्मचाऱ्यांना मेडिकल कॅशलेस विमा सुविधा द्या

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांच्या कामाची वेळ पूर्ववत करण्याची मागणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियन व महापालिका कामगार संघटना संघर्ष समितीच्या वतीने अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**महापालिका कामगार संघटना संघर्ष समितीची निवेदनाद्वारे मागणी**

महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कर्मचाऱ्यांची कामाची वेळ पूर्वीप्रमाणे पहाटे ६ ते दुपारी २ अशी करावी. सोमपा मधील आस्थापना वरील कायम अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबाची माहिती अद्यावत करण्याचे नियोजन परिपत्रक काढले असून त्याप्रमाणेच इतर कर्मचाऱ्यांची सुद्धा माहिती अद्यावत करावी. सोलापूर महानगरपालिकेतील अधिकारी,कायम कर्मचारी व बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना मेडिकल (विमा) कॅशलेस कार्ड सुविधा उपलब्ध करावी. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कायम व बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षी प्रमाणे महिला झाडूवाली यांना दोन साड्यांचे वाटप करण्यात यावे.गटार बिगारी, ड्रेनेज बिगारी, सफाई कर्मचारी यांना खाकी कलरचा ड्रेस व शिलाई भत्ता आणि कामाचे साहित्य देण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी जेष्ठ कामगार नेते जनार्दन शिंदे साहेब, सायमन गट्टू, चांगदेव सोनवणे, अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, राम चंदनशिवे, सुनील शिंदे, चंद्रकांत सर्वगोड आदी कर्मचारी उपस्थित होते.

### प्रसन्न ग्लोबल स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
प्रसन्न ग्लोबल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी अश्विनी हॉस्पिटलच्या ट्रस्टी हेमाबेन पटेल व चेतना फाऊंडेशनचे विशाल शिवशरण व प्रसन्न ग्लोबल स्कूलचे संचालक प्रसन्न नाझरे, मुख्याध्यापिका दिपाली पवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. यावेळी स्टार ऑफ द स्टूडंट हा अवॉर्ड देण्यात आला. यावेळी प्रेक्षकांमधून एक लकी ड्रॉमध्ये श्री व सौ. साखरे यांनी किताब पटकावला.

### गुंतवणूकदार शिक्षण, जागरूकता उपक्रम

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
प्रत्येक मोठी कामगिरी एका लहान पावलापासून सुरू होते.आपण चालायला शिकण्यापूर्वी उभे राहायला शिकतो आणि मग पहिले पाऊल टाकतो. त्याचप्रमाणे संपत्ती निर्माण करण्यासाठी लहान सुरूवात करणे, सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि शिस्तबद्ध राहण्याची गरज असते. पारंपरिक गुंतवणुकीचे पर्याय एकेकाळी मान्यताप्राप्त होते. परंतु आजच्या आर्थिक वातावरणात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यांच्यापैकी एक म्हणजे प्रामुख्याने सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी)च्या माध्यमातून म्युच्युअल फंड होय, जे संपत्ती निर्मितीचे शक्तिशाली आणि सहजसाध्य माध्यम आहे. एसबीआय म्युच्युअल फंडकडून गुंतवणूकदार शिक्षण आणि जागरूकता उपक्रम आहे.आर्थिक स्थैर्य आणि संपत्ती निर्मिती या गोष्टींना सर्वाधिक महत्त्व असलेल्या या जगात दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे आव्हानात्मक असू शकतात. विशेषतः मर्यादित स्त्रोत असतील तेव्हा. परंतु एसआयपीचा साधेपणा आणि प्रभाव यांच्यामुळे ते आदर्श पर्याय ठरतात.

### नेटफ्लिक्सच्या स्क्विड गेम सीझन २ सोबत सहयोगासाठी भागीदारी

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
सीग्राम्स रॉयल स्टॅग ने नेटफ्लिक्सची विक्रमी लोकप्रिय मालिका स्क्विड गेम च्या दुसऱ्या सीझनसाठी भागीदारी केली आहे.या सहयोगामुळे रॉयल स्टॅग च्या 'लाइव्ह इट लार्ज' तत्त्वज्ञानाचा समावेश सहजपणे केला गेला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना एका भव्य अनुभवाचा भाग बनण्याची संधी मिळेल.ही मालिका संपूर्ण जगभरातील कोट्यवधी प्रेक्षकांना मोहून टाकत आहे. के-ड्रामा युवकांमध्ये लोकप्रिय असल्याने, ही भागीदारी ब्रँडसाठी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या युवा प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याची संधी निर्माण करते, ज्यामुळे त्याचा आकर्षण आणि प्रासंगिकता आणखी वाढते.यावेळी मार्केटिंग जॉयदीप बसुरॉय म्हणाले,नेटफ्लिक्सच्या स्क्विड गेम सोबत रॉयल स्टॅगची भागीदारी ब्रँडला युवा पिढीच्या के-कल्चरच्या क्रेझला जोडण्याची संधी देते, ज्यामुळे भावनिक संबंध वाढतो आणि ब्रँडचा युवा कल्चर उंचावतो.

# दीपप्रज्वलनाने सिद्धेश्वर यात्रेस आज होणार प्रारंभ

**• यात्रेतील प्रमुख मानकऱ्यांच्या घरात होणार दिवे प्रज्वलित व हिरेहब्बू यांचे पाद्यपूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जानेवारी-**
ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. यात्रेतील विविध मानकरी यांच्या घरी दिवे प्रज्वलित करून तसेच यात्रेचे प्रमुख हिरेहब्बू यांचे पाद्यपूजन करून आज बुधवारपासून यात्रेस सुरुवात होणार आहे.

दरम्यान, ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेच्या परंपरेनुसार यात्रेचे प्रमुख मानकरी हिरेहब्बू यांच्या प्रमुख उपस्थितीत मानकरी दर्गो पाटील, धुम्मा, मुस्तारे, मसरे, कळके, हब्बू यांच्या घरी दीप प्रज्वलन करून तसेच पाद्यपूजन करून भाविकांना प्रसाद वाटप केला जातो. ही परंपरा अखंडपणे सुरू आहे. सलग पाच दिवस हे दिवे अखंडपणे प्रज्वलित करण्यात येतात. घरातील महिला पाच दिवस कडक उपवास ठेवतात. श्री सिद्धेश्वर मंदिरात दररोज घरातून नैवेद्य अर्पण करण्यात येतो. त्यामध्ये गव्हाची खीर, वांगी भाजी, हरभरा डाळीची चटणी, भात, सार, वरण, चपाती, पापड असे खाद्यपदार्थ घरात तयार केले जातात भाविक व नातेवाईकांना प्रसादासाठी आमंत्रित केले जाते.



यात्रेतील मानकरी दर्गोपाटील, धुम्मा, मुस्तारे, मसरे, कळके, हब्बू या परिवारातील देवघरात दिवे प्रज्वलित करण्यात येतात. प्रत्येक मनकाराच्या घरामध्ये प्रथेनुसार दि. ८, ९ व १० जानेवारी तारखेला दिवे लावतात. हे दिवे पाच दिवस अखंडपणे तेवत ठेवले जातात. या पार्श्वभूमीवर मानकरी यांच्या घरात यात्रेची तयारी सुरू असते. घर स्वच्छ केले जाते, काळे व लाल तिखट, शेवया, पापड, चटणी आदी पदार्थ तयार केले जातात. घरावर विद्युत रोषणाई करण्यात येते.

**पंचकमिटीची तयारी अंतिम टप्प्यात**

याच यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी सकाळी सिद्धेश्वर मंदिर स्वच्छतेला वेग आला. महापालिका प्रशासन, अग्निशामक दल आणि श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी यांच्या वतीने मंदिराच्या सोनेरी कळसाला पाण्याचा मारा करून स्वच्छता करण्यात आली. तसेच मंदिरा सभोवताली देखील पाणी मारून परिसर स्वच्छ करण्यात आला. दरम्यान, श्रींच्या गड्डा यात्रेसाठी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी सज्ज झाले आहे. यात्रेनिमित्त मंदिर परिसरात स्वच्छता झाडलोट तसेच सुवर्णसिद्धेश्वरचे काम प्रगतीपथावर आहे. श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात तसेच दर्शन मंडपातील गाभाऱ्यात चांदीचा व त्यानंतर सोन्याचा मुलामा देण्यात येत आहे. राजस्थान येथील कारागिर यासाठी रात्रंदिवस राबत आहेत. दर्शन मंडपातील गाभारा चांदी व सोन्याचा मुलामा दिल्याने सर्वत्र सुवर्ण झळाळी आलेली दिसत आहे.

यासाठी सुमारे बाराशे किलो चांदी तर दोन किलो सोन्याचा वापर झाला असल्याचे सांगण्यात आले. त्याच पद्धतीने मंदिरात आलेल्या भाविकांना दासोह अर्थात महाप्रसादाचे देखील दररोज आयोजन केले जात आहे. दररोज सुमारे दोन ते तीन हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेत आहेत. यात्रा काळामध्ये यामध्ये आणखीन वाढ होत आहे. दर सोमवारी भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात असल्याने दासोहमध्ये देखील भाविक महाप्रसाद घेण्यासाठी आवर्जून उपस्थित असतात. त्यासाठी मंदिर समितीच्या वतीने सर्व तयारी करण्यात येत आहे. यात्रा काळामध्ये भाविकांसाठी दासोहमध्ये कडक भाकरी देखील बनवण्यात येणार आहेत, अशी माहिती व्यवस्थापक बिराजदार यांनी दिली. एकंदर ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त मंदिर परिसरात स्वच्छता, सुवर्ण सिद्धेश्वर आणि दासोह यांची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, लवकरच यात्रेच्या धार्मिक विधींना प्रारंभ होणार आहे. त्यापूर्वी हे सर्व तयारी पूर्णत्वास जाणार असल्याचे सांगण्यात आले.




सिध्देश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदीर आणि मंदीर परिसर पाण्याने स्वच्छ करण्यात येत असल्याचे मंगळवारी दुपारी टिपलेले छायाचित्र.



### वर्षानुवर्षे सुरू असलेली परंपरा कायम

श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त आमच्यासह विविध मानकरी यांच्या घरात दिवे अखंडपणे लावण्यात येतात. हे दिवे पाच दिवस अखंड ठेवत असतात. या कालावधीत उपवास मंदिरात दररोज नैवेद्य अर्पण केला जातो. घराला विद्युत रोषणाई करण्यात येते. हा मान आमचा परिवाराला मिळाला आहे ही देवाची कृपा आहे. या काळात सर्व तयारी एक महिना अगोदरपासून केली जाते.

**- सुहास दर्गोपाटील,**
यात्रेतील मानकरी



**सिध्देश्वर यात्रेनिमित्त भाविकांसाठी प्रसाद तयार करण्याची सिध्देश्वर मंदीर परिसरात लाडू बांधणीचे काम सुरू आहे. सुमारे तीन टन लाडू करण्यात येणार असून रोज पन्नास किलो लाडू तयार होतात. (छायाचित्रे : केवल तिवारी)**

# सिध्दार्थ हौसींग सोसायटीमधील जखमीचा उपचारावेळी मृत्यू

**खूनाचा प्रयत्नाच्या गुन्ह्यात खूनाचे कलम वाढविले | माजी उपमहापौर प्रमोद गायकवाडसह पाचजण जेलमध्ये**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी -**
सिव्हील हॉस्पीटलच्या पाठीमागे असलेल्या सिध्दार्थ हौसींग सोसायटीमध्ये १ जानेवारी रोजी पहाटे एकच्या सुमारास दोन गटात झालेल्या हाणामारीमध्ये गंभीर जखमी झालेल्या एकाचा उपचारादरम्यान ६ जानेवारी रोजी रात्री खासगी रुग्णालयात मृत्यू झाला. त्यामुळे याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणाच्या गुन्ह्यात खूनाचे कलम वाढविण्यात आले. याप्रकरणी माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड यांच्यासह पाचजण जेलमध्ये आहेत.

वैभव श्रावण वाघे (वय ४३, रा. सिध्दार्थ चौक, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. याबाबत सीमा विलास गायकवाड (वय ३५, रा. ब्लॉक नं. २५, रा. सिध्दार्थ हौसींग सोसायटी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन प्रमोद रामचंद्र गायकवाड, प्रसेनजित उर्फ लकी प्रमोद गायकवाड, हर्षजीत उर्फ विकि प्रमोद गायकवाड, पुतण्या सोन्या उर्फ संजय देवेंद्र गायकवाड, मनोज राजू अंकुश, सनी निकंबे (सर्व रा. सिध्दार्थ हौसींग सोसायटी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यातील प्रमोद गायकवाड, प्रसेनजित गायकवाड, हर्षजीत गायकवाड, मनोज अंकुश, सनी निकंबे हे सध्या जेलमध्ये आहेत तर संजय गायकवाड अद्याप फरार आहे.

सीमा गायकवाड यांचे शेजारी शिरसे व शिवशरण यांच्याशी चांगले संबंध आहेत. तर शिरसे व शिवशरण यांच्याशी प्रमोद गायकवाड यांचे भांडण आहे. १ जानेवारी रोजी पहाटे एकच्या सुमारास शिरसे व शिवशरण यांच्याशी त्यांच्या जुन्या भांडणाचा राग मनात धरून सनी निकंबे याने प्रमोद गायकवाड व इतरांसोबत दारू पिऊन सीमा गायकवाड यांच्या अंगावर येऊन आदित्य दावणे यास प्रमोद गायकवाड यांनी पट्ट्याने मारून भांडणे सुरु केली. त्यावेळी सीमा गायकवाड यांची मुले सुनिल व रितेश गायकवाड यांना तसेच भांडण सोडवायला आलेल्या निलेश शिरसे, सागर शिरसे, वैभव वाघे यांना लोखंडी रॉड, लाकडी दंडुक्याने जबर मारहाण करून त्यांच्या खूनाचा प्रयत्न केला होता. यामध्ये वैभव वाघे हे गंभीर जखमी झाल्याने त्यांस उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांना तात्काळ प्रमोद गायकवाड यांच्यासह पाचजणांना अटक केली. सध्या ते सर्वजण न्यायालयीन कोठडीमध्ये जेलमध्ये आहेत.

दरम्यान, खासगी रुग्णालयात उपचार घेत असणाऱ्या वैभव वाघे यांचा सोमवारी रात्री उपचारावेळी मृत्यू झाला. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य वाढले असून सोमवारी रात्रीच सदर बझार पोलिसांनी सिध्दार्थ हौसींग सोसायटीमध्ये पोलिसांची कुमक वाढवून बंदोबस्त वाढविला होता. मंगळवारी सकाळी मयत वैभव वाघे याच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी शासकीय रुग्णालयात करण्यात आली. यावेळी सिव्हील हॉस्पीटलमध्ये पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात होता. मंगळवारी दुपारी वैभव वाघे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले असून खूनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यात आता खूनाचे कलम वाढविण्यात आले आहे. पोलिस उपनिरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.



# चैतन्य टेक्नो स्कूलच्या विद्यार्थ्यांचे ऑलिम्पियाड परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**
कै. सुरेश सखाराम सुरवसे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये घेण्यात आलेल्या ऑलिम्पियाड परीक्षेत प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवले.

ऑलिम्पियाड ही प्रतिष्ठित लोकप्रिय स्पर्धात्मक परीक्षा आहे, ही परीक्षा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाते. या परीक्षेत प्रशालेतून इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, विज्ञान, गणित तसेच सामान्य ज्ञान अशा विविध विषयातून परीक्षा दिली. परीक्षेची प्रथम फेरी यशस्वीरित्या पार करीत ५१ विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र झालेले आहेत. प्रशालेच्या प्राचार्या डॉ.पी. सौजन्या, शाखा विकास व्यवस्थापक रूपाली चौधरी व सहाय्यक सरव्यवस्थापक आदिनारायण पडाल यांनी प्रशालेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# लाडक्या बहिणीचे अर्ज भरलेल्या अंगणवाडी ताईंच्या कार्याचे होणार चीज

**• जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने सादर केला १ कोटी १५ लाखांचा प्रोत्साहन भत्त्याचा प्रस्ताव**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी**
राज्य शासनाची महत्वकांक्षी ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना लवकरच खुशखबर मिळणार आहे. सोलापूर जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाने ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या प्रोत्साहन भत्यासंबंधी प्रस्ताव सादर केला आहे. सुमारे १ कोटी १५ लाख ११ हजार ४५० रुपये निधी लवकरच विभागाला प्राप्त होणार आहे.



त्यानंतर सदरचा निधी जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या बँक खात्यावर वर्ग केला जाणार आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या प्रयत्नांना कष्टाचे फळ मिळणार आहे. दरम्यान, शहरी भागातील अंगणवाडी क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या सेविका आणि मदतनीस यांना पहिल्या टप्प्यातील प्रोत्साहन भत्ता प्राप्त झाला आहे. तर ग्रामीण भागातील अंगणवाडी क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या सेविका आणि मदतनीस यांना लवकरच हा निधी वितरित केला जाणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित झाल्यानंतर संबंधित योजनेचे अर्ज सादर करण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली होती. सेविका व मदतनीस यांनी आपल्या अंगणवाडी क्षेत्रातील विहित कार्या बरोबरच या योजनेचे कार्य देखील अत्यंत चोखपणे पार पाडले. त्यामुळे राज्य शासनाने अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या कष्टाचे चीज व्हावे, यासाठी प्रोत्साहन भत्ता जाहीर केला.

लाडक्या बहिणी योजनेचा मान्य झालेल्या प्रति अर्जास पन्नास रुपये इतका भत्ता देण्याचे मान्य करून शासन मान्यता काढण्यात आली. निवडणूक आणि तांत्रिक अडचणीमुळे काही काळ प्रोत्साहन भत्ता वितरित करण्यासाठी विलंब झाला. मात्र आता नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर, खात्याचे मंत्री यांनी तात्काळ याबाबत आदेश देऊन प्रस्ताव मागवण्यात आले होते. त्यानुसार सोलापूर जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची संपूर्ण माहिती शासनाकडे पाठवण्यात आली आहे.

### लवकरच प्रोत्साहन भत्त्याचा निधी खात्यावर वर्ग



नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना लवकरच प्रोत्साहन भत्ता प्राप्त होणार आहे. त्यासाठी शासन स्तरावर मागणी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. सुमारे १ कोटी १५ लाख ११ हजार ४५० रुपये निधी लवकरच विभागाला प्राप्त होणार आहे. त्यानंतर संबंधित सेविका व मदतनीस यांच्या खात्यावर निधी वर्ग होईल.

**- प्रसाद मिरकले, महिला व बालकल्याण अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर**

**जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका यांना प्राप्त होणारा प्रोत्साहन भत्त्याची माहिती**

| | |
|---|---|
| अंगणवाडी सेविकांनी भरलेले लाडक्या बहिणीचे एकूण अर्ज संख्या | २,२३, ८३१ |
| अंगणवाडी सेविकांची एकूण संख्या | ३,२८३ |
| लाडकी बहीण योजनेअंतर्गत मान्य झालेले अर्ज | २२,१०९४ |
| प्रोत्साहन भत्ता निधी मागणी | १,१०,५४, ७०० |

**जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनीस यांना प्राप्त होणारा प्रोत्साहन भत्त्याची माहिती**

| | |
|---|---|
| अंगणवाडी मदतनीस यांनी भरलेले लाडक्या बहिणीचे एकूण अर्ज संख्या | ९,१५० |
| अंगणवाडी मदतनीसांची एकूण संख्या | २०४ |
| लाडकी बहीण योजनेअंतर्गत मान्य झालेले अर्ज | ९१३५ |
| प्रोत्साहन भत्ता निधी मागणी | ४,५६, ७५० |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९९७

**हरिहरां भेद । नाहीं करुं नये वाद ।।**
**उजवें वाम भाग । तुका म्हणे एकचि अंग ।।**

सर्व संत-महात्म्यांनी सर्व शक्तीमान असा एकच ईश्वर असल्याचे सांगीतले आहे. तरीपण लोक भगवंतामध्ये एकरुपता पाहात नाहीत. मानवा-मानवामध्ये भेद पाहणाऱ्या माणसाला भगवंताची एकरुपता मान्य होणे तसे कठीण आहे. भेद पाहण्याची मूळ वृत्ती काढून टाकण्याचा संतांनी प्रयत्न केला असला तरीही भेदाशिवाय माणसाचे पाऊल उचलले जात नाही. आपला-परका, तुझा-माझा, लहान-मोठा, गरीब-श्रीमंत अशा विविध प्रकारचे भेद मानण्याची मानवाला सवय जडली आहे. या वृत्तीने इतकी उचल खाल्ली आहे की, तो भगवंतातही भेद करीत आहे. हा आमचा ईश्वर, तो तुमचा ईश्वर, ही आमची देवता, ती त्यांची देवता असे माणूस म्हणतो. प्रत्यक्षात भगवंत एकच आहे. त्याच्यात भेद पाहणे चुकीचे आहे. हरी आणि हर हे एकच असल्याने त्यांच्यात भेद पाहू नये. भगवंतात भेद पाहून तो भेद मान्य करण्यासाठी किंवा भेद पटवून दाखविण्यासाठी वाद करण्याची गरज नाही. कारण सर्वव्यापी असा एकच ईश्वर आहे. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**हरिहरां भेद । नाहीं करुं नये वाद ।।**
**उजवें वाम भाग । तुका म्हणे एकचि अंग ।।**

समाजात जे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याचे प्रमुख कारण म्हणजे भेद पाहण्याची मानवी वृत्ती होय. असे एकही क्षेत्र पहायला मिळत नाही की जेथे माणूस भेद करीत नाही. व्यावहारिक, सामाजिक, राजकीय क्षेत्र तर सोडाच पण अध्यात्मिक क्षेत्रातही भेदाने आपली जागा पक्की केली आहे. हरीला मानणारा भक्त महादेवाला मानत नाही. साईला मानणारा समर्थांना नाकारतो. श्रीकृष्णांवर श्रध्दा जोपासणारा श्रीरामाला नांव ठेवतो. अर्थात भगवंतांच्या विविध रुपात एकता न पाहता विविधता पाहतो. त्याला जे रुप आवडेल त्याव्यतिरिक्त इतर रुपांना तो भिन्न मानतो. साखर जरी वेगवेगळ्या कणांनी दिसत असली तरी मूळात तिची गोडी एकच किंवा सारखीच असते. त्याप्रमाणे भगवंत कणा-कणांनी किंवा विविध रुपांनी वेगवेगळा दिसत असला तरीही तो मूळात एकच आहे. शरीराचे डावे-उजवे भाग म्हणायला वेगळे आहेत. प्रत्यक्षात ते एकाच शरीराचे अवयव किंवा भाग असल्याने त्यांना वेगळे समजणे चुकीचे असते. भगवंतात विविधता किंवा वेगळेपण पाहण्याची मानवीवृत्ती माणसातही भेद पाहण्याकडे धांव घेते. ईश्वर हा सर्व प्राणीमात्रांत भरुन उरल्याने त्याच्यात भेद पाहिला गेला तर आपोआप जीवमात्रातही भेद पाहिला जातो. भगवंताप्रमाणे लोकांनी संतांतही भेद पाहिला आहे. म्हणून ईश्वराची व संतांचीही वाटणी केली जात आहे. कशाचीही वाटणी करणाऱ्या लोकांना तेहतीस कोटी देवही पुरेणासे झाले आहेत. दररोज एका नवीन देव-देवतेंची निर्मिती माणूस करीत आहे. भेद, वाटणी या विषारी शब्दांनी मानवाचे जीवन विषमय करुन टाकले आहे. या विषामध्ये माणूस स्वतःही तडफडत आहे आणि इतरांनाही तडफडण्यास भाग पाडत आहे. ईश्वराच्या नांवावर अनेक दंगे, भांडणे-तंटे घडत असल्याचे आपण पाहातो. यावरुनच आपण किती व कसा आणि कशा-कशात भेद करतो हे लक्षात येऊ शकते. आपल्या देशाला अभेद्य दृष्टीची गरज आहे, हे लक्षात असू द्यावे. आपले सकारात्मक वागणे व समत्व दृष्टी आपल्या जीवनात आनंदलहरींची निर्मिती व वाढ करु शकते.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार**
**दि. ८ जानेवारी २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - पौष**
**शु. नवमी - (१४.२६)**
**ऋतु - शिशीर**
**नक्षत्र - अश्विनी (१६.२९)**
**योग - सिध्द (२०.२२)**
**करण - तैतिल (२५.२४)**

**दिनविशेष -**
**चांगला दिवस**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** आपले प्रत्येक प्रश्न सध्या महत्त्वाचे आहेत. नोकरी-व्यवसायात सध्या चांगली गती असल्याने कोणताही प्रश्न रेंगाळत राहणे आजतरी परवडणार नाही.

**वृषभ :** आपली नेमकी कोणा-कोणाची गाठ पडते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. घरातील एखादी व्यक्ती बाहेर जाऊन लवकर न आल्यामुळे जीवाला घोर लागणे शक्य.

**मिथुन :** कितीही कमावले तरी थोडे सबुरीनेच खाणारे आपण आयुष्यही उपभोगण्यासाठी असते हे बऱ्याचदा विसरल्यासारखे असते.

**कर्क :** वैवाहिक जोडीदाराची आपणास मिळणारी साथ आज एखाद्या मोठ्या कामात यश देणारे ठरू शकते.

**सिंह :** आज नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी आपण अतिशय कार्यमग्न राहणार आहात नव्हे तसे राहणे फायद्याचे ठरणार आहे.

**कन्या :** आपणास आपल्या अभ्यासाचा, विचाराचा, चिंतनाचा आणि बौद्धिक कौशल्याचा उपयोग करून घेता येणार आहे.

**तूळ :** आजचा दिवस आपणासाठी आरोग्याकडे लक्ष द्यायला लावणारा ठरू शकतो. खाण्यापिण्यावर थोडेसे निर्बंध ठेवा. नोकरी-व्यवसायात आगामी काळाचा विचार करण्यासाठी बरेच पर्याय समोर असणार आहेत.

**वृश्चिक :** आर्थिकदृष्ट्या आज आपण कितीही मोठे-लहान अवश्य घेऊ शकता. बऱ्याच महत्त्वाच्या निर्णयांमध्ये आजचा दिवस संस्मरणीय ठरणार आहे.

**धनू :** विचारातला भडकपणा मुळातूनच टाळायचा आहे. आरोग्याकडे लक्ष द्यायचे आहे. आज होणाऱ्या व्यवहारात उगाच कोणाचा खोटा आळ येणार नाही असे पाहा.

**मकर :** जे काही असेल ते अतिशय चांगले असणे हा आपला स्थायी भाव आहे.

**कुंभ :** आज खाण्यापिण्याकडे थोडेसे बारीक लक्ष असणे हिताचे असणार आहे. नवीन मित्रांसमवेत चुकून काही खाल आणि नसते उद्योग पाठीशी लागतील.

**मीन :** अपेक्षित आणि आवश्यक असे प्रवास काहीजणांच्या बाबतीत शक्य आहे. नोकरी-व्यवसायातील एखादा महत्त्वाचा निर्णय आरामात घेऊ शकाल.

# कुलगुरू प्रा. महानवर यांनी घेतली राज्यपालांची भेट

## दीक्षांत समारंभाचे दिले निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

महाराष्ट्राचे राज्यपाल तथा सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती महामहीम सी. पी. राधाकृष्णन यांची सोमवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी मुंबईत भेट घेतली.

कुलगुरू प्रा. महानवर यांनी राजभवनला भेट देऊन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना १० जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या विद्यापीठाच्या २० व्या दीक्षांत समारंभाची निमंत्रण पत्रिका दिली. त्याचबरोबर २०२५ नूतन वर्षाची विद्यापीठाची दैनंदिनी डायरी देखील भेट दिली.


त्याचबरोबर राज्यपाल श्री सी. पी. राधाकृष्णन यांनी विद्यापीठाच्या विकासाची माहिती कुलगुरू प्रा. महानवर यांच्याकडून जाणून घेतली. कुलगुरू प्रा. महानवर यांनीही विद्यापीठात सुरु असलेल्या विविध उपक्रम आणि प्रकल्पांची माहिती राज्यपाल महोदयांना दिली.



**मुंबईः राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना सोमवारी दीक्षांत समारंभाचे निमंत्रण देताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर.**

# संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (१४)
### स्वामी विवेकानंद यांना जीवनांजली

परमपूज्य डॉक्टर व स्वामी विवेकानंद या दोघांचीही आराध्य देवता भारत माता आहे. स्वामीजींनी मृत्यूच्या पंधरा वर्षे आधी रामकृष्ण मठाची स्थापना केली. डॉक्टरांनी आपल्या मृत्यूच्या पंधरा वर्षे आधी संघाची स्थापना केली. डॉक्टरजी व स्वामीजी हे दोघेही हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व या सत्याचे शोधक होते. दोघांचेही ध्येय राष्ट्रकल्याण हेच होते. त्यासाठी स्वामीजी म्हणत गर्वसे कहो मै हिंदू हूँ। डॉक्टरजी म्हणत माझी भारतमाता हिंदू राष्ट्र आहे. दोघेही त्यासाठी सतत प्रयासरत होते. सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी स्वामीजी धर्मवेत्ते; आचार्य; समाजसेवक, संतमहंत यांना भेटत होते. तर डॉक्टरजी लोकमान्य टिळक, सावरकर, सुभाषचंद्र बोस; तर कधी योगी अरविंद यांना भेटत होते. स्वामीजींचे संन्यासी दरिद्री नारायणाची सेवा करणारे भगवा वेषधारी आहेत. डॉक्टरजींचे संन्यासी म्हणजेच प्रचारक भारत मातेची सेवा करणारे शुभ्रवेषधारी आहेत. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी म्हणतात परमपूज्य डॉक्टर हेडगेवार यांनी संघकार्यार्थ आपल्या जीवनाची आहुती देऊन स्वामी विवेकानंदांना एक अनोखी जीवनांजली अर्पण केली आहे.

**क्रमशः**



# डॉ. मेतन फाऊंडेशनतर्फे शिलाई मशीन वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

डॉ. मेतन फाऊंडेशनकडून ११ गरजू महिलांना नवीन शिलाई मशीनचे वाटप आ. सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक डॉ. व्यंकटेश मेतन यांनी केले. यावेळी ते म्हणाले, सोलापुरातील गरीब महिलांनी शिलाई काम करून स्वतःच्या कुटुंबाचे उदरनिर्वाहासाठी त्यांना नवीन शिलाई मशीनचे वाटप करण्यात येते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आ. सुभाष देशमुख यांनी समाजातील महिलांना सबलीकरण व सशक्तीकरण असा समाजोपयोगी उपक्रम राबवित असून त्यांना व्यवसाय उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. मेतन फाऊंडेशनचे कौतुक केले. डॉ. मेतन फाऊंडेशनकडून एकूण १०० गरजू महिलांना शिलाई मशीन देण्याचा मानस असून आजपर्यंत ७६ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले आहे. या नवीन शिलाई मशीनच्या किमतीच्या ५० टक्के रक्कम गरजू महिलांनी भरली असून, ५० टक्के रक्कम हि मदत म्हणून डॉ. मेतन फौंडेशनकडून देण्यात आली आहे. सोमेश्वर लवंगे यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी अभय दिवाणजी, प्रल्हाद कांबळे, शशिकांत सुतार, गिरीश कोल्हापुरे, महेश बनसोडे, सिद्धाराम सक्करगी राघवेंद्र मेतन, संतोष पाटील, राधिका दुधगुंडी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी डॉ. मेतन फाऊंडेशनच्या सर्व संचालकांनी परिश्रम घेतले. चिदानंद मुस्तारे यांनी आभार मानले.

# ११ जानेवारीपासून भाकरी बनविण्याची स्पर्धा

## ड्रीम फाउंडेशन व जिजाऊ भाकरी केंद्रातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी -**

ड्रीम फाउंडेशन व जिजाऊ भाकरी केंद्रातर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती व युवा दिनानिमित्त ११ व १२ जानेवारी रोजी सकाळी ११ ते २ यावेळेत राज्यस्तरीय भाकरी बनविण्याची स्पर्धा जुळे सोलापुरातील ड्रीम सभागृहात आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संयोजिका संगीता भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सहभागी होणाऱ्या महिलांना पीठ, गॅस शेगडी, चूल व इतर साहित्य देण्यात येणार आहे. स्पर्धेतील महिलांना दोन तासात सर्वाधिक भाकरी गोल व पातळ बनवणाऱ्या विजेत्यांना प्रथम ११ हजार, द्वितीय ७ हजार, तृतीय ५, चतुर्थ २ व पाचव्या क्रमांकाचे १ हजार रुपये बक्षीस, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच स्पर्धक सहभागी सर्व महिलांचाही सन्मानपत्र व भेटवस्तू तसेच स्पर्धक सहभागी सर्व महिलांचाही सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन विशेष सत्कार करण्यात येईल. बनविलेल्या भाकरी भारत विकास संगमतर्फे कलबुरगी येथे आयोजित भारतीय संस्कृती उत्सवात मोफत यासंदर्भात माहितीसाठी ९८९०९४८३८८ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा. या पत्रकार परिषदेस वैशाली गुंड, राजश्री लोकापुरे, मीनाक्षी बागलकोटी, निर्मला लातुरे, काशीनाथ भतगुणकी आदी उपस्थित होते.

# राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनचे पुरस्कार जाहीर

## रविवारी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

**सोलापूर, दि. ७ जानेवारी -**

राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्ररत्न प्रज्ञावंत पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. १२ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालय सभागृहात होणार आहे, अशी माहिती अध्यक्ष प्रांजली मोहीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सीबीआयचे विशेष सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून एमआयटी स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. अजित कुलकर्णी, दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने, यश डेव्हलपरचे सुयश खानापुरे, स्नेहस्वप्न डेव्हलपर्सचे मनोहर नारायणकर, महालक्ष्मी ऑक्सिजनचे प्रमोद तम्मानवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सन्मानचिन्ह, शाल, फेटा व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. राजेश फडकुले, प्रेमचंद मेने, सुहास भोसले, राजेश केकडे, ज्योती मेने, अपर्णा पाठक, दीपक करकी आदी उपस्थित होते.












### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

विद्यारत्न पुरस्कार- डॉ. अजय पोन्नम, धन्वंतरी रत्न पुरस्कार- डॉ. शैलेश पाटील, पर्यावरण रत्न पुरस्कार- डॉ. यशवंत पेठकर, संगीत रत्न पुरस्कार - समीर रणदिवे, क्रीडा रत्न पुरस्कार- राजू अनंतकर, उद्योग रत्न पुरस्कार-अश्विनी झांबरे, कायदेरत्न पुरस्कार - ॲड. दत्तूसिंग पवार, रक्त संजीवन रत्न पुरस्कार-अशोक नावरे , सिने रत्न पुरस्कार- सचिन जगताप, युवा रत्न पुरस्कार-संतोष धाकपाडे आदींना गौरवण्यात येणार आहे.




# 'स्थापत्य २०२५' च्या प्रदर्शनाच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सतर्फे फेब्रुवारी महिन्यात सोलापुरात होणाऱ्या 'स्थापत्य २०२५' बांधकाम व अंतर्गत सजावट प्रदर्शनाच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. सोलापूर महानगरपालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांच्या हस्ते असोसिएशनच्या दत्त चौक येथील स्थापत्य भवन या कार्यालयात हा कार्यक्रम झाला. स्थापत्य २०२५चे प्रायोजकत्व मेटारोल ईस्पात प्राइवेट लिमिटेड, जालना यांनी घेतले आहे. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सच्या नवीन दिनदर्शिकेचे प्रकाशनही याप्रसंगी करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सोलापूर महानगरपालिकेचे सार्वजनीक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, असोसिएशनचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे, उपाध्यक्ष इंजि बी. एम. जाधव, सचिव इंजि. मनोहर लोमटे, खजिनदार इंजि. संतोषकुमार बायस उपस्थित होते. याप्रसंगी सार्वजनिक आरोग्य अभियंता चौबे यांच्यासोबत असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सच्या पदाधिकारी आणि सदस्यांचे चर्चासत्राचे आयोजन केले होते. असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत मोरे यांनी प्रास्ताविक केले. सहसचिव इंजि. जवाहर उपासे यांनी सूत्रसंचालन तर सचिव इंजि. मनोहर लोमटे यांनी आभार मानले. याप्रसंगी महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणचे वरिष्ठ अभियंता श्री हरिष, सोलापूर महानगरपालिकेच्या पीएचई विभागाचे निवृत्त उपअभियंता उस्तुरगी उपस्थित होते.

### नवजात बालकांच्या आरोग्यासाठी रविवारी चॅरिटी फॅशन शो

**सोलापूर, दि. ७ जानेवारी -**

नवजात बालकांच्या आरोग्यासाठी कार्य करणाऱ्या आराध्या फाउंडेशनच्या वतीने सोलापूर फॅशन आयकॉन सीझन वन चॅरीटी फॅशन शोचे आयोजन रविवार दि. १२ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता करण्यात आले आहे, अशी माहिती आराध्या फाउंडेशनचे संचालक राजेश येलदी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे फाउंडेशन राज्य शासनाच्या आरोग्य खात्याच्या समवेत कमी कालावधीत जन्मलेली कमी वजनाची बाळे, जन्मतः कमी वजनाच्या बाळाची योग्य वाढीसाठीचे उपाय यासाठी कार्य करते. हा चॅरीटी फॅशन शो अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील पद्मावती कन्वेन्शन हॉलमध्ये होणार आहे. या शोसाठी अभिनेता बीगबॉस फेम वैभव चव्हाण व अभिनेत्री इरिना रुडाकोवा याची उपस्थिती राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस आयुक्त एम राजकुमार, महापालिका आयुक्त शितल तेली-उगले उपस्थित राहणार आहेत. या शोमध्ये सह प्रायोजक म्हणून पद्मावती कन्व्हेन्शन, चंदुकाका सराफ, जीएमआर किड्स शॉपिंग मॉल, चंद्रोदय विणकाम गिरणी आदी संस्था सहभागी आहेत. या शो मध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास अनेक बक्षीसे दिली जाणार आहेत. यामध्ये ३ ते ८० वर्षे वयोगटातील सर्व स्पर्धकांना शोमध्ये सहभागी होता येणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी (मो.९१७५७५६८४५/९१७५७५००८८) या क्रमांकावर संपर्क साधावा. या शोमध्ये अधिकाधिक लहान मुले, तरुण, तरुणी व प्रौढ वयोगटातील नागरिक व महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन रामदास येलदी यांनी केले आहे.

# विमानसेवा, आयटी पार्कच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्नशील : आ. कोठे

## श्रमिक पत्रकार संघ, स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे पत्रकारांचा सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

सोलापुरातील विमानसेवा व आयटी पार्कचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असे प्रतिपादन आ. देवेंद्र कोठे यांनी केले.

पत्रकार दिनानिमित्त सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार प्राप्त पत्रकारांचा सन्मान सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके, दैनिक सुराज्यचे संपादक राकेश टोळ्ये, दै. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष नारायण कारंजकर, प्रशांत माने, प्रशांत जोशी, वैभव गाढवे, रवींद्र देशमुख, तरुण भारतचे वृत्तसंपादक अजित संगवे, संजय येऊलकर, तात्या पवार, सावाचे अध्यक्ष संतोष उदगिरी, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सचिव सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ मुद्रित शोधक रामचंद्र हंचाटे यांचा सन्मान करण्यात आला. श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी प्रास्ताविक केले. सरचिटणीस सागर सुरवसे यांनी स्वागत केले. यावेळी मीडिया चषक स्पर्धेतील विजेता डिजिटल मीडिया संघ आणि उपविजेता सावा संघाचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी तर आभार प्रदर्शन माजी उपाध्यक्ष विजय गायकवाड यांनी केले.




### सचिन राठोड यांचा केला सन्मान

धोंडोपंत देशपांडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पुण्यश्लोक आहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभाग परीक्षेत प्रथम आलेल्या सचिन राठोड यांना स्मृतिचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

### दुहेरी जलवाहिनीसाठी ९० कोटींचा निधी मिळणार

उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या उर्वरित कामाच्या पूर्ततेसाठी लागणारा ९० कोटी रूपयांचा निधी देण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच देतील. पत्रकारांच्या गृह निर्माण प्रकल्पाबाबत काही अडचणी असल्यास त्या सोडवण्यात येतील. सर्व प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याची ग्वाही यावेळी आ. कोठे यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त



### चन्नय्या स्वामी मठाचे वॉल कंपाऊंड भूमिपूजन

**वळसंग, दि. ७ जानेवारी-**

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे माननीय आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या निधीतून श्री चन्नय्या स्वामी मठाचे सुरक्षित भिंत (वॉल कंपाऊंड) मंजूर झाली असून भूमिपूजन वळसंग चे सुपुत्र विजयपूरचे उद्योजक सुरेश केशट्टी व युवा उद्योजक महेश बिराजदार यांच्या हस्ते संपन्न झाला. प्रथमतः श्री चन्नय्या स्वामी मठातील जिवंत समाधी मूर्तीला मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात आले. त्यानंतर पुजारी वेदमूर्ती नागय्या स्वामी यांनी वैदिक पद्धतीने भूमिपूजनाचा कार्यक्रम केले. यावेळी श्री चन्नबसवेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मल्लिनाथ बाबानगरे, उपाध्यक्ष अनिल शहापुरे, सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे, माजी सरपंच श्रीशैल दुधगी, माजी उपसरपंच आरिफ कुरेशी, ग्रामपंचायत सदस्य श्रीशैल भूसणगी, शालम अमलीचुंगे, विनोद सुरपुरे, मलकप्पा कोडले, श्रावण फुटके, अनिल बर्वे, सिद्धाराम वाघमारे,अण्णाप्पा चौगुले, वीरेश बागलकोटी, विश्वनाथ मोटगी, रमेश दुधगी, मनोज थळंगे, पत्रकार कळय्या स्वामी, चंद्रशेखर केशट्टी, सचिन तडलगी, शिवबसप्पा कलशेट्टी, श्रीशैल भैरामडगी, बसवराज किणगी, राजकुमार केशट्टी, श्रीशैल स्वामी, सुनील भैरामडगी देवस्थान ट्रस्टचे सर्व सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक शिवानंद घोडके तर आभार शिक्षक सिद्धाराम भैरामडगी यांनी केले.



### करकंब विभाग पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी लक्ष्मण शिंदे

**करकंब, दि.७ जानेवारी-**

६ जानेवारी आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून करकंब येथे करकंब विभाग पत्रकार संघाच्या सर्व सदस्यांची बैठक पार पडली.यावेळी बैठकीत करकंब विभाग पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दै.नवमित्र लक्ष्मण शिंदे.कार्याध्यक्ष दै. लोकमत शहाजी काळे,उपाध्यक्ष आयपीएन न्युज ऋषिकेश वाघमारे, सचिव बाळासाहेब काशीद, खजिनदार सचिन शिंदे, सल्लागारपदी एल. एम.जाधव यांची निवड एकमताने निवड करण्यात आली. यावेळी सुनील कोरके, अण्णासाहेब पवार, भीमा व्यवहारे, गोपीनाथ देशमुख, नितीन खाडे,मनोज पवार,विजय नलवडे, सिद्धेश्वर वाघम रे,अतुल अभंगराव, सूर्यकांत बनकर, राजेंद्र करपे, सागर थिटे, गणेश माने, धीरज शिंदे, रोहन नरसाळे, विश्वनाथ केमकर आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.



### नळदुर्ग-लोहगाव रोड कधी पूर्ण होणार; लोहगाव ग्रामस्थांची मागणी

**अणदूर, दि. ७ जानेवारी-**

नळदुर्ग ते लोहगाव रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे हे वाहनचालकांना कळेना झाले असून दररोज अनेक छोटे मोठे अपघात व दररोज मोटार सायकल वर प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना पाठदुखी, कंबर दुखीचे आजार जडले आहेत हा रस्ता कधी दुरुस्त होणार असा संतप्त सवाल लोहगाव ग्रामस्थांनी प्रशासनास विचारला असून रस्ता लवकरात लवकर पूर्ण नाही झाल्यास लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.अनेक महत्वाच्या गावाशी नळदुर्ग या शहराला जोडणारा हा महत्वाचा रोड नव्याने होणार असून खडी टाकून आज १ वर्ष झाले पण याला मुहूर्त लागत नाही याच रोड वर या परिसरातील म हत्वपूर्ण रामतीर्थ देवस्थान असून हजारो भक्त भाविक येथे दर्शनासाठी याच रोड वरून येतात तरीही प्रशासन गप्पच आहे रामतीर्थ तांड्याच्या पुढे हा रस्ता संपूर्ण पिचला असून त्याचे मजबुतीकरण गेल्या सहा म हिन्यांपासून पूर्ण होत नाही रस्ता खंदल्यामुळे वाहनधारकांना तारेवरची कसरत करीत जावे लागते. यामुळे अनेक छोटे मोठे अपघात या रोडवर दररोज होत आहेत, याची ना दखल कोणीही घेत नसल्याने लोहगावचे ग्रामस्थ संतापले आहेत. प्रशासनाने त्वरित हा रोड नव्याने निर्माण करावा तसेच चांगल्या गुत्तेदार कडून हे काम करून घ्यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे लोहगाव ग्रामस्थांनी सांगितले आहे.

# अक्कलकोट येथे रेशन कार्डसाठी सर्वसामान्य नागरिकांचे हेलपाटे

## तहसील पुरवठा विभागाचा सावळा गोंधळ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जानेवारी -**

शासनाने सार्वजनिक अन्न धान्य वितरण व्यवस्था मधील भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी अनेक आमुलाग्र बदल केले यामध्ये काही प्रमाणात यश आले पण रेशन कार्ड मिळविण्यासाठीच नागरिकाना अनेक हेलपाटे मारून तहसिल कार्यालयाचे उंबरटे झिजवावे लागत आहे . ऑन लाईन अर्ज भरून चलन भरूनही भारतात राहणाऱ्या नागरिकानां डिजीटल रेशन कार्ड १२ अंकी क्रमांक मिळविण्यासाठी नागरिकांची मोठी पिळवणुक होत आहे . नागरिकातुन याबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे याबद्दल लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यां नी याविरोधात आंदोलन करण्याचा इशारा व्यक्त केला आहे . अक्कलकोट शहर व तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना रेशन कार्डसाठी तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. रेशन कार्ड वेळेवर मिळत नसल्याने तहसील पुरवठा विभागाचा सावळा गोंधळ सुरू असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे. अक्कलकोट शहर व तालुक्यातील नागरिक हे रेशन कार्ड शिधापत्रिकेसाठी सीएससी



सेंटर व महा-ई-सेवा केंद्र येथून ऑनलाईन अर्ज करत असतात. पण नागरिक ऑनलाईन अर्ज करूनही त्यांना दोन-तीन महिने रेशन कार्ड मिळण्यास लागत आहेत. विविध शासकीय कामांसाठी , शैक्षणिक कामांसाठी रेशन कार्डची गरज नागरिकांना असते. गोरगरीब , सर्वसामान्य नागरिकांना रेशनधान्य मिळविण्यासाठी रेशनकार्डची गरज असते. महा-ई-सेवा केंद्र अथवा सीएससी सेंटर मधून रेशन कार्डसाठी अर्ज भरून चलन भरूनही वेळेवर रेशनकार्ड मि ळत नसल्याने नागरिकांना रेशन कार्डसाठी तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. ग्राम ीण भागातील नागरिकांना , निराधार महिलांना रेशन कार्ड वेळेवर मिळत नसल्याने मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. याबाबत सीएससी सेंटर चालकांना विचारणा केली असता शासनाचे सर्वर बंद असल्याने रेशनकार्ड मिळण्यासाठी वेळ लागत आहे असे सांगितले जाते. ऑनलाइन रेशन कार्डला मंजुरी देण्याचे काम तहसील कार्यालय पुरवठा विभागातून केले जाते. पण इथेही चिरीमिरीसाठी विलंब केला जात असल्याची चर्चा नागरिकांत सुरू आहे. रेशन कार्ड वेळेवर मिळत नसल्याने सर्व सेवा केंद्रांवर अथवा महा-ई-सेवा केंद्रांवर येऊन नागरिक हे विचारणा करत आहेत. यामुळे काही वेळा वादाचे प्रसंग उद्भवत असल्याच्या घटना घडत आहेत. अक्कलकोट तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाने वेळेवर रेशन कार्ड वितरित करण्याची मागणी रेशन कार्ड धारकातून केली जात आहे.



## मायबोली सांस्कृतिक मंडळाचा परिवार मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जानेवारी-**

मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने नुकतेच येथे परिवार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यामध्ये मायबोली परिवारातील सदस्यांचे विविध गुणदर्शन आणि परिवारातील गुणवंतांचा सत्कार असा भरगच्च कार्यक्रम होता.

ज्ञानेश्वर माऊली आणि मायबोलीचे संस्थापक स्वर्गीय विजूभाई माढेकर यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. मंडळाचे सचिव डॉ.प्रशांत मोहिरे यांनी स्वागतपर भाषण केले. अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी प्रास्ताविकातून मायबोलीच्या पुढच्या कार्यक्रमांची रुपरेषा सांगितली. त्यानंतर मायबोलीचे देणगीदार डॉ.शिरीष भुमकर आणि ड.शांतीलाल म ्नोत तसेच मायबोलीला मोलाचे सहकार्य करणाऱ्या निवडक व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

त्यानंतर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. मनवा पुजारी (गणेश वंदना) आणि ईशा गद्रे (देवीस्तवन) या चिमुकल्यांपासून सुरु झालेल्या या कार्यक्रमात वर्षा रसाळ (लग जा गले), माणिक कुलकर्णी (एक धागा सुखाचा), स्वाती डोळे (रिमझिम गिरे सावन), अनुराधा देशमुख , दिलीप कल्याणी, अविनाश आणि सुजाता हिंगमिरे, उमा विभुते, चंदा निमकर, शानू वायकर व वंदना कुलकर्णी, सात्विक अंधारे व कृष्णा चिकणे (नृत्य), अर्चना पोळ, डॉ. हेमंत साने, शोभा शेटे, विजया बंग(तू कितनी अच्छी है), प्रशांत माळवदे, सुनील फल्ले, गिरीजा पौळ, बालकिसन जाजू, निलेश घाटे, मधुसूदन चांडक, शुभांगी काळे (रुक जा रात), सूर्यकांत वायकर, ज्ञानेश निर्मळे, वंदना देवणे, दीपक जोशी, संगीता केसकर, गुरुदत्त कुलकर्णी अशा विविध वयोगटातील कलाकारांनी विविध कलाप्रकार सादर केले. याचवेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मायबोली परिवारातील गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. आभार कोषाध्यक्ष व्यंकटेश कुलकर्णी यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. वैशाली मोहिरे आणि पल्लवी माढेकर यांनी केले. लकी ड्रॉ आणि अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष जवाहर माढेकर, अरुण शहा, सुनील आबा पाटील, जितेंद्र माढेकर, अमिता कुलकर्णी, राजेंद्र श्रीश्रीमाळ, निलेश माढेकर आदी संचालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रणाली शेटे, तृप्ती माढेकर, सुमन चंद्रशेखर, प्रमोदिनी कोठारी, दिनकर सापनाईकर या कार्यकारिणी सदस्यांनी परिश्रम घेतले.



## बी.पी. सुलाखे कॉलेजमधील विद्यार्थीनींचे मैदानी स्पर्धेत यश

**बार्शी, दि. ७ जानेवारी-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त भव्य मैदानी स्पर्धा आयोजन लोकसेवा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आगळगाव येथे दि. ६ डिसेंबर रोजी करण्यात आले होते.

स्पर्धेमध्ये बी.पी.सुलाखे कॉलेजमधील साक्षी काळे इयत्ता बारावी, आकांक्षा गडसिंग, दिशा मिटू भाकरे यांनी २०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे, गोळा फेक १०० मीटर धावणे, लांब उडी इत्यादी खेळ बाबीमध्ये सहभाग नोंदवला होता. साक्षी काळे २०० मीटर धावणे या खेळ बाबीमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. संस्थेतर्फे प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय करंडे यांनी अभिनंदन केले. मार्गदर्शक व महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के व प्रा. रुपाली शिंदे उपस्थित होते.

# मुलींच्या शिक्षणासाठी ८५ हजारांची आर्थिक मदत

## सेवानिवृत्त शिक्षिका मिनाक्षी क्षीरसागर यांचा कौतुकास्पद उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ७ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा नवीन टाकळी येथे पंधरा वर्षे सेवा बजावलेल्या सेवानिवृत्त शिक्षिका मीनाक्षी क्षिरसागर संकल्पनेतून सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून जि.प.प्रा. मराठी शाळा टाकळी नवा येथील पहिली ते सातवीच्या ८५ विद्यार्थिनींना प्रत्येकी एक हजार रुपये प्रमाणे ८५ हजार रुपयांचे मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत देण्यात आले.

क्षिरसागर यांना सेवानिवृत्तीनंतर टाकळी जिल्हा परिषदेच्या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलवण्यात आले होते. त्यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी टाकळीच्या विद्यार्थिनींना प्रत्येकी १००० रुपयाची आर्थिक मदत करण्याचे जाहीर केले होते. त्याची पूर्तता म्हणून आज सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी श्रीमती मिनाक्षी क्षिरसागर आणि त्यांचे कुटुंबीय एकत्रित येत इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थिनींना प्रत्येकी एक हजार



रुपये प्रमाणे रोख रक्कम सर्व विद्यार्थिनींना देण्यात आले. यावेळी बोलताना श्रीमती मिनाक्षी क्षिरसागर (गिड्डे) यांनी जवळपास मी टाकळी येथे पंधरा वर्षे सेवा केलेली असून माझ्या सेवेमध्ये टाकळीकरांचा खूप मोठा वाटा असून टाकळीकरांच्या प्रेमातून उतराई होण्यासाठी आणि विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी म्हणून मी हा निर्णय घेतला होता.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य चंद्रशेखर गायगवळी यांनी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा इतिहास सांगत छत्रपती शाहू राजांनी बाबासाहेबांना विलायतीच्या शिक्षणासाठी मदत केली होती. ती मदत म्हणजे बाबासाहेबांना शिक्षणासाठीची प्रेरणा होती. तीच प्रेरणा आज टाकळीकर विद्यार्थिनींना क्षिरसागर यांनी दिलेल्या मदतीतून मिळणार आहे. याप्रसंगी क्षिरसागर यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका हेमलता नाईकनवरे, नीलम महाजन, शीला बसरकोड, उपसरपंच सिद्धाराम घोडके, सदस्य चंद्रशेखर गायगवळी, विक्रमसिंह गिड्डे, विजयश्री गिड्डे, संजीवनी शितोळे, मृणाल शितोळे अंबादास पाटील, धानप्पा हिरेमठ, संजय गौडगावकर, चंद्रकांत दिवटे, नरसप्पा इटकर उपस्थित होते.

# वैराग येथे ठिकठिकाणी पत्रकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ जानेवारी-**

दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा ६ जानेवारी जन्म दिन हा पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने वैराग शहरातील विविध सामाजिक संस्था, शासकीय कार्यालये, नगरपंचायत तसेच अन्य मान्यवर मंडळीकडून पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

वैराग येथे ओम महा ई-सेवा केंद्र येथे जेष्ठ पत्रकार धनाजी शिंदे व माजी सैनिक जगन्नाथ आदमाने यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आण्णा ग्रुपचे संस्थापक नगरसेवक वैजीनाथ आदमाने, महेश पन्हाळे, सतीश करंडे, आण्णा गाटे यांच्याकडून पत्रकारांचा गुलाब पुष्प, पेन, पेढा भरवून गौरव करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज



चौकात वंचित बहुजन आघाडीचे बाबा शेख यांनीही पुष्पगुच्छ पेन देऊन स्वागत केले. वैराग नगरपंचायतीच्या वतीने सर्व पत्रकारांचा उपनगराध्यक्ष निरंजन भुमकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला यावेळी नगरसेवक विजय लांडगे, सतीश सुरवसे, संगमेश्वर भडोळे, नाना ढोले, नगरपंचायतीचे कर्मचारी किरण वाघमारे, सचिन पानबुडे, विलास मस्के, सुदाम खेंडाड, रफिक शेख उपस्थित होते. हॉटेल शिवरत्न यांच्या वतीने रामचंद्र पाटील यांनी सर्व पत्रकार बांधवांना सन्मानित केले इर्लेवाडी ग्राम पंचायतीचे उपसरपंच पंकज सरकाळे यांच्या हस्ते पत्रकाराचा सन्मान पेन गुलाब व पेढा भरवून केला यावेळी ग्रामसेवक किरण वाघमारे, ग्रामसेवक मानसिंगराव जाधव, दत्तात्रय मेरड माजी आनंद देवकाते, विठ्ठल कृषी केंद्राचे मालक विजय चव्हाण, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनिल चव्हाण उपस्थीत होते. वैराग पोलिस ठाणे येथे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या हस्ते पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतापसिंग जाधव, किसन कोलते उपस्थित होते. अर्णव शैक्षणिक संकुलाच्या वतीने प्राचार्य रविंद्र कापसे, मुख्याध्यापिका अर्चना डिसले सिने अभिनेते शंतनू मोघे, शिक्षक आ. जयंत आसगावकर, माजी सभापती अनिल डिसले यांच्या हस्ते शाल, पेन, डायरी, गुलाब देऊन सन्मानीत करण्यात आले. बलभिम लोखंडे, रामदास पवार भागवत वाघ, काशीनाथ क्षीरसागर, कालीदास देवकते, राहुल दळवी, आण्णासो कुरूलकर, सुजित काकडे, किरण आवारे, दादा डुरे, सतीश बुरगुटे, सुहास ढेकणे, राहुल भालशंकर, मुजोमिल कौठाळकर, संतोष राजगुरू, आजिज शेख या पत्रकार बांधवाचा सत्कार सन्मान गौरव करण्यात आला. यावेळी सूरज क्रिडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष सूरज डिसले, दराडे, सागर डिसले, स्वप्नील डिसले उपस्थित होते.

## सिद्धापूर फेस्टिवलनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**सोलापूर, दि. ७ जानेवारी-**

मंगळवेढा तालुक्यातील सिद्धापूर येथील राम गोंडा बापूराया चौगुले साचकर यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त रामगोंडा बापूराया चौगुले बहुउद्देशीय संस्था सिद्धापूर व आर.बी.सी. इंग्लिश मेडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज तांडोर यांच्या संकल्पनेतून सिद्धापूर फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती फेस्टिवलचे संयोजक गजानन पाटील यांनी दिली. फेस्टिवलचा प्रारंभ मंगळवार दि. ७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गंगाधर काकणकी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. त्यानंतर ९.३० वाजता नियोजित फेस्टिवलचे उद्घाटन होणार आहे. सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर १०.३० वाजता मातृ-पितृ पाद पूजन कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर बाल आनंदी बाजाराचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच स्लो मोटार सायकल स्पर्धा होणार आहे. बुधवार दि. ८ रोजी सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडी व वाचन प्रेरणा प्रभात फेरी तर १० रोजी १० वाजता महिला बचत गट मेळावा, ११ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता विज्ञान प्रदर्शन जनरल नॉलेज स्पर्धा व रांगोळी स्पर्धा, १२ जानेवारी रोजी ९ वाजता फनी गेम्सचे उदघाटन होणार आहे. सोमवार दि. १३ जानेवारी सायंकाळी ६ वाजता वार्षिक स्नेहसंमेलन व पुरस्कार वितरण सोहळा आ.समाधान आवताडे यांच्या हस्ते व माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

# पत्रकारांच्या लेखनीमुळे विकासकामे करण्यासाठी मिळाले बळ : आ. कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जानेवारी-**

पत्रकार बांधवांनी तालुक्यातील विकास कामाला प्राधान्य देत वेळोवेळी विकासकामांच्या बातमीला प्रसिद्धी देत गेल्याने तालुक्यातील विकासकामे मार्गी लागण्यास मदत झाली. तालुक्याच्या विकासासाठी पत्रकाराचे मोठे योगदान असल्याचे गौरवोद्गार आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी काढले.

६ जानेवारी मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट येथील भाजप कार्यालयात तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी हे बोलत होते.



> पत्रकारिता करत असताना पत्रकार हा कुटुंबाकडे दुर्लक्ष करीत समाजासाठी लढत असतात. पत्रकारितेतून उदरनिर्वाह होत नाही तरी पण पत्रकारांनी समाज सेवाव्रत म्हणून अंगिकारले आहे, ही अत्यंत गौरवाची बाब आहे, असे आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी मत व्यक्त केले.

यावेळी तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, भाजपाचे जेष्ठनेते मल्लिनाथ स्वामी, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, चंद्रकांत दसले व तालुक्यातील सर्व दैनिकाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. कल्याणशेट्टी म्हणाले, या पुढील दोन वर्षात सर्व पत्रकार आणि इतर राजकीय नेत्यांनी विकासकाम ांना प्राधान्य दिल्यास अक्कलकोट तालुक्याचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. यावेळी जेष्ठ पत्रकार बाबासाहेब निंबाळकर, पत्रकार मारुती बावडे, आरपीआयचे नेते अविनाश मडिखांबे, आनंद तानवडे आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी तालुक्यातील सर्व दैनिकचे पत्रकारांचा यावेळी यथोचित सन्मान करून गौरव करण्यात आले.

यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद शाखा अक्कलकोटचे अध्यक्ष नंदकुमार जगदाळे, राज्य कार्यकारणी सदस्य प्रशांत भगरे, शिवानंद फुलारी, योगेश कबाडे, अरविंद पाटील, रविकांत धनशेट्टी, चेतन जाधव, सोम शेखर जमशेट्टी, महेश गायकवाड, स्वाम ीराव गायकवाड, दयानंद दणुरे, रमेश भंडारी, सैदप्पा इंगळे, यशवंत पाटील, शिवा याळवार, शिवानंद गोगाव, रियाज सैय्यद, आदित्य अंबुरे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

## नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करा

### अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्यावतीने निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि.७ जानेवारी-**

येत्या १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांत हा सण असून या सणाला संपूर्ण भारतासह महाराष्ट्रात पतंग उडवण्यात येते. पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. नायलॉन मांजामुळे कितीतरी पक्षी याचे शिकार झाले असून मोठ्या प्रमाणात जिवीतहानी ही होते. नायलॉन मांजावर बंदी असतानाही याचा वापर केला जात असून बारामती तालुक्यातील सर्व दुकानदार यांना नायलॉन मांजा विक्रिस सक्त मनाई करावी व नायलॉन मांजाची अवैध विक्री करणा-यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत बारामती तालुका अध्यक्ष संजीव बोराटे, उपाध्यक्ष प्रशांत जगताप, संघटक सतीश खंडाळे, सचिव महेश पवार, सहसचिव युवराज इंदलकर, सदस्य अमोल सोनवणे, बाबासाहेब शिंदे, चेतन मोहिते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### के.बी.एन. आश्रमशाळेत सोलार हायमास्ट दिव्यांचे उद्घाटन

**अक्कलकोट, दि. ७ जानेवारी-**

एखादी आदर्श आश्रमशाळा कशी असावी यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे नागनहळ्ळी येथील आश्रमशाळा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा व शिक्षण मिळावे म्हणून संस्थेचे सचिव जावेद पटेल हे नेहमी झटत आहेत. त्यांच्या प्रयत्नातून नागनहळ्ळीच्या माळरानावर आदर्श आश्रमशाळा उभी आहे. शेकडो विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबत त्यांना छंद जोपासण्यासाठी मदत होत आहे हे कौतुकास्पद आहे, असे उद्‌गार आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. नागनहळ्ळी येथील के.बी.एनआश्रमशाळेत आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सोलार सहा हायमास्ट दिव्यांचे उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य ईस्माईल मुजावर, फत्तेसिंह संस्थेचे सदस्य मोहन चव्हाण,रजाक सय्यद, ननु कोरबु, प्रतिक मेहता, संस्थेचे उपाध्यक्ष जलील पटेल आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशालेचे शिक्षक रूद्राक्ष वैरागकर यांनी स्वागतगीत व गीत सादर केले. सुत्रसंचालन व आभार मनोज जगताप यांनी केले तर प्रास्तविक मोहन गुरव यांनी मानले. यावेळी सचिव जावेद पटेल, आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा संस्थेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



### गणपती फार्मसीमध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**टेंभुर्णी, दि. ७ जानेवारी-**

मौजे अकोले खुर्द तालुका माढा येथील गणपती फार्मसी महाविद्यालयामध्ये भारतातील अग्रगण्य समाज सुधारक शिक्षक आणि कवी सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती साजरी करण्यात आली. त्यांनी महिलांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि अत्याचारित समुदायांच्या, विशेषतः महिला हक्कांसाठी लढा दिला. महाविद्यालयातील शिवांजली मस्के, दिव्या केदार, रुशाली राऊत आणि उत्कर्ष कांबळे या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणांच्या परिदृश्याचा आकार आपल्या भाषणातून व्यक्त केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबासाहेब येडगे, सचिव. डॉ. आर.डी. बेंदगुडे, डॉ. रूपाली बेंदगुडे, डॉ. प्रशांत मिसाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. रुपाली राऊत व प्रियांका खडसरे यांनी कार्य केले.




### बार्शीत साहित्यिक वाचक संवाद मेळावा

**बार्शी, दि. ७ जानेवारी-**

वाचन हा जगण्याचा सुंदर प्रवास मार्ग आहे, वाचण्याची सवय ही व्यसन झाली पाहिजे, असा आशावाद सहायक ग्रंथालय संचालक, मराठवाडा विभाग सुनील हुसे संभाजीनगर यांनी कारी येथील ज्ञानोपासना सार्वजनिक ग्रंथालय यांचे वतीने आयोजित 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत साहित्यिक वाचक संवाद मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केला. कार्यक्रमचे अध्यक्षस्थानी जेष्ठ लेखिका, कवयित्री प्रा. प्रमिला देशमुख या होत्या. पुढे बोलताना हुसे म्हणाले की, आज महाराष्ट्रात ४५ हजार खेडेगावं आहेत. तथापी फक्त दहा हजार, पाचशे गावात वाचनालये आहेत. गावोगावी वाचनालये निर्माण झाली पाहिजेत. वाचनालये प्रगल्भ माणसे घडवितात, परिणामे समृद्ध वाचनालयामुळे पोलीस स्टेशनची संख्या कमी होण्यास मदत होते. जीवन सुखी, समृद्ध, आनंदी आणि सुसंस्कृत बनवण्याची ताकत वाचनामध्ये आहे. सुखाची देवाण घेवाण ग्रंथ करतात. मोबाईलचे दुष्परिणाम टाळण्यासाठी वाचन संस्कृती एक मात्र पर्याय आहे. या मेळाव्यात जेष्ठ लेखक कवी प्रकाश गव्हाणे, प्रकाश महामुनी, आबासाहेब घावटे, कवी किरण विभुते, रजनी गंभीर, तेजस्विनी मस्के, हेमंत मस्के, समीक्षक बी.आर. देशमुख, प्रदीप कांदे, दिलीप साळवे इत्यादी साहित्यिक सहभागी झाले होते. प्रारंभी वाचनालयाचे संस्थापक व कार्यवाह प्रा. चंद्रहान्स गंभीर यांनी प्रास्ताविक केले. व्यासपीठावर सरपंच नीलम कदम, पोलीस पाटील अमृता माळी पाटील या उपस्थित होत्या. मेळाव्यात प्रकाश गव्हाणे, आबासाहेब घावटे, गंभीर यांची भाषणे झाली. अध्यक्षीय भाषण प्रमिला देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन कवी किरण विभुते यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश येडवे, अभिमन्यू यादव, ग्रंथपाल अविनाश कावळे, लक्ष्मण गाडेकर, जीवन वायकर यांनी परिश्रम घेतले.

## वंजारी समाजाच्या समर्थनार्थ मराठवाड्यात काढणार प्रतिमोर्चे

### मुख्यमंत्र्यांनी कायदा-सुव्यवस्था राखावी : लक्ष्मण हाके

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ जानेवारी-**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष सुरू झाला आहे. त्यातच आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मराठा समाजाच्या विरोधात, वंजारी समाजाच्या समर्थनार्थ मराठवाड्यात प्रतिमोर्चे काढू, असा थेट इशारा राज्य सरकारला दिला आहे. हाके यांच्या इशाऱ्यानंतर वंजारी विरुद्ध मराठा असा वाद पेटण्याची शक्यता आहे.

लक्ष्मण हाके सोमवारी (ता. ६) न्यायालयीन कामासाठी पंढरपुरात आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना वंजारी समाजाच्या संरक्षणासाठी प्रतिमोर्चे काढू, असा इशारा दिला आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणातील आरोपींना फाशीची लक्ष्मण हाके शिक्षा या द्यावी, मागणीसाठी मराठा समाजाच्या वतीने राज्यभरात मोर्चे व आंदोलने सुरू आहेत. या प्रकरणी विरोधकांसह बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदारांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनीही मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करत या प्रकरणी आरोपींना कडक शिक्षा द्यावी, अशी मागणी केली आहे. त्यानंतर आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे धनंजय मुंडे यांच्या समर्थनार्थ पुढे आले आहेत. भाजप आमदार सुरेश धस आणि मनोज जरांगे हे संतोष देशमुख यांच्या हत्येच्या आडून जातीयवाद करत आहेत, असा आरोपही हाके यांनी केला आहे. हाके म्हणाले, संतोष देशमुख यांची हत्या प्रकरणानंतर पॉलिटिक्स स्कोअर सेट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. गुन्हेगारीचे समर्थन करणार नाही, परंतु संतोष देशमुख यांच्या हत्येचे कारण पुढे करून महाराष्ट्रात मोर्चे काढले जात आहेत. हे मोर्चे एका वंजारी जातीला टार्गेट करण्यासाठी काढले जात आहेत. वंजारी ही जात ओबीसीमध्ये आहे. तिला बदनाम केले जात आहे. ओबीसी म्हणून या जातीच्या संरक्षणासाठी आम्ही मराठवाड्यासह राज्यभरात प्रतिमोर्चे काढू. दरम्यान लक्ष्मण हाके यांच्या इशाऱ्यानंतर मराठा नेते काय प्रतिक्रिया देतात, हे देखील आता पाहावे लागणार आहे.

#### महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्था बिघडली

संजय राऊत व शरद पवार हे सत्तेशिवाय जगूच शकत नाहीत. त्यांनी सर्वसामान्यांसाठी किंवा कामगारांसाठी कोणतीही लढाई लढली नाही. शरद पवारांनी आतापर्यंत जातीयवादी भूमिका घेतली आहे. ते फक्त साखर कारखानदारांचे नेते आहेत, अशी घणाघाती टीका लक्ष्मण हाके यांनी केली. महाराष्ट्रात कायदा- सुव्यवस्था बिघडली आहे. राज्याच्या अनेक भागांत दहशतीचे वातावरण तयार झाले आहे. मुख्यमंत्री व गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कायदा सुव्यवस्था राखावी; अन्यथा गृह विभागाच्या विरोधात जनआंदोलन उभे केले जाईल, असा इशाराही हाके यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे.

## सावित्रीच्या लेकींनी रंगमंचावर साकारला बाईचा जन्म

### अर्णव शैक्षणिक संकुलात स्नेहसंमेलन, पुरस्कार वितरण उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ जानेवारी-**

सिने अभिनेते शंतनू मोघे आणि पुणे विभागाचे शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्णव शैक्षणिक संकुल सासुरे फाटा वैराग ता बार्शी येथे वार्षिक स्नेहसंमेलन आणि कै. बाबुरावजी डिसले स्मृती जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

संकुलातील लहान गटापासून ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी चित्रपट गीते, देशभक्तीपर गीते, शेतकरी गीते, ऐतिहासिक प्रसंग सादरीकरण, समाज प्रबोधनात्मक नाटक सादर करुन प्रेक्षकांची मने जिंकली. सावित्रीच्या लेकी आणि शिवकन्या या गीतातून मुलींनी महिला सबलीकरणावर भर दिला तर इयत्ता नववीतील विद्यार्थ्यीनींनी जन्म बाईचा या गाण्यातून जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा स्त्री जीवनाचा उलगडा केला. सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने सचिव प्रताप दराडे यांनी मंडळाच्या कार्याची माहिती दिल्यानंतर नागनाथ उंबरे सामाजिक क्षेत्र,शैक्षणिक क्षेत्रातून विलास मिरगणे, क्रीडा पुरस्कार दिपक चिकणे, शुभदा देशपांडे यांना महिला भूषण पुरस्कार, दीपक नलवडे यांना सांस्कृतिक, संजय बारबोले पत्रकारीता, सोमनाथ टकले साहित्य, हभप राजन महाराज काशिद पिंपरीकर आध्यात्मिक, तुषार भोसले व शुभांगी भोसले युवा उद्योजक, राहुल धोका समाजसेवा क्षेत्र, प्रदीप काळे यांना कला क्षेत्रातून गौरविण्यात आले. याशिवाय संकुलातील आदर्श विद्यार्थी आणि आनंद बाजारमधील उत्कृष्ट स्टॉल निवडून गौरविण्यात आले. सिने अभिनेते शंतनू मोघे यांनी विद्यार्थ्यांनी कलाक्षेत्राकडे करिअर म्हणून पहावे, असा सल्ला दिला. सुहास ढेकणे यांनी सूत्रसंचालन केले तर सोमनाथ घायतिडक यांनी पाहुण्यांचा परिचय करुन देण्यासोबतच संकुलातील गुणवत्तेचा आलेख मांडला. माजी सभापती अनिल डिसले, संस्था सचिव रविंद्र कापसे, मुख्याध्यापिका अर्चना डिसले, अर्णव कापसे, सिध्देश्वर माने, विलास वळेकर, सुरज डिसले, रामकृष्ण बेहेरे, रामचंद्र जानकर, सचिन डिसले, सागर डिसले उपस्थित होते.



## तब्बल ३० वर्षांनी भेटले मित्र-मैत्रिणी

### सिल्व्हर ज्युबिलीच्या १९९४ च्या बॅचचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जानेवारी-**

के. एल. ई. सोसायटी बेळगांवी संचलित सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमध्ये १९८४ बॅचच्या माजी विदयार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच संपन्न झाला. सोलापूर, पुणे, धाराशिव, लातूर, हैद्राबाद, अहमदनगर व बार्शी शहर आणि तालुक्यातून सर्व मंडळी उत्साहाने शाळेमध्ये एकत्र आली. शाळेतील माजी मुख्याध्यापक व शिक्षक हे देखील मोठया संख्येने उपस्थित होते. शाळेचे प्रवेशव्दार, कार्यक्रमाचा हॉल रांगोळी व फुग्यांनी सजावट केला होता. तब्बल ३० वर्षांनी भेटल्यानंतर ८० मित्र-मैत्रिणींच्या गळाभेटी, गुरुजनांना पदस्पर्श करुन आशीर्वाद सारे काही भारावून टाकणारे होते.

प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे यांनी केले व के.एल.ई.संस्था व शाळेची झालेली प्रगती याबाबत माहिती दिली. सेवानिवृत्त मुख्याध्यापक एस.एम.गणाचार्य, माजी सहशिक्षक एस.डी. जमाले, व्ही.बी. शेटे, माजी उपमुख्याध्यापिका व्ही.पी. उगाणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक माजी विदयार्थी सचिन खुडे, मनिष रुगले, किरण श्रीमाळ, स्वाती जगताप, लक्ष्मी तोरड, धनंजय घोलप, हेमंत जाधव, दिपक जुगदार, बिडवे, अनंत मस्के, प्रविण घोटाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेने दिलेल्या संस्कार व ज्ञानरुपी शिदोरीमुळेच आम्ही जीवनात यशस्वी झाल्याची भावना बहुतांश विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. शाळेतील गुणवंत विदयार्थ्यांच्या बक्षीसासाठी एकवीस हजार रुपये कायम ठेवीसाठी मुख्याध्यापकांकडे सोपविले. वर्षा रसाळ यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ग्रीन फिंगर्स कॉलेजतर्फे स्कूल कनेक्ट कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.७ जानेवारी-**

ग्रीन फिंगर्स कॉलेजतर्फे स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रभावी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली गेली आजच्या जलद विकसित जगात पारंपारिक करिअर मार्ग हाच एकमेव पर्याय राहिलेला नाही आर्टिफिशल इंटलिजन्स डिजिटल मार्केटिंग ग्राफिक्स डिझाईन या क्षेत्रातील करियर फायदेशीर म्हणून उदयास आले आहेत, याची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन करिअरच्या संधी व त्यामध्ये येणारे नवीन नवीन सॉफ्टवेअर मधील बदल तसेच करिअरमधील आवश्यक कौशल्याची माहिती देण्यात आली. या कार्यशाळेत अशा व्यक्तींची उदाहरणे देण्यात आली. ज्यांनी नवीन काळातील करिअरमध्ये प्रवेश केलेला आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चौकटी बाहेर विचार करण्यास प्रेरित केले गेले.

ही कार्यशाळा माळशिरस, अकलूज, नरसिंगपूर, टेंभुर्णी इत्यादी अनेक गावातील विविध महाविद्यालयांमध्ये संपन्न करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण व त्यामधील बदल याची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक व नवीन तंत्रज्ञानानुसार असणाऱ्या करिअर संधी विषयी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

## बार्शीत ११, १२ जानेवारीला राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जानेवारी-**

कर्मवीर डॉ. जगदाळे मामा यांच्या जयंतीनिमित्त रोटरी क्लब बार्शी, कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी व अमर काळे असोसिएट्स यांच्यावतीने खुल्या राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या स्पर्धा कर्मवीर क्रीडा संकुल येथे ११ व १२ जानेवारी रोजी पार पडतील. या स्पर्धेसाठी तीनशेपेक्षा जास्त स्पर्धकांनी आपली नावे नोंदवली आहेत. यामध्ये पुणे, सातारा, सांगली, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, यवतमाळ,



अमरावती, कोल्हापूर, नांदेड, परभणी, लातूर व बार्शी अशा अनेक शहरांमधून नामवंत खेळाडू आपला सहभाग नोंदवत आहेत.

प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष शैलेश वखारिया यांनी सांगितले की, राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित केल्यामुळे छोट्या शहरांमध्ये राहणाऱ्या खेळाडूंना नामवंत व विविध प्रकारच्या खेळाडूंबरोबर खेळण्याची संधी मिळते. स्पर्धेचे व्यवस्थापन टेबल टेनिस प्रशिक्षक व रोटरी सदस्य गणेश स्वामी व प्रा.एस. एम. लांडगे हे करत असून पंच म्हणून गणेश स्वामी, कृष्णा थोरात, अजय बोरवणकर, गौरव कमठाणे आदी काम पाहतील, अशी माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.अतुल कल्याणी व कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य प्रा.एस.एस. गोरे यांनी दिली. या प्रकल्पासाठी रोटरी सदस्य गिरीश झंवर, अनिल बंडेवार, विशाल देशमुख, प्रदिप बागमार, आनंद बेदमुथा, अमित खटोड यांनी आर्थिक सहाय्य केले आहे.

## सक्रांतीसाठी सुगडी बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ जानेवारी-**

सक्रांतीचा सण आठ दिवसांवर आल्यामुळे या सणा दिवशी सौभाग्यवती महिलांना वाणवश्यासाठी लागणाऱ्या सुगडी, लोटकी आणि बोळकी बनविण्याची कामे येथील कुंभारवाड्यांमधून सध्या अंतिम टप्प्यात आलेली आहेत. सध्या कुंभार मंडळी आपल्या संपूर्ण कुटुंबियासमवेत या कामांमध्ये व्यस्त असल्याचे कुंभार वाड्यांमधून दिसून येत आहे.

सक्रांतीचा सण हा सौभाग्यवती महिलांवर्गासाठी अत्यंत महत्वाचा सण मानला जात असतो. या सणा दिवशी राज्याच्या कानाकोपऱ्यातून महिला दक्षीण काशी म्हणून प्रसिध्द असलेल्या येथील विठ्ठल मंदिरामधील रखुमाई मातेच्या मंदिरात सक्रांतीच्या वाणवश्यासाठी गर्दी



करीत असतात. सहाजीकच या सणा दिवशी वाणवसा करण्यासाठी लागणाऱ्या मातीपासून बनविल्या जाणाऱ्या सुगडी, लोटकी आणि बोळक्यांना पंढरपूर बरोबरच पुणे, सोलापूर, सातारा जिल्ह्यातून खूपच मागणी असते. त्यामुळे अशा प्रकारच्या मातीपासून बनविण्यात येत असलेली सुगडी, लोटकी आणि बोळकी बनविण्याच्या कामाची येथील कुंभारवाड्यांमधून सध्या लगबग सुरु असल्याचे दिसत आहे.

#### कच्यामालाची किंमती वाढल्या

सक्रांतीच्या सणासाठी लागणारी सुगडी, लोटकी आणि बोळकी बनविण्यासाठी लागणारी ट्रॉलीने माती लागते. त्याच बरोबर घोड्याची लीद टांगेवाल्याकडून आणावी लागते. राख, भुस्सा या सर्वांचेही दरही वाढलेले आहेत.

कुंभारवाड्यात साधारणपणे दिवाळी झाल्यानंतर लगेचच सक्रांतीच्या सणासाठी लागणारी सुगडी बनविण्याच्या कामास सुरुवात केली जाते. सक्रांतीचा सण अवघ्या आठ दिवसांवर येवुन ठेपल्यामुळे येथील कुंभारवाड्यांमधून कुंभार परिवारातील सर्व सदस्य दिवसरात्र या कामांमध्ये व्यस्त असल्याचे दिसत आहेत. अशा प्रकारची मातीची भांडी बनविण्यासाठी माती, राख, घोड्याची लीद आणि भुस्सा याचे मिश्रण करुन ते पायाने तुडवुन त्याचा चिखलाचा लगदा तयार करुन त्या पासून लहान मोठ्या आकाराची सुगडी, लोटकी आणि बोळकी बनविली जातात.

अशा प्रकारची मातीची भांडी बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल या वर्षी महाग झाल्यामुळे सहाजीकच मातीच्या विविध आकाराच्या सुगड्यांच्या किंमती देखील वाढलेल्या आहेत. येथील कुंभारवाड्यातून दररोज शेकडोंच्या संख्येने सुगडी, लोटकी आणि बोळकी विक्रीसाठी बाजारपेठे मध्ये पाठवणूक केली जात असल्याची माहिती कुंभारवाड्यातील कारागीरांनी दिली.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तुळजापूरात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जानेवारी -**

मराठी पत्रकारीतेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या २१३व्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करून तुळजापूर पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा करण्यात आला.

दि.६ जानेवारी १८१२ रोजी जन्मलेल्या बाळशास्त्री जांभेकर यांनी दि.६ जानेवारी १८३२ साली पहिले मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवून दर्पण या वृत्तपत्राची सुरूवात केली. दर्पण दिनाचे औचित्य साधून पत्रकारांना मनोगत व्यक्त करताना श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी पत्रकार व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांना ही दर्शन पास मिळाले पाहिजे, यंदा पत्रकार भवन उभारले पाहिजे, पत्रकार बांधवांच्या उदरनिर्वाहासाठी बँकेकडून विविध योजनेतून व्यवसाय कर्ज मिळाले पाहिजे आदिंसह विविध विषयांवर चर्चा करून ठराव करण्यात आला आहे.

यावेळी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रदिप अमृतराव, शहराध्यक्ष सचिन ताकमोघे, जिल्हा उपाध्यक्ष संजय खुरुद, जिल्हा कार्यकारिणी सदस्य गुरुनाथ बडूरे, तालुका सचिव शुभम कदम, अनिल आगलावे आदिंनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी जेष्ठ पत्रकार अंबादास पोपळे, श्रीकांत कदम,डॉ सतिश महामुनी, जगदीश कुलकर्णी,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी संजय कुलकर्णी, शहर उपाध्यक्ष सुरज बागल, सिद्दीकी पटेल, रुपेश डोलारे, संजय गायकवाड, सचिन ठेले आदींसह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### शेतकरी गटामार्फत ड्रमचे वाटप

**इटकळ, दि.७ जानेवारी -**

धनगरवाडी येथे दि.४ जानेवारी रोजी आत्मा अंतर्गत पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत माऊली सेंद्रिय शेतकरी गटास सेंद्रीय निविष्ठा बनविणे साठी ड्रम वाटप करण्यात आले. आत्मा अंतर्गत धनगरवाडी (ता. तुळजापूर) येथे डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन २०२३-२४ अंतर्गत निविष्ठा बनविणेसाठी गटामार्फत ड्रम वाटप करण्यात आले. तसेच प्रशिक्षण कार्यक्रममध्ये बोलताना तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्माचे वैभव लोंढे यांनी विविध सेंद्रिय निविष्ठा कश्या पद्धतीने बनवाव्यात याचे मार्गदर्शन केले. धनगरवाडी गावचे सरपंच नागनाथ घोडके यांनी या सेंद्रिय गटामार्फत गावातील शेतकरी सेंद्रिय शेतीकडे कृषी आत्मा विभागाच्या माध्यमातून जोडले जात असुन जनजागृती होत आहे. ही कौतुकाची बाब असल्याचे नमूद केले. मनरेगामार्फत गांडूळ बेड घेणे बाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास ग्रामसेवक घुगे तंटामुक्त अध्यक्ष सुभाष घोडके तसेच गावातील बहुसंख्य पुरुष व महिला शेतकरी उपस्थीत होते. यावेळी दिपक महाराज निकम यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



### मंगरुळ शाखेत पत्रकार दिन साजरा

**मंगरूळ, दि.७ जानेवारी -**

लोकमंगल मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मंगरुळ (ता. तुळजापूर) येथे सोमवार ६ जानेवारी रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पत्रकार दिन साजरा करण्यात आला. मंगरुळ येथील दैनिक तरूण भारत व दैनिक जनमतचे युवा पत्रकार चांदसाहेब शेख यांचा शाखेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंगरुळ शाखेचे शाखा व्यवस्थापक सोमनाथ पावले, सत्यवान ढोकळे, ऋषिकेश तांबे, वैभव काळदाते यांच्यासह प्रगतिशील शेतकरी अच्युत कापसे उपस्थित होते. लोकमंगल ग्रुप व आमदार सुभाष देशमुख यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.



### ‘लोकमंगल’तर्फे पत्रकारांचा सत्कार

**जळकोट, दि.७ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी शाखेतर्फे मराठी वृत्तपत्राचे जनक बाळ शास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करुन पत्रकार दिनी जळकोट गावातील पत्रकारांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात पत्रकार मेघराज किलजे, अरुण लोखंडे, वीरभद्र पिसे, संजय पिसे, संजय रेणुके यांचा लोकमंगल मल्टीस्टेट शाखेचे सल्लागार तुकाराम साखरे, प्रकाश कदम, विठ्ठल कदम, कुबेर कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी लोकमंगल मल्टीस्टेट जळकोट शाखेचे शाखाधिकारी श्रीकांत कुलकर्णी, कर्मचारी पिंटू राठोड, शिवलिंग स्वामी आदि उपस्थित होते.



### ‘महिला’च्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**तुळजापूर, दि.७ जानेवारी -**

महाराष्ट्र पत्रकार दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त शहरातील सर्व पत्रकार बांधवांचे सत्कार नवनिर्मिती प्रेरणा बहुउद्देशीय महिला मंडळ व अष्टभूजा महिला पतसंस्था यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी जगदीश कुलकर्णी, गोविंद खुरूद, श्रीकांत कदम, प्रदीप अमृतराव, सचिन ताकमोघे, ज्ञानेश्वर गवळी, संजय खुरुद, सुरज बागल, शुभम कदम, अनिल आगलावे यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. रुपाली घाडगे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी संस्थेच्या सदस्या संध्या खुरुद, रुपाली घाडगे, श्रीदेवी महामुनी, सुनीता काळे, लता हरवाळकर, माधुरी पाटील, कविता पवार, सविता लबडे, जयश्री भालेकर, शांता सुरवसे, अनिता शिंदे, कमल दांडे, जमदाडे यांची उपस्थिती होती.

### अध्यक्षपदी महेश निंबरगे

**मुरूम, दि.७ जानेवारी -**

उमरगा-लोहारा विधानसभा पत्रकार महासंघाची कार्यकारणी नव्याने जाहीर करण्यात आली असून या महासंघांच्या अध्यक्षपदी दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी महेश निंबरगे यांची निवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी लोहारा येथील सुनील ठेले आणि दाळिंब येथील अस्लम शेडेमवाले यांची निवड झाली आहे.

## आई राधा उदो उदोच्या... गजरात घटस्थापनेने शाकंभरी नवरात्र महोत्सवास प्रारंभ





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जानेवारी -**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री तुळजाभवानी मंदिरात दि.७ जानेवारी मंगळवार रोजी दुपारी १२ वाजता गणेश ववरीत शाकंभरी देवीच्या घटस्थापनाने शाकंभरी नवरात्र महोत्सवास प्रारंभ झाला.

मंगळवारी पहाटे सात दिवसाच्या मंचकी निद्रे नंतर देवी सिंहासनावर आरूढ झाली.

तत्पूर्वी देवीच्या मूळ गाभाऱ्यास पुरातन रूप देण्यासाठी देवीच्या निद्रावस्थेत मूळ गाभाऱ्याचे काम चालू असल्याने देवीचा मूळ गाभारा स्वच्छ पाणी आणि गोमूत्राने धुवून घेण्यात आला. त्यानंतर पंच्यामृत अभिषेक घालण्यात आला. दुपारी बारा वाजता गणेश ओहरीत यावर्षीचे शाकंभरी नवरात्राचे यजमान विवेक गंगणे व त्यांच्या पत्नी प्रियंका गंगणे यांच्या हस्ते घटस्थापना झाली यावेळेस मंदिर संस्थानचे महंत तुकोजीबुवा, वाकोजीबुवा, हमरोजी बुवा, याप्रसंगी मंदिर संस्थांचे सरकारी उपाध्ये बंडू पाठक, महंत तुकोजी बुवा, महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा तसेच मंदिर संस्थांचे व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने, सिद्धेश्वर इतुले, विश्वास कदम, जयसिंग पाटील तसेच व्यवस्थापक अमोल भोसले धार्मिक व्यवस्थापक विश्वास कदम, जयसिंग पाटील तिन्ही पुजारी मंडळाचे अध्यक्ष सेवेकरी आधीसह पुजारी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. पाटील यांच्याकडून कॅनॉलच्या कामाची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.७ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर जवळील तेरणा धरणाच्या सिमेंट कॉक्रेटमध्ये होत असलेल्या कॅनॉलच्या कामाची आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी पहाणी केली.

यावेळी शिवाजीराव नाईकवाडी, पद्माकर फंड, उपसरपंच श्रीमंत फंड, प्रविण साळुंके, डॉ. गुरूप्रसाद चिवटे, हनुमंत कोळपे, नवनाथ पसारे, राहुल गायकवाड, सुनिल गायकवाड, प्रविण साळुंके, मज्जित मनियार, अजित कदम, रामा कोळी, प्रतिक नाईकवाडी, संजय लोमटे, गणेश फंड, कार्यकारी अभियंता ए.एम. मदने, उपविभागीय अभियंता डी.एम. नाईकनवरे, शाखा अभियंता डी. सी. वरपे, अभियंता सहायक डी. एस. यादव, कालवा निरीक्षक एस.आर. काळे, एस.एन. पडवळ, कालवा चौकीदार रा.म. माने यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चव्हाण यांच्या हस्ते पत्रकार पदाधिकाऱ्यांचा होणार सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जानेवारी -**



दर्पण दिनानिमित्त तसेच तुळजापूर पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारणीचा माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते दि.१० जानेवारी रोजी तुळजापूर येथे पत्रकारांचा सन्मान सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे

तुळजापूर तालुका पंचायत समितीच्या सभागृहामध्ये हा कार्यक्रम आयोजित केला आहे वेळ सकाळी ११ वाजता तुळजापूर तालुक्यातील सर्व ग्रामीण आणि शहरी पत्रकारांचा सत्कार होणार आहे.

तरी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवानी उपस्थिती रहावे असे आवाहन कांग्रेस पक्षाचे नेते तथा माजी नगरसेवक अमर मगर यांनी केले आहे.

या निमित्ताने धाराशिव जिल्ह्यातील विकासाबद्दल चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

## तेरणाच्या कालव्याचे काम अंतिम टप्प्यात

**कामात दर्जा राखण्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे निर्देश... सात गावातील दीड हजार हेक्टर क्षेत्र येणार सिंचनाखाली...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जानेवारी -**

तेरणा धरण क्षेत्रातील शेतकरी बांधवांची शेतीच्या पाण्याची चणचण आता कायम स्वरूपी दूर होणार आहे. तेरणा मध्यम प्रकल्पाच्या विशेष दुरुस्ती अंतर्गत डाव्या आणि उजव्या कालव्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी आपण ३ कोटी ४१ लाख रुपयांचा निधी मंजूर करवून घेतला होता. हे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील सात गावातील दीड हजाराहून अधिक हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. धरण परिसरात भेट देऊन देऊन कामाचा दर्जा राखण्याचे निर्देश संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

या विशेष दुरुस्ती कामाच्या अंतर्गत डाव्या कालव्याचे अंतर १५ किलोमीटर लांबीचे आहे. त्यातून साधारणपणे ७५० हेक्टर क्षेत्र सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. त्यामुळे तेरणा मध्यम प्रकल्पाच्या परिसरातील तेर, रामवाडी, पानवडी आणि भंडारवाडी या चार गावातील शेती आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. तसेच १६ किलोमीटर लांबीच्या उजव्या कालव्याचे कामही प्रगतीपथावर आहे. तेही लवकरच पूर्ण होईल. त्यातून साधारणतः ९०२ हेक्टर क्षेत्र सिंचनावाखाली येणार आहे. यात तेर, वानेवडी, डकवाडी, कोळेवडी, इर्ला आदी गावातील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. कालवा दुरुस्तीच्या कामामध्ये कालव्यातील झाडेझुडपे साफ करणे, गाळ काढणे व गळती होत असलेल्या ठराविक ठिकाणी कॉंक्रीट लाइनिंग करणे तसेच कालव्यावरील जुन्या बांधकामाची डागडुजी करणे, प्रवाह मापक यंत्र बसवणे आदी बाबींचा यात समावेश आहे. वरील सर्वच कामे जवळपास पूर्ण होत आली असल्याचेही आ. पाटील यांनी म्हटले आहे.

### बंद पाईपलाईनद्वारे सिंचनासाठी पाणी देण्याची योजना कार्यान्वित करण्यासाठी उपाययोजना सुरू : आमदार पाटील

भविष्याचा वेध घेत आपण तेरणा धरणातून शेतकऱ्यांना बंद पाईपलाईनद्वारे पाणी देण्यासाठी महत्वाकांक्षी योजना केली होती.मात्र त्यात कांही तांत्रिक दोष असल्याने ती कार्यान्वित करता आली नाही. मात्र याबाबत इस्रायली कंपनीच्या माध्यमातून यातल्या तांत्रिक उणिवा काढून सदर योजना लवकरच कार्यान्वित करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असून तेरणेचे पाणी बंद पाईपलाईनद्वारेच थेट शेतकरी बांधवांच्या शिवारात दाखल झाल्यास पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात टाळला जाणार आहे. सिंचनक्षेत्र देखील दीड पटीने वाढणार आहे यामुळे धरण कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवांना त्याचा मोठा लाभ होईल. असा विश्वास आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी वाढेल का?

**तभा वृत्तसेवा / अनिकेत औरादे**
**कदेर, दि.७ जानेवारी -**

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने कौशल्य विकासाला चालना मिळावी व बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी मिळावी म्हणून ९ जुलै २०२४ रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना काढण्यात आली. त्यात प्रत्येक शासकीय निमशासकीय अस्थापनेमधे मनुष्यबळानुसार प्रशिक्षणार्थी घेण्यात यावे, असे नमूद करण्यात आले होते. प्रत्येक अस्थपणेमध्ये युवा प्रशिक्षणार्थी यांना घेण्यात आले आणि सध्या ते प्रशिक्षण घेत आहेत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणून १ लाख १० हजार प्रशिक्षणार्थी हे प्रशिक्षण घेत आहेत. गेले कित्येक दिवस वेळेवरती विद्यावेतन सुधा त्यांना मिळत नाही. परंतु आता प्रशिक्षणार्थी यांचा फेब्रुवारीचा पहिल्या आठवड्यामध्ये त्यांचा कार्यकाळ संपत आहे.

प्रत्येक तालुक्यातून, जिल्ह्यातून आमदार, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे कार्यकाळ वाढविण्यात यावा, अशी मागणी केली गेली आहे. त्यात असे म्हणले आहे की, आम्हाला महाराष्ट्र शासनाने रोजगार प्राप्त करून दिला आमचा हाताला काम दिले. परंतु आता आमचा कार्यकाळ संपत आला आहे.

यानंतर आम्ही करायचं काय? आम्ही परत बेरोजगार म्हणले जाऊ. महाराष्ट्र शासनाने लाडकी बहिण योजना काढली. परंतु विरोधकांनी मुद्दा उचलून धरल्यानंतर लाडकी बहीण योजना हे अमलात आणण्यात आली आणि लाडकी बहीण योजना याचा हप्ता सुधा टाकण्यात आला.

महायुती सरकार निवडून आणण्यामध्ये लाडक्या बहिणींचा तसेच लाडक्या भावांचा सुधा सहभाग आहे. हे सरकार ने लक्षात घ्यावे असे म्हणण्यात आले आहे.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशन मधे सुधा काही प्रशिक्षणार्थी जाऊन महायुती तसेच महाविकास आघाडी चा सर्व नेत्यांना निवेदन देण्यात आले होते. त्यावर प्रत्येक नेत्यांनी हिवाळी अधिवेशन मध्ये मुद्दा मांडला परंतू अजून सुधा सरकारने याकडे दुर्लक्ष केलं आहे.

वारंवार निवेदन देऊन सुधा प्रशासन याची काहीच दखल घेत नसल्यामुळे प्रशिक्षणार्थी नाराज आहेत. आणि सरकारने प्रशिक्षणार्थी हे बेरोजगार होऊ नये यासाठी सरकार व तसेच महविकास तसेच महायुती च नेत्यांनी प्रयत्न करावे, अशी मागणी त्यांच्याकडून होत आहे. याकडे महाराष्ट्रातील प्रत्येक प्रशिक्षणार्थींचे लक्ष लागले आहे.

## अध्यक्षपदी सुदर्शन वाघमारे तर सचिवपदी आदित्य बुरांडे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जानेवारी -**

जाणता राजा युवा मंचच्या आर्य चौक येथील मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीची बैठक दि.५ जानेवारीला संपन्न झाली.

यामध्ये सर्वानुमती अध्यक्षपदी सुदर्शन वाघमारे तर सचिवपदी आदित्य बुरांडे यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणीमध्ये उपाध्यक्षपदी महेश पुजारी, सहउपाध्यक्ष शुभम दहीहांडे, कोषाध्यक्षपदी शुभम खोले, सहकोषाध्यक्ष म्हणून अजिंक्य मस्के, सह सचिवपदी विराज कदम यांची निवड करण्यात आली. मिरवणूक प्रमुख अभिजीत कुतवळ, राहुल भालेकर, पृथ्वीराज मलबा, प्रसाद प्रयाग यांची तर लेझीम प्रमुख म्हणून ऋषिकेश साळुंके कार्याध्यक्ष राजाभाऊ चोपदार, बापू साखरे यांची एकमताने निवड करण्यात आली. भव्य शिवमुर्तीची प्रतिष्ठापना करून ४०० शिवमुर्तींचे वाटप मंडळाच्या वतीने करण्यात येणार असून गरजू लोकांसाठी आरोग्य शिबिर भरवण्यात येणार आहे.

## योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहचावा : खा. राजेनिंबाळकर

### दिशा समिती बैठकीत घेतला विविध विभागांचा आढावा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जानेवारी -**



जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने करण्यात येणारी कामे लवकरात लवकर पूर्ण करून अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत त्या योजना पोहोचवाव्यात, असे निर्देश दिशा समितीचे अध्यक्ष खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन समिती सभागृहात ६ जानेवारी रोजी आयोजित दिशा समितीच्या सभेत अध्यक्षस्थानावरून खासदार राजेनिंबाळकर बोलत होते. आमदार कैलास पाटील, आमदार प्रविण स्वामी, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती. खासदार राजेनिंबाळकर पुढे म्हणाले, शेतकऱ्यांकडून विम्याची रक्कम घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विम्याचा परतावा देताना टाळाटाळ करणाऱ्या विमा कंपन्यांविरोधात कारवाई करण्यात यावी. सर्वसामान्यांना योजनांचा लाभ देण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यतत्परता दाखवावी. अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्ग कामाबाबत कोणताही हजगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे ते म्हणाले.

या समितीच्या बैठकीला अनुपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांना नोटीस बजावून अशा अधिकाऱ्यांविरोधात कारवाईचा प्रस्ताव पाठवावा, असे त्यांनी जिल्हाधिकारी यांना यावेळी सांगितले.

केंद्र सरकार पुरस्कृत योजना-प्रधानमंत्री पिक विमा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मध्यान्ह पोषण आहार योजना, राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना, अमृत योजना, रोजगार हमी, दीनदयाळ विद्युतीकरण योजना, मूलभूत सुविधा प्रकल्प, डिजिटल इंडिया योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, स्वच्छ भारत योजना, उज्ज्वला गॅस योजना, सर्वशिक्षा योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन, राष्ट्रीय भूमी अभिलेख यासारख्या विविध केंद्र सरकार पुरस्कृत योजनांसह दूरसंचार, महामार्ग, रेल्वे, खनिकर्म यासारख्या विविध महत्वपूर्ण विषयांवर चर्चा होऊन जिल्ह्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य कांचनमाला संगवे,रणजित पाटील व सिध्दार्थ बनसोडे तसेच केंद्र सरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दूरदृष्टी ठेवून गावचा विकास : गजेंद्र पाटील

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.७ जानेवारी -**

जळकोट गावचा दूरदृष्टी ठेवून विकास सुरू आहे. पत्रकारांच्या सहकार्याने गावचे विविध प्रश्न मार्गी लावले जात आहेत. असे प्रतिपादन सरपंच गजेंद्र पाटील यांनी केले.

जळकोट ग्रामपंचायत कार्यालयाच्यावतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन साजरा करण्यात आला. दर्पण दिनानिमित्त ग्रामपंचायत



कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकारांच्या सत्कार सोहळ्यात गजेंद्र पाटील हे बोलत होते. ग्राम पंचायतच्यावतीने गावातील पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात मेघराज किलजे, अरुण लोखंडे, वीरभद्र पिसे, संजय पिसे, संजय रेणुके, सुनील माळगे, विजय पिसे, मंगेश सुरवसे या पत्रकारांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अशोकराव पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश चव्हाण, उपसरपंच प्रशांत नवगिरे, तंटामुक्त समिती अध्यक्ष यशवंत कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार जिल्हा सहचिटणीस महेश कदम, बबन मोरे, बसवराज भोगे, नामदेव कागे, माजी सैनिक राजू सुरवसे, संजय माळगे आदि उपस्थित होते.

## सत्ता नसली तरी संघर्ष करून निधी खेचून आणू : आ. स्वामी




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जानेवारी -**

सत्ता नसली तरी नियोजन व संघर्ष करून निधी खेचून आणून उमरगा-लोहारा मतदार संघाचा विकास करणार असल्याची ग्वाही भातागळी येथील नागरी सत्काराला उत्तर देताना आ. प्रवीण स्वामी यांनी दिली.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील यशाबद्दल तसेच शंभू महादेवाच्या नवस्फूर्तीबद्दल भातागळी येथे खा. ओमराजे निंबाळकर आ. कैलास पाटील, आ. प्रवीण स्वामी यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात होते.

नागरी सत्काराला उत्तर देताना प्रवीण स्वामी पुढे म्हणाले की, उमरगा-लोहारा मतदारसंघातील जनतेने माझ्यावर प्रचंड विश्वास टाकला असून धनशक्ती विरुद्ध जनशक्ती वृत्ति निवडणूक लोकांनी हातात घेऊन मला विजयी केले.

याची मला सदैव जाणीव असून या यशात लोहारा तालुक्याचा वाटा खूप मोठा असून येणाऱ्या कालखंडात सत्ता नसली तरी नियोजन करून व संघर्ष करून निधी खेचून मतदारसंघाचा विकास करू. विशेषता आरोग्य, शिक्षण, कृषी या विभागावर आपला भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नागरी सत्काराला उत्तर देताना खा. ओमराजे, आ. कैलास पाटील, आ. प्रवीण स्वामी यांनी अनिल जगताप हे करत असलेल्या शेतकऱ्यांच्या कामाविषयी त्यांचे कौतुक करून समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाला दिलीप भालेराव, प्रकाश आष्टी, नरदेव कदम, राजू तोडकरी, विविध गावचे सरपंच, महादेव देवस्थानचे अध्यक्ष संजय पाटील, पाथर्डीच्या सरपंच सुषमा माने, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब जगताप उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी संयोजक अनिल जगताप यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांना सत्यवान पाटील, गणेश फत्तेपुरे, हनुमंत जगताप, कारभारी, अनंत जगताप, हनुंमत जगताप, हसन शेख, महादेव आनंदगावकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

## कळंब तहसील कार्यालय येथे पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ जानेवारी -**

कळंब तहसील येथे ६ जानेवारी रोजी दर्पण दिन पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी कळंब तहसील कार्यालयच्या वतीने तहसीलदार हेमंत ढोकले यांनी पत्रकारांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमात अशोक शिंदे, लक्ष्मण शिंदे, संभाजी गिड्डे, शितलकुमार घोंगडे, मंगेश यादव, माधवसिंग राजपूत, हनुमंत पाटोळे, संदीप कोकाटे, प्रदीप यादव, रामरतन कांबळे, सतीश तवले, राहुल गाडे या पत्रकारांचा गुलापुष्प व लेखणी देऊन सत्कार केला.

याप्रसंगी लक्ष्मण शिंदे, संभाजी गिड्डे, प्रदीप यादव, यांनी विचार व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधवसिंग राजपूत सूत्रसंचलन व आभार हनुमंत पाटोळे यांनी मानले.

## खामसवाडीत पत्रकार दिन उत्साहात; अनेक ठिकाणी पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.७ जानेवारी -**

सहा जानेवारी आचार्य बाळ शास्त्री जांभेकर यांची जयंती सर्वत्र पत्रकार दिन म्हणून साजरी करण्यात येते. या दिनाचे औचित्य साधून खामसवाडीतील पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामपंचायत कार्यालय येथे सरपंच अमोल पाटील यांनी पत्रकारांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक बाकले सर व शिक्षक बंधूनी सत्कार केला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवपुर वस्ती येथेही सत्कार केला. जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत आचार्य बाळ शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर शाळेच्या व व्यवस्थापणा समिती यांच्यावतीने पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. या शाळेत दरवर्षी आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती पत्रकार दिन दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन सर्व पत्रकार यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी कोकाटे यांनी पत्रकार सुनील पाटील यांचा सत्कार केला. शालेय समितीचे अध्यक्ष सचिन शेळके यांनी पत्रकार सुशीलकुमार पाटील यांचा सत्कार केला. गोपाळ शेळके, दिपक सावत, हनुमंत पाटोळे, जिवन गाढवे, मकबुल शेख या पत्रकारांचाही सत्कार करण्यात आला. शाळेतर्फे शाल, श्रीफळ, पुस्तक व लेखणी देऊन सत्कार केल्याने पत्रकार भाराऊन गेले. याच कार्यक्रमात शाळेतील वेगवेगळ्या उपक्रमात आलेल्या विद्यार्थिनी, विद्यार्थी यांचाही सत्कार करण्यात आला. पत्रकार सुनील पाटील, सुशीलकुमार पाटील, हनुमंत पाटोळे यांनी सत्काराला उत्तर देताना मनोगत व्यक्त केले. जिल्हा परिषदे शाळेच्या भव्य क्रीडांगणावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शाळेतील नवीन आलेले शिक्षक संदीप मगर, लिपिक नमिता गायकवाड, तसेच शिक्षक जाधव सर यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एस. काळेसर तर आभार पवार यांनी मानले.

यानंतर सिद्धिविनायक बँकेत पण सर्व पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे तज्ञ पालक संचालक बलराम कुलकर्णी, शाखा व्यवस्थापक अभिजीत सुरवसे, सचिन रोहिले, अजय पांचाळ, श्याम कोळपे यांनी सर्व पत्रकारांचा पुष्पहार, श्रीफळ, लेखणी देऊन सत्कार केला.

### तुळजाई पतसंस्थेच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जानेवारी -**

तुळजाई नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने शहरातील सर्व पत्रकारांचे सत्कार करून पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी तुळजापूर शहर व परिसरातील पत्रकारिता क्षेत्रामध्ये महाराष्ट्रातील विविध लोकप्रिय दैनिकात उत्कृष्ट काम करत असलेल्या पत्रकारांचा यथोचित मानसन्मान इतिहास तज्ञ डॉ. सतीश कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पंडितराव जगदाळे, राजाभाऊ देशमाने, ताटे, संजय ढवळे, मकसूद शेख, यांच्यासह संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

### पत्रकार शिवाजी बोबडे यांना पितृशोक

**खामसवाडी, दि.७ जानेवारी -**

खामसवाडी (ता.कळंब) येथील पत्रकार शिवाजी बोबडे यांच्या वडिल बाबुराव बोबडे यांचेअल्पशा आजाराने निधन झाले.

प्रकृती अस्वस्थतामुळे त्यांना सोलापूरच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचे सोमवारी दि.६ जानेवारी रोजी दुपारी निधन झाले. खामसवाडीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना मुलगा शिवाजी बोबडे, स्नुषा व मुलगी असा परिवार आहे.

## लोहारा शहरात वाचन संकल्प अभियानाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.७ जानेवारी -**

लोहारा शहरातील लोक वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियाना अंतर्गत ग्रंथ प्रदर्शन व पुस्तक वाचनाचा शुभारंभ दि.६ जानेवारी रोजी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पत्रकारांच्या व शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

हा दि.१ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत संपूर्ण राज्यात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात ग्रंथपदर्शन पुस्तक वाचन वाचकांची संख्या वाढवण्याकरिता प्रयत्न



केले जाणार आहेत.

ग्रंथालयात दिवसभर ग्रंथ व विविध प्रकारचे नवीन ऐतिहासिक साहित्य बाल साहित्य ग्रंथ शालेय विद्यार्थ्यांना वाचकांना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

वाचकांच्या वाढीकरिता सामाजिक प्रबोधन करण्यात येत येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ पोलीस निरीक्षक अजित चितले, साहाय्यक गटविकास अधिकारी वग्गे, गटशिक्षणाधिकारी सुभाष चव्हाण, लोक वाचनालयाचे सचिव माणिक तिगाडे, उपनगराध्यक्ष आयुब शेख, नगरसेवक प्रशांत काळे, श्याम नारायणकर, हरी लोखंडे, मंडळ निरीक्षक जगदीश लांडगे, ग्रंथपाल संजय जेवळीकर, बालाजी बिराजदार, जसवंतसिंह बायस, अशोक दुबे, मेहबूब फकीर, गिरीश भगत, अब्बास शेख, यशवंत भुसारे, सुधीर कोरे,

सदाशिव जाधव, आदम पठाण, रमाकांत गायकवाड, गणेश खबुले, सुमित झिंगाडे, सुनील ठेले, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

या अभियानात जवळपास साडेतीन हजार महत्त्वाची जुनी आणि नवीन ग्रंथ व पुस्तके वाचकांसाठी दिवसभर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

## खंडोबा यात्रेत चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ जानेवारी -**

नळदुर्ग (मैलारपुर) येथे दि. ११ ते १४ जानेवारी २०२५ या कालावधीत भरणाऱ्या श्री खंडोबा यात्रेत पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करण्याबरोबरच यात्रेतील अवैध धंदे व दारू विक्री पुर्णपणे बंद करावे अशी मागणी नळदुर्ग शहर शिवसेनेच्या वतीने धाराशिव जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, नळदुर्ग (मैलारपुर) हे श्री खंडोबा देवाचे महत्वाचे ठिकाण आहे. याचठिकाणी श्री खंडोबा देव व माता बाणाई यांचा विवाह झाला आहे. त्यामुळे खंडोबा भक्तांसाठी श्रीक्षेत्र मैलारपुर हे अतिशय महत्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे याठिकाणी भरणाऱ्या श्री खंडोबा यात्रेत महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यातील लाखो भाविक श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी येतात. यात्रेच्या मुख्य दिवशी श्रीक्षेत्र मैलारपुरात ५ ते ६ लाख भाविक उपस्थित असतात प्रचंड मोठी गर्दी याठिकाणी असते. या गर्दीचा फायदा घेत चोरटे भाविकांना लुटण्याचा प्रयत्न करतात. पोलिसांनी या चोरट्यांचा बंदोबस्त करावा. त्याचबरोबर यात्रेत लालपत्ती, टायगर गेम व सुरट यासारखे दोन नंबरचे धंदे सुरु असतात त्यामुळे यात्रेकरूंची मोठी लुट होते. पोलिसांनी श्री खंडोबा यात्रेत एकही अवैध धंदा सुरु होऊ देऊ नये. यात्रेत मोठ्याप्रमाणात दारू विकली जाते. यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांनी यात्रेत होणारी दारू विक्री पुर्णपणे बंद करावी त्याचबरोबर यात्रेत जे दारू विक्री करतात त्यांना यात्रा कालावधी पर्यंत ताब्यात घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी शहर शिवसेनेच्या वतीने या निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकुर, उपशहरप्रमुख शाम कनकधर, सोमनाथ म्हेत्रे, शिवसेना ग्राहक संरक्षण समितीचे शहर अध्यक्ष नेताजी महाबोले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रिडा स्पर्धेत न.प.चे यश





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ जानेवारी -**

धाराशिव येथे पार पडलेल्या महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग धाराशिव जिल्हा जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमात नळदुर्ग नगरपालिकेने घवघवीत यश संपदन करुन ऐतिहासिक नळदुर्ग शहराचे नाव उज्वल केले आहे. सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेत मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या नेतृवाखाली सादरीकरण करण्यात आलेल्या श्री खंडोबा, बाणाई आदींच्या पौराणिक वेशभुषेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. मुख्याधिकारी लक्षण कुंभार यांनी सादरीकरण केलेल्या वाघ्याच्या पात्राचे अनेकांनी कौतुक केले आहे.

धाराशिव येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग धाराशिव जिल्हा जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम २०२४-२५ यामध्ये नळदुर्ग नगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदवुन वैयक्तिक व सांघिक स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमात मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या नेतृत्वाखाली सादरीकरण केलेल्या श्री खंडोबा, बाणाई आदींच्या पौराणिक वेशभुषेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. यामध्ये मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी हुबेहुब वाघ्याची भुमिका सादर केली आहे. त्यांच्या या सादरीकरणाचे सर्वांनीच भरभरून कौतुक केले आहे.

त्याचबरोबर यामध्ये रोहीत नायकवाडी यांनी श्री खंडोबाची भुमिका अतिशय उत्कृष्टपणे सादर केली. तर दिक्षा शिरसाट यांनी बाणाईची तर पल्लवी पाटील यांनी म्हाळसादेवीची भुमिका अतिशय चांगल्या प्रकारे सादरीकरण केले त्याचबरोबर इतर कर्मचाऱ्यांनी यामध्ये वारूंचे पात्र चांगले सादरीकरण केले. यामुळेच या स्पर्ध्येत या प्रकाराला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

नळदुर्ग (मैलारपुर) हे श्री खंडोबा देवाचे महत्वाचे ठिकाण आहे याच ठिकाणी श्री खंडोबा आणि बाणाईचा विवाह झालेला आहे. त्यामुळे नळदुर्ग नगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सादरीकरण केलेल्या या प्रकाराला खंडोबा देव पावल्याचे दिसुन येत आहे. त्याचबरोबर वैयक्तिक क्रीडा स्पर्धेमध्ये बुद्धिबळ स्पर्धेत दिक्षा शिरसाट यांनी प्रथम क्रमांक मिळविला. १०० मिटर धावणे स्पर्धेत पल्लवी पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळविला. ३ किलोमीटर चालणे स्पर्धेत महिला गटात मयुरी जाधव यांनी तृतीय क्रमांक मिळविला तर पुरुष गटात आनंद खारवे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

या स्पर्धेमध्ये क्रिकेट, हॉलीबॉल, बॅडमिंटन, धावणे, चालणे,कॅरम व बुद्धिबळ या स्पर्धा पार पडल्या.

या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमात नळदुर्ग नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार, रोखपाल गोविंद अंबर, अभियंता वैभव चिंचोले, दिक्षा शिरसाट, पल्लवी पाटील, रमाकांत पिचे, सुरज गायकवाड, मयुरी जाधव, राणुबाई सपकाळ, लक्ष्मी देडे, रोहीत नायकवाडी, नितीन पवार, सुशांत भालेराव, किशोर बनसोडे, तानाजी गायकवाड, फुलचंद सुरवसे, विकास कांबळे, जनार्धन कांबळे, आनंद खारवे, संजय कांबळे व महेश बनसोडे यांनी सहभाग नोंदविला होता.

## आखाडा उभारण्यामध्ये नळदुर्ग शहरातील पत्रकारांचे योगदान मोठे : ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ जानेवारी -**

श्रीक्षेत्र मैलारपुरात कुस्ती स्पर्धेसाठी जो भव्य आखाडा बांधण्यात आला आहे या आखाडा उभारण्यामध्ये नळदुर्ग शहरातील पत्रकारांचे योगदान मोठे आहे असे कुस्ती आखाडा समितीचे अध्यक्ष रणजितसिंह ठाकुर यांनी दि ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधुन कुस्ती आखाडा समितीच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकारांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलतांना म्हटले.

दि.६ जानेवारी रोजी संपुर्ण राज्यात पत्रकार दिन साजरा करण्यात आला यावेळी विविध संघटना, राजकीय पक्ष, शैक्षणिक संस्था व सामाजिक संस्थांच्या वतीने पत्रकारांचा सत्कार करून त्यांच्या गौरव करण्यात आला. नळदुर्ग येथे दिशा नागरी सहकारी पतसंस्था धाराशिव नळदुर्ग शाखेच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त नळदुर्ग शहरातील पत्रकारांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला.

शाखेचे शाखाधिकारी उमेश जाधव कर्मचारी राहुल जाधव व ओंकार महाबोले यांनी शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, सचिव तानाजी जाधव, पत्रकार विलास येडगे, शिवाजी नाईक, लतिफ शेख, उत्तम बनजगोळे, भगवंत सुरवसे, डॉ. दीपक जगदाळे यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी केले.

त्याचबरोबर श्रीक्षेत्र मैलारपुर येथे श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त नळदुर्ग शहरातील पत्रकारांच्या हस्ते कुस्ती आखाड्याचे पुजन करण्याबरोबरच पत्रकारांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला.

प्रारंभी पत्रकार विलास येडगे यांच्या हस्ते कुस्ती आखाड्याचे पुजन करण्यात आले यानंतर श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीचे अध्यक्ष रणजितसिंह ठाकुर, कार्याध्यक्ष बंडु पुदाले, उपाध्यक्ष अनिल पुदाले, माजी नगरसेवक दत्तात्रय कोरे व

विशाल डुकरे यांनी नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, सचिव तानाजी जाधव, पत्रकार विलास येडगे, उत्तम बनजगोळे, लतिफ शेख, शिवाजी नाईक, आयुब शेख, भगवंत सुरवसे, डॉ. दीपक जगदाळे, अमर भाळे यांचा सत्कार करून त्यांचा गौरव केला.

यावेळी बोलतांना श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीचे अध्यक्ष रणजितसिंह ठाकुर यांनी म्हटले की, शहराच्या प्रत्येक विकास कामात



शहरातील पत्रकारांचे मोठे योगदान आहे. श्री क्षेत्र मैलारपुरात कुस्ती आखाडा उभारण्यात सर्व पत्रकारांचे समितीला सहकार्य मिळाले आहे.

या पुढील काळातही पत्रकारांनी विकासाभिमुख दृष्टिकोन ठेऊन शहर विकासासाठी प्रयत्न करावे असेही यावेळी रणजितसिंह ठाकुर यांनी म्हटले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## लातूर जिल्ह्यात तपासणी शिबिरांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** दिव्यांग बांधवांना कृत्रिम हात, पाय, स्प्लींट, कॅलीपर आदी सहाय्यकारी साधनांचे वितरण करण्यासाठी लातूर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र येथे तपासणी शिबिराचे उदघाटन समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार यांच्या हस्ते झाले.

जिल्हा समाजकल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड, संवेदना प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, सहकार्यवाह प्रविण सगर, विलास आराध्ये, सुमित्रा तोटे, अलीमकोचे कृत्रिम अवयव तज्ज्ञ डॉ. रुपेश जाधव, रुक्मिणी सोनेवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यंकट लामजणे, बसवराज पैके, श्रीमती शीतल सूर्यवंशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्यावतीने जिल्ह्यामध्ये दिव्यांगांसाठी करण्यात येणाऱ्या कार्याबद्दल देवसटवार यांनी कौतुक केले. तसेच दिव्यांगांसाठी तात्काळ (ऑन दि स्पॉट) साहित्य देण्यात येत असल्याने दिव्यांग व्यक्तींना याचा लाभ होत असून जिल्ह्यामध्ये अधिकाधिक दिव्यांगांना लाभ देण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी नाईकवाडी यांनी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींनी या शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन केले. संवेदना प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ.राजेश पाटील यांनी संवेदना प्रकल्प जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून विविध सेवा देत असून दिव्यांग व्यक्तींनी उपक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यंकट लामजणे यांनी केले, राजू गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी दिव्यांग बांधवांना कृत्रिम हात, खलील सय्यद यांना स्प्लींटचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त...

### महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात डॉ. दत्ता करंडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागात कार्यरत असलेले प्रा. दत्ता करंडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा पि. एचडी. पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली. त्यासंबंधी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी डॉ. दत्ता करंडे यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन नुकताच सत्कार केला. यावेळी मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, प्रा. आशिष स्वामी, फुलचंद कावळे, नागेश जाधव आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

डॉ. दत्ता करंडे यांनी वंचित विधवा स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास या विषयावर महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले आहे.

### डॉ. गुगळे यांची आयएमए हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया उपाध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** येथील सुप्रसिद्ध पोटविकार तज्ञ तथा गुगळे हॉस्पिटलचे संचालक डॉ.



दिपक गुगळे यांची महाराष्ट्र राज्य आयएमए हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. मुंबई येथे पार पडलेल्या परिषदेमध्ये आयएमए महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ संतोष कदम यांनी सर्वानुमते नियुक्ती केल्याची घोषणा केली. डॉ. गुगळे यांच्या आयएमए मधील कार्याची तसेच अनुभवाची दखल घेत विशेष बाब म्हणून ही निवड करण्यात आली आहे. आयएमए मध्ये अनेक महत्वाच्या पदांची जबाबदारी त्यांनी अत्यंत चोखपणे पार पाडली आहे. हे महत्वाचे पद भुषविणारे लातूर जिल्ह्यातील ते पहिले डॉक्टर आहेत. आगामी काळात राज्यातील हॉस्पिटल विषयक समस्या समजावून घेण्यासाठी राज्यस्तरीय परिषद घेण्याचा मानस डॉ. दिपक गुगळे यांनी व्यक्त केला आहे. राज्य आयएमए अध्यक्ष डॉ. संतोष कदम, मनोनीत अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, सचिव अनिल आव्हाड (मुंबई), डॉ. सौरभ सनजनवाला (मुंबई), डॉ. संजय कदम (नांदेड), डॉ. सुनील इंगळे (पुणे), डॉ. अनिल पाटील (जळगाव), डॉ. यशवंत गाडे (छत्रपती संभाजीनगर) यांच्यासह खासदार. डॉ.शिवाजी काळगे, डॉ. कुकडे काका, डॉ.भराडिया, डॉ. राजेश एनाडले तसेच माझं लातूर परिवाराच्या वतीने डॉ. दिपक गुगळे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### रस्त्यालगत थांबलेल्या दुचाकीला धडक; एक जण गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** रस्त्याच्या कडेला थांबलेल्या दुचाकीला भरधाव वेगातील कार चालकाने धडक दिली. या अपघातात दुचाकीवर थांबलेल्या एकाला गंभीर मार लागल्याची घटना देवणी ते वलांडी जाणाऱ्या रोडवर विळेगाव शिवारात घडली. याबाबत कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंद आहे.

फिर्यादी रविंद्र शिवाजी रंदवे हे दुचाकीसह रस्त्याच्या कडेला थांबले होते. देवणी ते वलांडी जाणाऱ्या रोडवर थांबले असता भरधाव वेगात आलेल्या पांढऱ्या रंगाच्या कार चालकाने निष्काळजीपणे मोटारसायकलला जोराची धडक दिली. या अपघातात फिर्यादी रविंद्र रंदवे रोडच्या खाली पडले. त्यांना गंभीर दुखापत झाली. नस तुटली, असे त्यांनी दिलेल्या जबाबात म्हटले आहे.

### केशवराज विद्यालयात दर्पण दिन साजरा : अनेकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती अर्थात 'दर्पणदिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आचार्य बाळशास्त्री जांभेकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मंचावर पर्यवेक्षक बबन गायकवाड, पत्रकार हरी तुगावकर, संजय देशपांडे, पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी उपस्थित होते. प्रास्ताविक शैला सांगवीकर यांनी केले. आभार विद्यर्थिनी कल्याणी देशपांडे हिने मानले.

## डॉ. घुगेसह तिघांनाही न्यायालयीन कोठडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ डिसेंबर-** आपल्याच रुग्णालयातील सहकारी कर्मचाऱ्याला बेदम मारहाण करून त्याचा खून करणाऱ्या येथील आयकॉन सुपरस्पेशालिटी हॉस्पिटचे डॉ. प्रमोद घुगे याच्यासह त्याच रुग्णालयातील अन्य दोघांना येथील मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांनी सोमवारी न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. आता तिघांचीही रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे.

येथील आयकॉन सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे सर्वेसर्वा डॉ. प्रमोद घुगे याने त्याच्याच रुग्णालयातील एका कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली होती. त्यात त्या कर्मचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. सदर प्रकरण दडपण्याचा डॉ. घुगे याचा डाव होता. बेदम मारहाणीत मृत्यू पावलेल्या मयत बाळू डोंगरे याचा अपघाती मृत्यू दाखविण्याचा डॉ. घुगे याचा प्रयत्न सुरू होता. परंतु, पोलिसांनी त्याचा तो डाव हाणून पाडला. बाळू डोंगरे याच्या खूनप्रकरणी डॉ. प्रमोद घुगेसह अनिकेत मुंडे व रुग्णालयाचा कर्मचारी जयराम कांबळे यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटना घडल्यानंतर डॉ. घुगे याने रूग्णालयातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये फेरफार करून पोलिसांची दिशाभूल केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. मागील पंधरा दिवसांपासून पोलीस कोठडीत असलेल्या डॉ. प्रमोद घुगेसह अनिकेत मुंडे व जयराम कांबळे यांची पोलीस कोठडी सोमवारी (दि. ६) संपली. त्यामुळे त्यांना येथील मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांपुढे हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपी व फिर्यादीच्या बाजू ऐकून घेतल्या. पोलिसांचेही म्हणणे ऐकून घेतले.

पोलिसांकडून मागील पंधरा दिवसांपासून आणखी त्याच कारणासाठी आरोपींना पोलीस कोठडी हवी आहे, तपासात कोणतीही प्रगती झाली नाही, यामुळे त्यांना न्यायालयीन कोठडी देण्याचा युक्तिवाद ॲड. बी. एल. शिंदे व ॲड. ज्ञानोबा सूर्यवंशी यांनी आरोपींच्यावतीने केला. सरकार पक्षाच्यावतीने ॲड. चव्हाण यांनी बाजू मांडली.

## लातूर जिल्हा रुग्णालयासाठी डॉ. चाकूरकरांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** राज्यात जवळपास सर्वच जिल्ह्यात जिल्हा रुग्णालये आहेत. मात्र, लातुरात मंजूर होऊनही जिल्हा रुग्णालय अस्तित्वात आले नाही. यामुळे लातुरातील सर्वसामान्य नागरिकांची आरोग्यासंदर्भात हेळसांड होत आहे. हा प्रश्न तत्काळ निकाली काढण्यात यावा, असे साकडे सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अर्चनाताई पाटील-चाकूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घातले.

लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न जवळपास १३ वर्षांपासून प्रलंबीत आहे. या रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची जागा देण्यात आली आहे. मात्र, ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये मोबदला कृषी महाविद्यालयास देण्यासाठी जागेचे हस्तांतरण रखडले आहे. या संदर्भात शासनाने ही प्रक्रिया तत्काळ पूर्ण करून जिल्हा रुग्णालय बांधून सुरू करण्यासंदर्भात कारवाई करण्यात यावी, असे साकडे डॉ. अर्चनाताई पाटील-चाकूरकर यांनी मुख्यमंत्र्यांना सोमवारी मुंबई येथे निवेदनाद्वारे घातले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे डॉ. चाकूरकर यांनी सांगितले.

## चहाच्या कागदी कपावर बंदी घालावी



**ग्राहक पंचायतची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** चहाचे कागदी कप कर्करोगासारख्या गंभीर आजारांना कारणीभूत ठरत असून या कपावर तातडीने बंदी घालावी, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांच्या नेतृत्वात देण्यात आलेल्या या निवेदनात म्हटले आहे की चहासाठी कागदी कप तयार करताना त्यात बीपीए नावाच्या केमिकलचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.या कपात गरम चहा किंवा पाणी टाकल्यास कपाच्या आतील बाजूस असणारे मायक्रो प्लास्टिक वितळते. ते चहामध्ये मिसळते. चहासोबतच या मायक्रो प्लास्टिकचे लाखो कण पोटात जातात. त्यामुळे कर्करोगासारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागत आहे, असे निवेदनात म्हटले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा कपावर बंदी घालावी.सर्व शासकीय कार्यालये, शाळा- महाविद्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, सार्वजनिक संस्था आदींना या संदर्भात आदेशित करून अशा कपामध्ये चहाची विक्री होत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ व प्रियंका आयरे यांनी हे निवेदन स्वीकारले. निवेदन सादर करताना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील,एन.जी.माळी, संगमेश्वर रासुरे, इस्माईल शेख, राजेश भोसले, नुपूर शेंडगे, राजू रायवाडे, अभिजीत आवटे, सुनिता झुल्पे,मंजुश्री ढेपे पाटील आदींची उपस्थिती होती.

## हातउसने घेतलेले पैसे मागितल्याने केली मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** हातउसने पैसे परत मागितल्याने आरोपीतांनी संगनमत करून गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीला तुझे कशाचे रे पैसे, देणार नाही, तुला काय करायचे ते करून घे, असे म्हणून शिविगाळ करून लोखंडी सळईने मारून जखमी केल्याची घटना बार्शी रोडवर घडली. याबाबत पाच जणांविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद आहे.

फिर्यादी इंद्रजित वसंतराव गडगिळे (रा. सोनानगर, लातूर) यांना हातउसने घेतलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून आरोपितांनी संगनमत करून मारहाण केली. तुझे कशाचे पैसे, पैसे परत देणार नाही, तुला काय करायचे ते कर असे म्हणून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.

लोखंडी सळईने पाठीत मारून जखमी केले. अन्य एकाने बेल्टने मारहाण करून तुला बघून घेतो म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली, असे इंद्रजित गडगिळे यांनी एमआयडीसी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार अमोल गरड व अन्य पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंद आहे. तपास फौजदार जगताप करीत आहेत, अशी माहिती एमआयडीसी पोलीस ठाण्यातुन देण्यात आली आहे.

## मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** परभणी येथील भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा तुरुंगामध्ये मृत्यू झाला. घरातील कर्ता गेल्याने कुटुंब उघड्यावर आले आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ सूर्यवंशी कुटुंबास एक कोटींची आर्थिक मदत द्यावी, कुटुंबातील एका शासकीय नोकरी द्या आणि या कुटुंबाचे पुनर्वसन करावे आदींसह मागण्यांचे निवेदन व्हीएस पँथर्स युवा संघटनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे.

परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृतीची विटंबनाप्रकरणी आंदोलन करीत असताना सोमनाथ सूर्यवंशी यांना पोलिसांनी अटक करुन बेदम मारहाण केली. त्यातच त्यांचा तुरूंगात संशयास्पद मृत्यू झाला. त्यामुळे सूर्यवंशी कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने हे कुटुंब उघड्यावर आले आहे.

कुटुंबाची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कुटुंबियांना एक कोटी रुपयांची मदत करून त्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी देऊन त्यांचे पुनर्वसन करावे, अन्यथा व्हीएस युवा पँथर्स संघटनेच्यावतीने तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, संपर्कप्रमुख आनंद जाधव, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ, ऑटो युनियनचे शहराध्यक्ष शाहरुख मणियार, स्वप्निल कांबळे, पंकज पाचपिंडे यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कडीकोंडा तोडून दागिन्यांची चोरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** शहरातील निगुडगे नगर येथे घरातील मेन गेटचा दरवाजा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश करून कपाटातील सोन्याचे लॉकेट, सहा हजार तसेच एक अंगठी अडीच ग्रॅम असे एकूण ४३ हजार ८०० रुपयांचे दागिने चोरल्याची घटना घडली.

याबाबत सुधीर प्रभाकर ढाके (रा. निगुडगे नगर, लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घरी कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी नवीन दरवाजातून आत प्रवेश करून कपाटातील दागिने लंपास केले. तपास फौजदार फुलारी करीत आहेत.

## 'एस.पी.' हॉकी घेऊन मैदानात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** २९ व्या नांदेड परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये लातूर, नांदेड, परभणी व हिंगोलीच्या पोलीस खेळाडूंनी क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला असून चार दिवसीय क्रीडा स्पर्धेतील सोमवार हा तिसरा दिवस उत्साहात पार पडला. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे हॉकी हातात घेऊन मैदानात उतरले होते.

२९ व्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेचे सामने पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणात रंगले असून मंगळवारी सायंकाळी उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते सदर क्रीडा स्पर्धेचा समारोप होणार आहे.

सोमवारी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर हॉकी गोळा, फेक, ४०० मीटर धावणे, १५०० मीटर धावणे (महिला व पुरुष) बॉक्सिंग, कुस्ती, तसेच जलतरणचे सामने झाले. या स्पर्धांमध्ये परिक्षेत्रातील सुमारे साडेचारशे खेळाडू सहभागी झाले आहेत. विजेत्या खेळाडूंना ७ जानेवारी रोजी उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते बक्षीस वितरण होणार आहे.

सोमवारी रोजी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर लातूर विरुध्द परभणी असा हॉकीचा सामना रंगला होता. सदर सामन्यात पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी स्वतः सहभाग नोंदवून उत्कृष्ट हीटिंग करत लातूर संघाने ०-३ ने परभणी संघावर विजय मिळवला.

## पत्रकारितेतून समाजाचा विकास झाला पाहिजे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** आपल्या पत्रकारीतेतून समाजाचा विकास झाला पाहिजे असे मत लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहाय्यक संचालक डॉ. शाम टरके यांनी ६ जानेवारी २०२५ रोजी दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे दर्पण दिनानिमित्त आयोजित पत्रकार सत्कार सोहळ्यात मांडले.

६ जानेवारी रोजी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे पहिले मराठी भाषेतील वृत्तपत्र सुरू केले होते. म्हणून महाराष्ट्रात ६ जानेवारी हा पत्रकार दिन दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ व दयानंद कला महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उपस्थितीत पत्रकार बांधवांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहाय्यक संचालक डॉ. शाम टरके यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य दिलीप नागरगोजे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर जिल्हा माहिती कार्यालयाचे जिल्हा माहिती अधिकारी श्री तानाजी घोलप, उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी, प्रसिद्ध शाहीर प्रा. संदिपान जगदाळे व लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष रविकिरण सुर्यवंशी मसलगेकर व संस्थापक सचिव दत्तात्रय जी परळकर हे मंचावर उपस्थित होते.

ते पुढे असे म्हणाले, आपल्या पत्रकारीतेतून पत्रकारांनी वंचित समाजाला जागृत करून आपल्या लेखणी या शस्त्राचा वापर सकारात्मक ध्येय ठेवून पत्रकारीता करावी व पत्रकारीतेतील आधुनिक बदल स्विकारावेत असे आवाहन करून पत्रकार बांधवांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

लातूर जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांनी ए आय सारख्या तंत्रज्ञानाचा वापर पत्रकारीतेत करण्याचे आवाहन करत दर्पण दिनानिमित्त पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी जेष्ठ पत्रकार सुभाषचंद्र नाईक, जेष्ठ पत्रकार राजेंद्र वनारसे, पत्रकार बाळासाहेब जाधव, लिंबराज पन्हाळकर, योगीराज पिसाळ, विलास कांबळे घारगावकर, लहुकुमार शिंदे, नेताजी जाधव, गजानन ढगे, संगाप्पा स्वामी, संतोष सोनवणे, योगेश शर्मा, शिरीषकुमार शेरखाने, भुजंग कांबळे, शरद पवार आदिंची उपस्थिती होती.

## दुचाकीची धडक; एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** राजीव गांधी चौक ते शिवाजी चौक जाणाऱ्या मेन रोडवर या क्रमांकाच्या दुचाकीवरून जात असताना भरधाव वेगातील दुसऱ्या वाहनाने फिर्यादीच्या दुचाकीला जोरात धडक दिली. ही घटना ३० डिसेंबर रोजी घडली. याबाबत अज्ञात वाहन चालकाविरुद्ध शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सोमवारी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी रामानंद व्यंकटराव शिंदे (रा. गांजूर, ता. चाकूर जि. लातूर) हे राजीव गांधी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या पायाला मार लागला असून, डाव्या हाताच्या खांद्याजवळ फ्रॅक्चर झाले आहे. शिवाय, दुचाकीचे अंदाजे दहा हजारांचे नुकसान झाले आहे.

## समाजाने वैचारिक मरगळ झटकावी : डॉ. जयद्रथ जाधव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ जानेवारी -** समाजाने आलेली मरगळ झटकून देशाला एकसंघ ठेवावे असे मत डॉ. जयद्रथ जाधव यांनी व्यक्त केले.

मुक्तीदिन व भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या संयुक्त विद्यमाने सुभेदार रामजी नगर येथील मूलगंध कुटी बुद्ध विहारात आयोजित मसामाजिक परिवर्तनाचा विचार आणि समकालीन वास्तवफ या विषयावरील व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे एम. एम. बलांडे होते. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे अशोक शिंदे, शारदा हजारे, दत्तात्रय भोसले उपस्थित होते.

प्राचीन आणि अर्वाचीन काळापासून भारतीय समाजात प्रबोधन परिवर्तनाचा विचार संत, महापुरूषांनी रुजविला. वर्ण-वर्ग-जातीप्रधान भारताला प्रबोधनाचा विचार देऊन समग्र भारतीयांना एका सुत्रांत बांधण्याचे कार्य महापुरुषांनी केले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समान न्याय हा मूल्य प्रणित स्वातंत्र्याचा विचार मजबूत करून अठरा पगड जातीबांधवांना न्याय दिला. संविधानात अंतर्भूत करण्यात आलेल्या या आदर्श मूल्यांमुळे या देशातील दलित, शोषित, पीडित, बहुजन समाज व स्त्रियांची खरी उन्नती झाली.

महापुरुषांच्या या धुरंदर कार्याला मोठा काळ लोटला आहे. हे स्वातंत्र्य शतकाकडे वाटचाल करीत असताना समाजात एक प्रकारची मरगळ आली आहे. ती झटकून भारतीय समाजाने पुन्हा संघटित होऊन देशाला एकसंघ ठेवावे असे मत डॉ. जयद्रथ जाधव यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले, हजारो वर्षे लोकांच्या मनात भरलेली विषमता, गुलामगिरी आणि स्त्री-शुद्रांचा मानवाधिकार नाकारणारा मनुस्मृति हा ग्रंथ असून त्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतीकात्मक पद्धतीने दहन केले. या एका क्रांतिकारी घटनेतून देशातील विषम धर्मव्यवस्थेला धक्का देऊन त्यांनी समतेचे पाऊल टाकले. १ जानेवारीला होणारा भीमा कोरेगाव शौर्यदिन हा या देशातील तमाम आंबेडकरी समाजाची अस्मिता आहे.

प्रास्ताविक अशोक शिंदे यांनी केले. अध्यक्षीय मनोगत एम. एम. बलांडे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन हनुमान कांबळे यांनी केले. आभार हिराचंद गायकवाड यांनी मानले. यशस्वीतेसाठी डॉ. लहू वाघमारे, प्रसेनजित जोगदंड, दिग्गज वाघमारे, अभिजीत कोकाटे यांनी परिश्रम घेतले.

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सिटी प्रेस क्लब चाकूरच्या वतीने दर्पण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.७ जानेवारी -**

चाकूर शहरात सिटी प्रेस क्लब चाकूरच्या वतीने दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



येथील सिटी प्रेस क्लब कार्यालयात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन अनिल वाडकर व नागनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणुन नगरसेवक राम कसबे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे अनिल वाडकर, नागनाथ पाटील, नगरसेवक राम कसबे यांचा सिटी प्रेसच्यावतीने सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते सर्व पत्रकार बांधवानांही गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमास सिटी प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रा.अ.ना. शिंदे, सचिव मधुकर कांबळे, कार्याध्यक्ष संगमेश्वर जणगावे, सतिश गाडेकर, सलीम तांबोळी, सुनिल भोसले, ॲड. बसवेश्वर जणगावे, चेतन होळदांडगे, विजय शिंदे, ओम भोसले, अलीम शेख आदी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### भाजपा सदस्य नोंदणी अभियान

**अहमदपूर, दि.७ जानेवारी -**

युवा मोर्चाच्या वतीने भाजपा सदस्य नोंदणी अभियान २४ हे ७ जानेवारी रोजी राबविण्यात आले. यावेळी फित कापून उद्घाटन अहमदपूर विधानसभा प्रभारी ऊचेगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. भाजपा जिल्हाध्यक्ष लातूर दिलीपराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस अँड. भारत चामे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, राजकुमार मजगे, तालुकाध्यक्ष प्रताप पाटील, रामानंद मुंडे, सुशांत गुणांले, जिल्हा सरचिटणीस प्रणिता बेंबडे, संयोजक विजयकुमार देशपांडे, गंगाधर सुर्यवंशी, मिलींद तेलंगे, अमर पाटील, रविशंकर स्वामी, नरेंद्र जोशी तसेच युवा मोर्चाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा सदस्य नोंदणीस मोठ्या उत्साहामध्ये प्रतिसाद मिळाला.



### ग्रंथप्रदर्शन व सामुहिक वाचन

**निलंगा, दि.७ जानेवारी -**

औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन व सामुहिक वाचन करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार यांनी ग्रंथप्रर्शनाचे उद्घाटन करून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रूजविण्यासाठी व जोपासण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सामुहिक वाचन करण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते. तसेच वाचन पंधरवाडानिमित्त महाविद्यालयात वाचक-लेखक संवाद, पुस्तक परिक्षण व लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. याप्रसंगी ग्रंथपाल डॉ. राजू हंबीर, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. आशीष खडकेश्वर, प्रो. मोहन बंडे, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. रितेश व्यास, प्रा. अंजली कळके, मारोती पवार, विलास होटकर इत्यादींसह विद्यार्थी उपस्थित होते.



### वलांडी येथे दर्पण दिन साजरा

**वलांडी, दि.७ जानेवारी -**

तालुक्यातील वलांडी येथे दि.६ जानेवारी रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दर्पण दिनाचे औचित्य साधून आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रथमता बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सरपंच राम भंडारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके,प्रमूख उपस्थिती मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे, बाजार कमिटी अध्यक्ष उमाकांत नागलगावे यांच्या हस्ते करण्यात आले. उदगीर तालूका पत्रकार संघाच्या वतिने ११ जानेवारी रोजी पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने त्यांचा तालुक्यातील समस्त पत्रकारांच्या व उपस्थित मान्यवरांच्या वतीने सत्कार करण्यात आला.सोबतच वलांडी ग्रामपंचायतमार्फत राम भंडारे व मूस्ताक कादरी यांच्या वतिने तालुक्यातील कार्यक्रमात उपस्थित पत्रकारांचा शाल व पुष्पहार घालून यथोचीत सत्कार करण्यात आला. यावेळी तालुक्यातील समस्त पत्रकार बांधव उपस्थित होते.



### सायक्लोथॉन स्पर्धेत रनर्सची कामगिरी

**अहमदपूर, दि.७ जानेवारी -**

रनर्स व सायकलिंग ग्रुप अनेक मॅरेथॉन मध्ये सहभागी होत. यावेळी सायकलीचे शहर म्हणून प्रसिद्ध असलेल्या अहिल्यानगर येथे आयोजित भारतातील सर्वात मोठ्या सायक्लोथॉन सिझन ६ मध्ये अहमदपूर सायकलिंग ग्रुपच्या नवनाथ हांडे यांनी ४:०५ तास, कृष्णा काळे ४:११ तास, भरत इगे ४:२८ तास आणि सूर्या साकोळे ४:३२ तास अशाप्रकारे या ४ जणांनी १०० KM² स्पर्धेत सहभागी होऊन सर्वांनी आपली सर्वोत्तम कामगिरी करत केली. या इव्हेंटमध्ये देशभरातील २००० सायकलपटूंनी सहभाग घेतला. अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड या ठिकाणी अहमदनगर सायलकिंग क्लब, इंडियन आर्मि आणि फिट इंडिया यांच्या वतीने ५,१०,२५,५० व १०० अशा ५ प्रकारात स्पर्धा आयोजित करण्यात आली.

## बालमजुरी मुक्तीसाठी सरसावल्या बंजारा समाजातील मुली

- बालविवाह न करता मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचा पालकांना नाटिकेतून सल्ला.
- सेवानगर तांड्यावर बालविवाह, बालमजूरी मुक्तीसाठी जागृती कार्यक्रम.
- कलापंढरी संस्थेच्या पुढाकारातून गाव वाडी वस्ती तांड्यावर बालविवाह बालमजूरी विरोधी जागर.



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.७ जानेवारी -**

तालूक्यातील आता तांड्यांवरील बंजारा समाजातील मुली बालविवाह बालमजूरी प्रतिबंधासाठी सरसावल्या आसून तांड्यावरील बालविवाहाचे प्रमाण कमी व्हावे, मुली बालविवाह नाकारुन शिक्षणाच्या प्रवाहात रहाव्यात म्हणून नुकताच सेवानगर तांड्यावर कलापंढरी संस्थेच्या पुढाकारातून किशोरी मुलींच्या कलापथकाच्या माध्यमातून बालविवाह, बालमजूरी, प्रतिबंधासाठी पालकांत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

कलापंढरी सामाजीक संस्था गेल्या ३८ वर्षापासून बालकांना न्याय व त्यांचे हक्क मिळावेत म्हणून बी.पी सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहे. रेणापूर तालूक्यातील सेवानगर तांडा येथे नुकताच कलापंढरी संस्थेच्या वतीने किशोरी कलापथकाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजीत केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फरदपुरच्या सरपंच केसरबाई राठोड होत्या होते.

तर कार्यक्रमाचे उद्घाटन सेवानगर ग्राम बाल संरक्षण समितीचे गोविंद राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सुर्यवंशी, सामाजीक कार्यकर्ते मारुती पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमांमध्ये प्रत्येक पालकांनी आपल्या मुलीचा बालविवाह न करता तीच्या पायावर उभे राहण्यासाठी पदवीपर्यंत शिक्षणाच्या प्रवाहात ठेवावे, तीच्या आवडीच्या क्षेत्रात तीला करीअर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, बालविवाह न करता, तसेच तीला बालमजूरी ला न पाठवता शिक्षणाच्या प्रवाहात ठेवल्यास नक्कीच मुलगी तीच्या आवडत्या क्षेत्रात करीअर करुन ती तीच्या पायावर उभे टाकते, फक्त तीला पालकांनी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, जे पालक आपल्या मुलीचा बालविवाह करतील त्यांना होणारी कायद्याने सजा पालकांना भोगावी लागेल.

बालमजूरी ला पाठवलेल्या पालकांवर आणि बालमजूरी करुन घेणाऱ्या वर कारवाई केली जाईल. बालमजूरी करुन घेणाऱ्या मालकांवर दिले.

खोल कायदेशीर कारवाई केली जाईल, या विषयी विविध नाटीकेतून पालकांना संदेश देण्यात आला होता, बालविवाह, बालमजूरी, प्रतिबंधात्मक डान्स च्या माध्यमातून पालकांची जण जाग्रती करण्यात आली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मधुकर गालफाडे तर आभार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालूताई, साके, मधकर गालफाडे, राजू गोरे, सुप्रिया गोरे आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी महीला, पुरुष व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवीन चापोली महसूल मंडळ अतिस्तवात आण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.७ जानेवारी -**

चाकूर तालुक्यातील चाकूर महसूल मंडळांची पुनर्रचना करुन नवीन चापोली महसूल मंडळ आस्तितवात आणावे याबाबत दि.६ जानेवारी रोजी युवक भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूर येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.



चाकूर मंडळांची पुनर्रचना करुन नवीन चापोली महसूल मंडळासंबंधीत अधिसूचना काढून कार्यवाही करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. सद्यस्थितीला चाकूर हे महसूल मंडळ असून भौगोलिक व आथिर्कदृष्ट्या गैरसोयीचे ठरत आहे. चापोली गावाची २०११ च्या जनगणनेनुसार ७ हजार २३० लोकसंख्या असुन गावचे भौगोलिक क्षेत्र २ हजार १६६ हेक्टर आहे. चापोली परीसरात ५ कि.मी.अंतरावर आनंदवाडी, नायगाव, हिंप्पळनेर, अजनसोंडा (बु), महसुली सज्जाची गावे येतात. तसेच चापोली हे नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्ग ३६१ वरील परीसरातील नागरिकांसाठी दळणवळणा साठी सोयीचे व मध्यवर्ती ठिकाण आहे.

त्यामुळे चापोलीसह परीसरातील नागरीकांची गैरसोय व हेळसांड टाळण्यासाठी चापोली गाव महसुली मंडळ घोषित करणे सोयीचे होणार आहे. याबाबत तत्कालीन महसूल मंत्री राधकृष्ण विखे पाटील यांनी दि.१० जून २०२४ रोजी चापोली महसूल मंडळ निर्मिती संबंधी प्रस्ताव सादर करणे विषयी चाकूर तहसील कार्यालयाच्या नावे पत्रव्यवहार केला होता.

मात्र अद्यापपर्यंत तहसिल कार्यालयांकडून कसलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. परीणामी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूर येथे निवासस्थानी भेट घेऊन यासंबधी निवेदन दिले.

चाकूर मंडळांची पुनर्रचना करुन नवीन चापोली महसूल मंडळासंबंधीत अधिसूचना काढून कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

## निलंग्यात पत्रकार दिन साजरा



**भा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.७ जानेवारी -**

निलंगा तालुका पत्रकार संघाच्यावतीने सोमवार दि.६ जानेवारी रोजी दर्पण दिनानिमित्त बाळ शास्त्री जांबेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख म्हणून हरून सय्यद यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बाळ शास्त्री जांबेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास निलंगा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष रामभाऊ काळगे, सचिव झटींग अण्णा म्हेत्रे, उपाध्यक्ष नाना रामदासी, प्रा. अभिमन्यू पाखरसांगवे, कोषाध्यक्ष किशोर सोनकांबळे, श्रीशैल्य बिराजदार, शिवाजी पारेकर, विशाल हालकीकर, मोईज सितारी, साजिद पटेल, असलम झारेकर, मोहनराव क्षीरसागर, परमेश्वर शिंदे, मिलींद कांबळे, राजाभाऊ सोनी, अफसर शेख, आदी उपस्थित होते.

## पानगावात मलंगशाहवली बाबा यात्रेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.७ जानेवारी -**

हिंदू मुस्लीम धर्मियांचे एकमेव ठिकाण असलेले पानगाव येथील हजरत मलंगशाहवली बाबा यांच्या यात्रेनिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दि.१३ आणि १४ जानेवारी रोजी सलग दोन दिवस भरगच्च आशा कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

रेणापूर तालूक्यातील पानगाव येथे ५०० वर्षापासून सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान असलेले येथील जाग्रत देवस्थान म्हणजे मलंगशाहवली बाबा दर्गा होय. अजमेर येथून अंदाजे ५०० वर्षापुर्वी गावोगाव समाज प्रबोधन करत करत मलंगशाहवली बाबा व इतर पाच जण औरंगाबाद येथे पोहचले. आणि तेथून समाज प्रबोधन करत करत पानगाव मुक्कामी पोहचले. आणि येथे मलंगशाहवली बाबा यांनी जीवंत समाधी घेतली. यांच्या सोबत असलेले पाच (शाकीर) सेवेकरी हे पण पानगाव येथे आले व बाबांची सेवा करता करता वयोवृद्ध होऊन म्रुत्यू पावले या पाच जणांच्या (मदार) समाधी दर्गा परीसरात आजही पहायला मिळतात. या दर्ग्यात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दिनांक १३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता संपुर्ण गावातून वाजत गाजत संदलची मिरवणूक काढली जाणार आहे. यानंतर दुसऱ्या दिवशी १४ जानेवारी रोजी रात्री नांदेड येथील अरमार ईफ्तेकारी आणि बेंगलोर येथील सुप्रसिद्ध कव्वाल असलेले तहेसिन ताज या दोघांचा जंगी कव्वाली मुकाबला होणार आहे.

तरी पानगाव व परीसरातील हिंदू मुस्लीम बांधवांनी या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन हजरत मलंगशाहवली बाबा यात्रा संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## सकल मराठा समाजातर्फे निलंगा येथे चक्का जाम आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.७ जानेवारी -**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख व बुद्धवासी सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा या मागणीसाठी निलंगा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.



डिसेंबर महिन्यात बीड जिल्ह्यातील मास्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे, ही हत्या माणुसकीला काळिमा फासणारी घटना आहे. तसेच परभणी येथील भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कस्टडीत दुर्दैवी मृत्यू झाला. या दोन्ही घटनेने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला असतानाही यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. व त्यांच्या कुटुंबियांना शासकीय सेवेत रुजू करावे तसेच सदरील घटनेचा तपास निःपक्षपाती व्हावा या मागणीसाठी निलंगा शहरात आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित समाज बांधवांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी तात्काळ मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, व वाल्मिक कराड यांच्यावर ३०२ चा गुन्हा नोंद करावा तसेच इतर आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आले. पुरोगामी महाराष्ट्रात अश्या घटना घडू नये, यासाठी शासनाने तात्काळ बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचा नायनाट करावा अशी मागणीही यावेळी करण्यात आली. यावेळी उपस्थित मराठा बांधवांनी 'अमर रहे अमर रहे संतोष देशमुख-सोमनाथ सूर्यवंशी अमर रहे', मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतलाच पाहिजे, 'वाल्मिक कराड ला फाशी झालीच पाहिजे' अश्या घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला होता. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव या रास्ता रोको आंदोलनात सहभागी झाले होते.यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने नायब तहसीलदार प्रवीण आळंदकर व पोलीस उपनिरीक्षक सुनील पल्लेवाड यांना निवेदन देण्यात आले.

रास्ता रोको आंदोलन केल्यामुळे शहरातील चारही बाजूने कांही वेळ शेकडो वाहने थांबून होते. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## नरसिंह घोणे, सुरेश डबीर यांना दर्पण पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.७ जानेवारी -**

राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज आदर्श पत्रकारिता पुरस्कार नरसिंह घोणे यांना तर दिवंगत गजानन भुसारे ज्येष्ठ पत्रकारिता पुरस्कार सोलापुर तरूण भारतचे सुरेश डबीर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी आपल्या आर्शीवचनामध्ये पत्रकार बांधवांनी लोकशाहीचे प्रबोधनच केले पाहिजे, असे प्रतिपादन भक्तीस्थळचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा अहमदपूरच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज आदर्श पत्रकारिता पुरस्कार लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक संपादक नरसिंह घोणे यांना तर दिवंगत गजानन भुसारे ज्येष्ठ पत्रकारिता पुरस्कार सोलापुर तरुण भारतचे अहमदपुर तालुका प्रतिनिधी सुरेश डबीर यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव हे उपस्थित होते. भक्ती स्थळचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी, उपविभागीय अधिकारी डॉ. मंजुषा लटपटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर, तहसीलदार उज्वला पांगरकर, मुख्याधिकारी संतोष लोमटे, गटविकास अधिकारी अमोल आंदेलवाड, महादेव कुंभार हृदयरोग तज्ञ डॉ. ऋषिकेश पाटील, नेत्ररोग तज्ञ डॉ. रामेश्वर चामले, वनपरिक्षेत्र अधिकारी डॉ. वर्षा नागरगोजे, तालुका कृषी अधिकारी सचिन बावगे, वनपरिक्षेत्र अधिकारी शिल्पा गित्ते आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आचार्य गुरुराज स्वामी म्हणाले की, पत्रकारीता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. पत्रकार जे कांही सांगतात ते आम्ही खरे मानतो. दर्पण म्हणजे आरसा. आरसा कधीच खोटे बोलत नाही म्हणुन पत्रकारांनी नेहमी सत्याची बाजु मांडली पाहिजे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी पत्रकारितेने खुप मोलाचे योगदान दिले आहे. पत्रकार बांधवांनी नेहमीच लोकशाहीचे प्रबोधनच केले पाहिजे. समृद्ध भारत निर्माण करण्याची जबाबदारी ही पत्रकारांवर असल्याचे सांगितले. यावेळी ७५ महसुल कर्मचार्यांचे आरोग्य तपासणी करण्यात आली. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष प्रा. विश्वंभर स्वामी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर व बाबासाहेब वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सचिव शिवाजी गायकवाड यांनी मानले.

कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी उदयकुमार गुंडीले, बालाजी तोरणे पाटील, सुरेश डबीर, प्रा. मारुती बुद्रुक पाटील, बालाजी पारेकर, डॉ. बालाजी कारामुंगीकर, मासूम शेख, बाबासाहेब वाघमारे, दिनकर मद्देवाड, जगताप पुणे, महादेव महाजन, प्रा. दिलीप भालेराव, राजकुमार सोमवंशी, संदीप गुंडरे, धम्मानंद कांबळे यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## जीवनात शिक्षणासोबतच संस्कार आवश्यक व महत्त्वाचे : डॉ. संध्या शर्मा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.७ जानेवारी -**

समाजात स्वावलंबी व चांगले जीवन जगण्यासाठी शिक्षणासोबतच संस्कार आवश्यक व महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. संध्या शर्मा यांनी केले.

औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने फुले जयंतीनिमित्त आयोजित विद्यार्थी समुपदेशन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार होते. याप्रसंगी वैभवी शिलवंत यांनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान केली होती.